म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १३३२

IRBK-0101332

IRBK 0101332
IRBK-0101332

9332

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

18 JUL 1974

23 MAR 1975

26 JUL 1975

2 JUN 1976

23 MAR 1979

27 JUN 1979

26 SEP 1981

म. ग्रं. सं. ठाणें
विषय देवनागरी
क्रा. नं. १४३२

क्र/१९९८

# सुखाचे क्षण

IRBK-0101332

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/ वाचनालय/ जिल्हा वाचनालय शाखा.

| | | |
|---|---|---|
| अनुक्रम नं. | विभाग | क्रमांक १४३२ |

पुस्तकाचें नांव सुखाचे क्षण
लेखक ज. ज. सरदेसाई.

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

९३३२

जयवन्तराव जगन्नाथ सरदेसाई

Com Curso Complementar de Sciencias

७३३२
कथा



जयवन्तराव जगन्नाथ सरदेसाई

Com Curso Complementar de Sciencias

— गोमन्तक —

कथा १९८

# सुखाचे क्षण

प्रभात प्रकाशन

—: नवीन गोवें :—

कापडी १ रु. ] ——— [ कागदी १४ आ.

१ रुपया

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

मुद्रक व प्रकाशक,
**विनायक स. पिसुर्लेकर**
"श्री शान्तादुर्गा मुद्रणालय"
नवीन गोवें

१५१९८५

गोमन्तक साहित्यसेवक मण्डळ पुरस्कृत

पुस्तक ३ रें

# सुखावेक्षण

जयवन्तराव जगन्नाथ सरदेसाई

गोमन्तक

श्री. जयवन्तराव ज. सरदेसाई

यांचें

# वाङ्मय

—अ प्र का शि त—

गुलाबगेंद .................... ( कथासंग्रह )

निर्माल्य ........................ ( कादम्बरी )

—सं क ल्पि त—

नीतीचे निर्बन्ध ............... ( कादम्बरी )

१९ व्या शतकांतील पोर्तुगिज
ललित वाङ्मय ........... ( निबन्धात्मक )

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
अ. क्र. ........ नों. दि. ....
वि. ........ क्र. ........

# कथांचें प्रथम प्रकाशन —

| कथा | स्थळ | काळ | |
|---|---|---|---|
| सेवकांचा संसार | यशवन्त | जुलई | १९३२ |
| व्यापाचा ताप | सुबोध | जुलई | १९३३ |
| सुखाचा संसार | विहंगम | फेब्रुआरी | १९३४ |
| अनुताप | विश्ववाणी | जानुवारी | १९३४ |
| खुनी ! | वागीश्वरी | सप्टम्बर | १९३३ |
| पंढरीचा वारकरी | सत्यकथा | डिसेम्बर | १९३३ |
| दिवजांची जत्रा | यशवन्त | सप्टंबर | १९३३ |
| कर्तव्याची जाणीव | यशवन्त | अक्टंबर—नवंबर | १९३२ |
| हृदयाचें असमाधान | युगान्तर | नवम्बर | ११३४ |
| रात्रबांचं ऋण | मनोहर | मार्च | १९३४ |
| कर्तव्याची व्याख्या | | (अप्रकाशित) | |
| सवतीचा फोटो | | ,, | |

## क्षणभर—

नोकरींतून निवृत्त होतांना, अगर बढतीच्या प्रसंगीं आपण बजावलेल्या निरनिराळ्या कामगिरींचा आढावा नोकरमाणसास सरकारदरबारीं सादर करावा लागतो. तद्वत् गोमन्तकासारख्या दूरप्रान्तांत राहून महाराष्ट्र शारदेची जी वरीवाईट यथामति सेवा केली तिला एकत्रिक स्वरूप देण्याचा सुयोग हा आज येत आहे.

व्यापावरोबरच तापाचा पसारा वाढल्यामुळें यापुढें माझ्या हातून पूर्वीसारखें लेखन होत नाहीं व पुढेंतर कदाचित हा नाद अजिबाद सुटेल अशी शंका वाटते आणि म्हणूनच ही माझ्या दृष्टीनें मी थोडीशी घाई करीत आहें.

वास्तविक साहित्यक्षेत्रांत पदार्पण केल्यापासून आजपर्यन्त मी जवळ जवळ अर्धशतकावर लघुकथा लिहिल्या व त्या 'यशवन्त', 'वागीश्वरी', 'विश्ववाणी', 'विहंगम', 'नवजीवन', 'किर्लोस्कर', 'स्त्री', 'मनोहर', 'सुबोध' इत्यादि प्रमुख महाराष्ट्रीय नियतकालिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झाल्या; काहींचीं हिन्दींतून भाषान्तरेंही झालीं. लघुकथांच्या प्रथम प्रकाशच्यावेळीं काहीं रसिक वाचकांनीं माझ्या निवडक लघुकथांचा मी एखादा संग्रह प्रसिद्ध करावा अशीही सूचना केली, या सगळ्या गोष्टी लक्षीं घेऊन प्रस्तुत संग्रह प्रसिद्ध केल्यास औचित्यभंग होणार नाहीं असें मला प्रामाणिकपणें वाटलें, म्हणूनच या संग्रहाची कल्पना मूर्तस्वरूपांत आणण्याचें ठरविलें.

परन्तु संकल्प व सिद्धि यांतील अन्तर अनुकूल साधनांवर अवलम्बून असतें. श्री. विनायकराव स. पिसुर्लेकर यांनीं प्रस्तुत पुस्तक प्रकाशनाची उत्सुकता दाखविली

नसती तर पुस्तकाची कल्पना किती काळ गर्भावस्थेंत राहिली असती कुणास ठाऊक ! अपत्य माझें असलें तरी त्याला नटवून सजवून रसिकांसमोर आणण्याची ही विकट जबाबदारी स्विकारून मला त्यांनीं अत्यंत ऋणी करून ठेवलें आहे.

आतां संग्रहाविषयीं सांगायचें झाल्यास माझ्या इतक्या प्रकाशित लघुकथांपैकीं मी फक्त १०च गोष्टी या संग्रहांत पुर्नमुद्रित केल्या आहेत, राहिलेल्या दोन (सवतीचा फोटो व कर्तव्याची व्याख्या) या अप्रकाशित आहेत.

यांतील लघुकथा गोमन्तकाच्या पार्श्वभूमीवरच रेखाटलेल्या असून गोमन्तकीय सुशिक्षित पांढरपेश्या गृहस्थापासून शेतकरी, महार, खिश्चन वगैरे निरनिराळ्या जिवनक्रमाचे मासले यांत दिसतील. एवंच शक्य तों गोमन्तकीय जीवनाचे निरनिराळे पैलू दाखविण्याचा प्रयत्न यांत केलेला आहे. मीं केलेलें दिग्दर्शन कितपत सुरस उतरलें आहे हें सांगण्याचा अधिकार माझा नाहीं तो टिकाकारांचा व सहृदय वाचकांचा आहे.

या पुस्तकाच्या निर्मितीस ज्या माझ्या स्नेह्यांचें मला सहाय्य झालें त्यांचे आभार मानण्याचा औपचारीक समारंभ करून मी ऋणमुक्त होऊं इच्छित नाहीं.

गोमन्तकांत अनुकुल असलेल्या अपुऱ्या मुद्रणसामुग्रीनेंच हा संग्रह प्रकाशित होत आहे हें लक्षीं घेऊन बाह्यांगापेक्षां अन्तरंगाकडेच वाचकांनीं पहावें अशी सहृदय रसिकांच्या चरणीं विनन्ति आहे.

नार्वें–गोमन्तक,
२२–१२–३४

**ज. ज. सरदेसाई**



माझे अत्यन्त जिव्हाळयाचे मित्र

**श्री. विनायक जगन्नाथ मणेरकर**

यांस सप्रेम अर्पण.

(library stamp, handwritten number)

# सेवकांचा संसार!

In principatu comutando pauperes nihil mutant nisi nomen domini
—**Fedro.**

झिलूमागून सात वर्षांनीं खेजू दादापाटलांच्या घरीं आली — परन्तु कानामागून आली आणि तिखट झाली त्यांतील गत येथेंहि झाली. खेजू यावयाच्या पूर्वीचा आणि आजचा झिलू यांत केवढें तरी अन्तर पडलें होतें. पूर्वीचा तो सरळमार्गी आणि साधा झिलू आतां बराच आंतल्या गांठीचा झाला होता. पूर्वी जें काम तो मन लावून करी तसें त्याच्याकडून आतां होत नसे. खेजू जवळ नसली म्हणजे त्याला कसेंसेंच वाटे व त्याची चित्तवृत्ति बावरून जाई. त्यामुळें त्याकडून काम नीट होत नसे; आणि तो व खेजू जेव्हां बरोबरीनें काम करीत तेंव्हां तर दोघांकडूनहि काम होत नसे. एवंच झिलूच्या धोपटमार्गी आयुष्यक्रमांत खेजूनें बरीच क्रान्ति घडवून आणली होती. यापूर्वी दादांनीं सांगावें व त्यानें मरमरून काम करावें हें ठरलेलें होतें. मग आतां कामांत होणारा हा चुकारपणा त्यांच्यासारख्या कडक वृत्तीच्या माणसास कसा सहन होणार?

आजही तसेंच झालें — दादांनीं त्याला भाटांत जाऊन कवाथ्यांस

(माडाच्या रोपांस) भर घालण्यास फर्मावलें होतें. झिलू गेला व जेव्हां परत आला तेव्हां दादांनीं विचारलें,

"घातलीस का रे कवाथ्यांस भर?"

"हो, घातली दादा." झिलू उत्तरला.

"चांगली घातली आहेस ना सगळ्यांस?"

"हो."

दुसऱ्याच दिवशीं दादा भाटांत फिरून आले. फक्त एकीकडच्याच थोड्याशा कवाथ्यांस त्यानें भर घातली होती. बाकीच्या भाटांत तर तो गेलासुद्धां नव्हता. ते घरीं आले व त्यांनीं हांक मारली—

"झिलूऽऽ!"

त्यांच्या रागाचा पारा बराच चढला होता.

"काय, दादा!" झिलू मागील पडवींतून बाहेर येत अदबीनें ह्मणाला.

"तूं हल्लीं फार कामचुकार झाला आहेस. मला समजतं बरं सगळं! मी कांहीं बोळ्यानं दूध पीत नाहीं, समजलास!—पोरं असतीं तर तुझ्याएवढीं नातवण्डं झालीं असतीं मला."

ते पुन्हा बोलूं लागले, "मी बारीक पहातों आहे, ती खेजू घरांत आल्यापासून तुझं चित्त ठिकाणावर नाहीं. पण तुला सांगून ठेवतों, तूं असंच चालू ठेवशील तर तुला येथूनच नव्हे तर गांवांतूनसुद्धां हांकलून देईन. समजलास काय तूं!"

झिलू खालीं मान घालून ऐकत होता. त्याला अपराध नाकबूल करणें शक्य नव्हतें. दादा आंत निघून गेले; व तो परसांत जेवणास केळीचीं पानें आणावयास गेला.

* * *

झिलू मूळचा सतरी महालचा—दादा पाटलाचें जें एक थोरलें

## ..................................... सेवकांचा संसार!

भाट सतरीस होतें तेथला तो. सत्तर महालांत जी एक मोठी तापाची सांथ आली त्यांत त्याचीं मातापितरें वारलीं; तेव्हां झिलू सरासरी बारा-चवदा वर्षांचा होता. एके दिवशीं दादा पाटील या आपल्या भाटांत आले असतां त्यांस झिलूच्या आईबापांच्या मरणाची बातमी समजली. झिलू मातृपितृविरहित उघडा पडल्यामुळें त्याची कींव येऊन ह्मणा, किंवा आपणास घरीं गुरेंढोरें राखण्यास उपयोगी पडेल या दूरदृष्टीनें ह्मणा, त्यास ते बरोबर घेऊन आले. गुरें चारणारा झिलू आतां 'मानाय' झाला, व गुरें चारण्याचें त्याचेकडील काम जाऊन तो आतां घरचा गडी झाला होता. घरचीं सर्व कामें करून राहिलेला वेळ त्यानें भाटांत अगर परसांत काम करून घालवावा, असा त्यास सक्त हुकूम असे. दादा त्यास क्षण-भरही रिकामा ठेवीत नसत. नित्य भाटांत कांहीं ना कांहीं काम असतेंच, तेथें त्याची तावडतोब नेमणूक होई. झिलूही तें काम मुकाट्यानें करीत असे. त्यानें याबद्दल कुरकूर केव्हांच केली नाहीं. इतक्या वर्षांच्या सरा-वानें त्यास ह्या श्रमाचें कांहीं वाटत नसे. अशा वर्तनाच्या या माणसांत खेजू आल्यापासून बरेंच परिवर्तन झालें.

खेजूही मूळची सतरीचीच; इतकेंच नव्हे तर त्याच्याच गांवची. झिलू जेव्हां सतरीस आपल्या घरीं होता त्यावेळीं ती दहा-बारा वर्षांची होती व तिचें लग्नही होऊन ती खात्या-जेवत्या घराण्यांत पडली होती. त्यानन्तर त्यास तिची कांहींच खबर कळली नव्हती. आणि कळणार तरी कशी! तो आपल्या गांवाहून दादांच्या घरीं आला तो पुन्हां गांवीं परत गेलाच नाहीं. किंवा कामाच्या रगाड्यापुढें त्यास जाण्यास फुरसदच मिळाली नाहीं असें ह्मणणें जास्त सयुक्तिक होईल.

एके दिवशीं दादा अकस्मात सतरीहून येतांना खेजूस घेऊन आले. झिलूस परमावधीचें आश्चर्य वाटलें. पण हळूहळू त्यास खरी गोष्ट कळून आली.

## सुखाचे क्षण ........................................१

खेजूचे सासूसासरे जोंपर्यन्त जिवन्त होते तोंपर्यन्त ठीक होतें. परन्तु जेव्हां ते वारले तेव्हां तिच्या दिवट्या व व्यसनी पतिराजांनीं वडिलांच्या साऱ्या भरल्या संसाराची वाट लावली. शेतकऱ्याचा संसार ह्मणजे दोनचार बैलांच्या जोड्या, शेतीचीं फार किम्मत असलेलीं आउतें व अंगांतील शक्ति! बैलांच्या जोड्या कवडी--मोलानें सावकारांनीं लिलावांत घेतल्या, ताम्ब्याचीं जीं काय भाण्डीं होतीं तींही धनकोनीं नेण्यास कमी केलें नाहीं. किडुकमिडुकसुद्धां विकलें गेलें. आतां फक्त दोन दागिने घरांत शिल्लक राहिले होते; ते ह्मणजे खेजूस आजे--सासूनें दिलेलें डोरलें व वडिलांच्या कम्बरेंतील त्यांनीं मरते वेळीं तिच्या नवऱ्याच्या कम्बरेंत घातलेलें 'काण' (रुप्याचा लड्ड गोफ). याच दोन वस्तू अजून टिकून राहिल्या होत्या. परन्तु हे दोनहि दागिने लवकरच इतरांच्या वाटेनें गेले. दारु व जुगार यांनीं तें सुखवस्तु कुटुम्ब धुळीस मिळविलें.

लक्ष्मी गेली ह्मणून दारू कांहीं बरोबर घर सोडून जात नाहीं — ती जिवाभावाची सोबतीण जीव घेऊनच जावयाची! शेवटीं व्यसनाच्या वडवानलांत त्याची शरीरयष्टी कोठवर टिकाव धरणार? खेजू वयाच्या सोळाव्या वर्षींच विधवा झाली. तिला आईबाप कोणीहि नसल्यामुळें ती निराधार पडली. दादांनीं आपणास घरीं स्वस्तांत मोलकरीण सांपडेल ह्मणून तें तिला घेऊन आले. झिलूप्रमाणें हिचाही आपणास भरपूर उपयोग करून घेतां येईल हीही आशा त्यांत होतीच.

* * *

झिलू लांकडें फोडीत होता व खेजू तीं घरांत आणून भरीत होती. लांकडावर तो जड कुऱ्हाडीचा जोरानें मारलेला घाव बसतांच तें चर्रर् करून फुटे, आणि त्या घावाबरोबर त्याच्या हाताचे व छातीचे सर्व स्नायू हालून जात. त्यानें कुऱ्हाड खालीं ठेवली व कपाळावरील घाम हातानें

पिळला. त्याचें सर्व अंग घामानें न्हाल्याप्रमाणें भरलें होतें. त्यानें लंगोटीच्या भडक तांबड्या रंगाच्या रुमालाचा पुढला पदर उसवून घाम पुसला. खेजू उभी राहून हें सर्व पहात होती. लांकडें नेण्याचें ती जवळ जवळ विसरलीच—त्याचें तें स्नायूंनीं भरलेलें पिळदार शरीर पाहून खेजूस कां कुणास ठाऊक फार अभिमान वाटला. ती त्याच्याकडे निरखून पाहूं लागली; तोही तसाच पाहूं लागला. दोघांनाही दृष्टी हलवण्याची इच्छा झाली नाहीं—पण इतक्यांत दादा बाहेर आले.

"झिलू! काय करतोस उभा राहून! लांकडं फोडून व्हावयास हवींत हीं. मग बैस गप्पा मारीत." दादा गरजले.

झिलूनें लांकडें फोडून रास टाकली होती. दोन गडी लावूनसुद्धां जें काम झालें नसतें तें त्यानें एकट्यानें केलें होतें व तें दादा उघड्या डोळ्यांनीं पहात होते, त्यांचे डोळे कांहीं फुटले नव्हते. पण थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे—ते धनी होते एवढ्यांत सगळें आलें! आजपर्यन्त कुठल्या धन्याला आपला नोकर चांगला ह्मणून दिसलें आहे! आणि दादांच्या मनांत आतां एक निराळाच किन्तु येत होता. खेजू आणि झिलू एकत्र झालीं ह्मणजे त्यांना अगदीं मनापासून वाईट वाटे, व मग 'शेषं कोपेन पूरयेत्' या न्यायानें त्यांस रागही येई कदाचित् ही असूया तर नसेल ना? असेल कदाचित्! नाहीं कोणी ह्मणावें?

झिलूनें पुन्हा कुऱ्हाड उचलली व लांकडावर घाव घातला. पण तो आतां फार दमला होता. तरी पण धन्यानें फर्मावलेलें काम तो मुकाट्यानें करीत होता. इतक्यांत देवालाच त्याची करुणा आली कीं काय कुणास ठाऊक!

आकाशांत मेघांचा एकदम गडगडाट झाला व थोडक्यांत पाऊस येणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. दादा आपल्या खोलींत दुपारची वामकुक्षी करीत होते तेथूनच त्यांनीं ओरडून सांगितलें,

"झिलूऽऽ! अरे तू आणि खेजू प्रथम तीं फोडलेलीं लांकडं आणून आंत घरांत भरा; पाऊस येतो आहे वाटतं."

झिलूस हायसें वाटलें व त्यास थोडासा आनंदही वाटला. त्यानें कुऱ्हाड खालीं ठेवली व खेजूस लांकडाच्या कवळ्या करून देण्यास सांगून तो त्या आयण घरांत नेऊन भरूं लागला. पाऊस येण्याच्या आंत त्यांनीं हसतखेळत सगळीं लांकडें आणून घरांत भरलीं. दोघांसही केलेल्या कामाचे श्रम वाटले नाहींत.

* * *

झिलू दमूनभागून ओसरीवर कांबळें टाकून विश्रान्तीसाठीं पडला होता. दादा पेज जेऊन वामकुक्षी करीत होते. झिलू सकाळींच पेज जेवल्यामुळें दुपाऱ्च्या जेवणाची वाट पहात होता. घरांतील विहीरींत कायसें पडून कुजल्यामुळें परसांतील दूरच्या विहिरीचें पाणी खेजू आणीत होती. आकाशांत मेघ खच्चून भरले होते व पाऊस पडण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. हळूहळू बारीक पाऊस पडण्यास सुरवात झाली. खेजूनें नेहमींचे पाणी घरांत भरलें; फक्त एकच कळसा आणखीं पाहिजे होता, म्हणून ती रिकामी घागर व कळशी घेऊन विहिरीवर गेली. तसल्या पावसांतच तिनें ती भरून कडेवर घेतली आणि दुसऱ्या हातांत दुसरी कळशी घेऊन घराकडे येत होती. इतक्यांत पावसाची जोराची सर आली. भिजण्यापूर्वी घर गांठावें म्हणून ती लगबगीनें चालूं लागली. प्रत्येक पदाघाताबरोबर तिचे पिनोन्नत स्तन हलत होते. नेसलेलें लुनेर पावसानें अंगास चिकटल्यामुळें वक्षस्थळावरीलें उन्माद स्पष्ट दृग्गोचर होत होता. आणि अंगांत चोळी नसल्यामुळें तर फुललेल्या कमलाप्रमाणें तिचें वक्षस्थल बहारदार दिसत होतें. काळ्या कपाळावर कुरळ्या केंसांची क्रीडा पण भारी सुन्दर वाटत होती.

पडल्या पडल्या पडवींतून झिलूनें हें सर्व पाहिलें. तो कवि अगर

चित्रकार थोडाच होता, त्या निर्मळ साध्या सौंदर्याचें पान करण्याची रसिकताही त्याच्या अंगांत नव्हती. पण क्षणभर त्याचें चित्त चळलें. त्याला तें दृश्य गोड वाटलें.

विहिरीवरून घरांत यावयास बरीच चढण होती. कंबरेवर घागर व हातांत कळशी घेऊन धावणेंहि शक्य नव्हतें. झिलू चट्कन् उठला व धांवत खालीं येऊन त्यानें तिच्या कडेवरची तीं भली थोरली घागर आपल्या उजव्या हातांत घेतली व डाव्या हातांत कळशी घेतांना आपली कांबळ तिच्या अंगावर टाकून तो झपाझप पावलें टाकीत ओटीवर आला. तिच्या कडेवरून घागर घेतांना तिच्या वक्षोजांचा उन्मादकारी मधुर स्पर्श त्याला झाला व त्याच्या अंगांतून त्याला नकळत आनन्दोर्मि चमकल्या.

आपणास कडेवर न सम्भाळणारी घागर झिलूनें सहज लिलेनें हातांत घेतलेली हें पाहून तिला त्याचें कौतुक वाटलें व अभिमानही वाटला. आपल्या नवऱ्यानें एखादें अवघड काम केल्यानन्तर त्याच्या बायकोस जो एक अभिमान वाटतो, त्याचीच झांक तिच्या चेहऱ्यावर प्रतिबिम्बीत झाली होती.

झिलूनें घागर व कळशी वल्कांवावर ठेवली व लंगोटीच्या पदरानें आपलें अंग पुसलें. इतक्यांत खेजू आली.

"झिलू! मला कशाला रे दिलीस काम्बळ? मी भिजलेंच होतें, तूं तरी घेतली असतीस म्हणजे कोरडा राहिला असतास. आतां तूंही भिजलास आणि मी तर भिजलेंच," ती सहानुभूतिमिश्र प्रेमानें म्हणाली.

"खेजू! असं कसं म्हणतेस? मी कोरडा राहून तुला कशी भिजूं देऊं? आतां ठीक झालं, तूंही भिजलीस आणि मीही भिजलों."

"अस्सं!" शब्दावर गोड हेल काढून व कृत्रिम कोपकटाक्ष फेंकून ती आनन्दानें म्हणाली.

"आणि हें बघ, तूं—पावसामुळं तुझं जुनेर चिम्ब भिजून बघ कसं

अंगास बरोबर चिकटलं आहे—अशा अवस्थेंत तूं लोकांच्या नजरेस पडूं नये असंही मला वाटलं, ह्मणून मीं तुझ्या अंगावर काम्बळ टाकली—हा माझा दुसरा एक आपला हेतु होता!" झिलू मिस्किलपणें हंसत तिच्या सौंदर्यावर दृष्टी रोंखून ह्मणाला.

"आणि तूं मला पाहिलंस तें?" खेजू किन्चित गाल फुगवून ह्मणाली.

"पण मी लोक वाटतं?" झिलू हंसला.

खेजूही मनापासून हंसली व घागर कडेवर घेऊन घरांत गेली. झिलू पुन्हां आडवा झाला.

* * *

अशा तऱ्हेनें खेजू व झिलूमध्यें प्रेम वाढूं लागलें होतें. प्रेम कसचें, म्हणा! प्रेम म्हणजे काय व तें कशाशीं खातात हें त्यांना ठाऊक नव्हतें. पण आपुलकीची भावना वाढूं लागली होती हें वरिक खरें. दादाच्या मनांत ही गोष्ट यावयास फार उशीर लागला नाहीं. पण या दोघांत विघाड आणावयास कोणती युक्ति योजावी हेंही त्यांना सुचेना. त्यांनीं आपल्या शक्कलबाज डोक्यांतून पुष्कळ युक्त्या काढल्या; परंतु त्यांचा कांहींच उपयोग झाला नाहीं. त्यांनीं खेजूस निरनिराळीं आमिषें दाखवून, जन्मभर पोसण्याची हमी घेऊनदेखील ती त्यांस बधली नाहीं. खेजूचें तारुण्य त्यांच्या नजरेंत भरलें होतें. हें सावज आपल्या तावडींत बरें सांपडलें आहे, त्याचा सर्व बाजूंनीं पुरेपूर उपयोग करून घ्यावा असा त्यांचा मानस होता. पण कुठून शिंचा हा झिलू मध्येंच धडपडला! दादांना आतां कसल्या तरी सुसंधीची वाट पहाणें भाग होतें.

* * *

झिलू शेतांत 'थाम' (भाताची रोपें) लावण्यास जमीन तयार

करीत होता. मशागत बहुतेक तयार होत आली होती. झिलूची तब्येत नेहमींची आनन्दी — पण आज तो विशेष खुशींत होता. कां होता याचें उत्तर त्यालाही सांगतां आलें नसतें.

तो कुदळ घालतां घालतां गाणें ह्मणत होता — "मला मुम्बयला जायला तिकीट काढून कां हो देइना." गेल्या रोजांत पाटलांनीं शहरांतून ग्रामाफोन आणला होता—त्यांतील सर्व रेकॉर्डांत झिलूस ही रेकॉर्ड फार आवडली होती.

"काय रे झिलू, मुम्बईस जातोस का?" डोक्यावर थाप्प भरलेली पाटी घेऊन खेजू येत होती, ती हंसत हंसत म्हणाली.

"तूं तिकीट काढून देतेस का?" तिच्या डोकीवरील पाटी खालीं उतरवीत तोही हंसत म्हणाला.

"मी कोठून देणार? आणि असती तरी मीं तुला दिली नसती."

"कां ग?"

"कां ह्मणजे? तूं माझ्यापासून दूर झाला असतास." खेजू गम्भीर स्वरानें ह्मणाली.

"मग? तुझ्यापासून मीं दूर होऊं नये असं तुला वाटतं का?"

"हो."

"तर मग माझ्याशीं पाट लाव!" झिलू चट्कन् बोलून गेला. पण लवकरच त्याला आपण काय भलतेंच बोलून गेलों असें वाटलें. त्यानें मान खालीं घातली, त्याचीं कानशिलें तप्त झालीं व कपाळावर दोन घर्म-बिन्दु चमकले.

थोडा वेळ स्तब्धतेंत गेला. आणखी थोड्या वेळानें त्या स्तब्धतेचा भंग करून तिनें विचारलं, "तूं आहेस का तयार माझ्याशीं पाट लावायला?"

"हो! कां नाहीं असणार?"

# सुखाचे क्षण ............................................ १

"मी राण्ड आहें, आणि तुझं लग्न अजून झालं नाहीं — मग तूं माझ्याशीं कसा पाट लावणार? खेजूनें सवाल टाकला.

झिलू स्तब्ध होता. तिला कसें उत्तर द्यावें व आपली अन्तःकरणाची अनुकूलता कशी प्रदर्शित करावी हें त्यास समजत नव्हतें. त्याच्यापाशीं तें शब्दभाण्डार नव्हतें.

खेजूच पुन्हां ह्मणाली, "यांत तुझी जात नाहीं का जाणार?"

"हं! गेली तर गेली. तुझ्याकरतां मी जात देखील सोडायला कमी करणार नाहीं."

तो मनांत आनन्दला होता. पण तो आनन्द त्यानें गाम्भीर्याच्या आवरणाखालीं झांकला. खेजू दुसरी पाटी आणावयास परत गेली. झिलूही आनन्दानें मशागत करूं लागला. त्याच्या लङ्क पोटचा व जांघेपर्यन्तचा भाग चिखल उडून भरला होता व हात कोंपरापर्यन्त भरले होते.

त्याला आज पराकाष्टेचा आनन्द झाला होता; व मनांतला आनन्द तो हंसून व्यक्त करीत होता. दुःख रडून कमी होतें तसा आनन्द हंसून कमी होतो तर नकळे. त्यानें सभोंवार दृष्टि फेंकली; जागोजागीं आनन्द खचून भरला होता.

निसर्गानें पांचव्या महिन्यावरचा पांचवा शालू सृष्टिदेवतेस अर्पण केला होता. आणि प्रियकरानें प्रेमानें दिलेली भेट परिधान करून ती डौलानें व गर्वानें मिरवीत होती. दूरवर समोर दिसणारी टेकडी अगदीं हिरवी-चार दिसत होती. मधून मधून पायथ्याशीं एकादें तांबडेंलाल कौलांचें छप्पर त्या हिरव्या रंगावर खुलून दिसत होतें — एकादें अवखळ पोर स्तनपान करीत असतांना मधूनच तोंडावरील पदर दूर सारून आईकडे पाहून हंसावें—अगदीं तसा भास होत होता! शेतांत वाहणारा ओढा तुडुम्ब भरून अगदीं मन्द वहात होता. त्याचें कावळ्याच्या डोळ्यासारखें पाणी पाहून

तुमच्याही हृदयांत असाच निर्मल प्रेमाचा ओढा नित्य वाहूं द्या असेंच जणुं काय तो सुचवीत होता.

खेजू थामानें भरलेली दुसरी पाटी घेऊन आली. झिलूनें तिच्या डोक्यावरून ती खालीं उतरली व आपल्या मातीनें बरबटलेल्या हातानें तिच्या सफरचन्दी गालांचा प्रेमानें एक गालगुचा घेतला. तिला राग मुळींच आला नाहीं–उलट आनन्द वाटला. तिनें असला हा वाष्कळपणा आपणास पसन्त नाहीं म्हणून एक लाडका कोपकटाक्ष फेंकला. पण तुमची करणी मला मनापासून आवडते असा गूढ अर्थ त्यांत भरला होता!

दादा येत होते त्यांनीं हा प्रकार पाहिला—त्यांना अतिशय संताप आला! पण करणार काय?

तीं दोघें मुकाट्यानें थाम लावूं लागलीं. दादांचा डोळा चुकवून एकमेकांकडे हंसून पहाण्यासही तीं कमी करीत नसत.

* * *

"खेजू! तुला मी बजावतों, माझ्या घरांत हे ढंग चालूं देणार नाहीं. माझ्या घराचा काय कुण्टणखाना करावयाचा बेत आहे वाटतं तुझा! हंसते काय, खिदळते काय त्या झिलूशीं--तो कांहीं तुझा नवरा नाहीं आणि होणंही शक्य नाहीं!" दादा सन्तापानें ह्मणाले.

खेजू मुकाट्यानें भाण्डीं विसळीत होती.

"कां?" असा प्रश्न विचारण्याचें अगदीं जिभेच्या शेण्ड्यावर आलें होतें; पण ती उगीच राहिली.

दादाच पुढें बोलूं लागले, "त्याला कांहीं तुझ्यासारख्या राण्डेशीं पाट लावतां येणार नाहीं. त्याची पहिली बायको मेली असतीं तर तें कदाचित् शक्य झाल असतं पण त्याच्या लग्नाचा अजून पत्ताच नाहीं. आणि अशा

परिस्थितींत तुम्ही पाट लावला तर गांव तुम्हांस वाळींत टाकील." दादा चिन्तेच्या स्वरानें म्हणाले.

खेजूनें एकही नाहीं आणि दोनही नाहीं—ती अगदीं मुकाट्यानें भाण्डीं विसळीत होती.

"आतां तुला बजावून सांगतों—तूं एक त्या झिलूचा तरी नाद सोडला पाहिजे किंवा हें घर तरी सोडलं पाहिजे." नन्तर थोडा स्वर बदलून तेच पुढें म्हणाले, "खेजू! नीट विचार कर. मी म्हणतों त्याप्रमाणें तूं माझ्याशीं राहिलीस तर तुला केव्हांच मी अन्नावस्त्राची ददात वाटूं देणार नाहीं—तुला वेगळं घर बांधून देतों—!"

बाहेर कोणी हांक मारली म्हणून ते निघून गेले.

खेजू मनाशींच हंसली व हेटाळणीनें म्हणाली, "मेल्या! तुझी राख होऊन का मी राहूं!"

बाहेरच्या मण्डळीस गुडगुडी भरून देण्याकरतां झिलू चिलमींत विस्तव घालण्यासाठीं म्हणून न्हाणीच्या चुलीजवळ आला होता. त्याला पहातांच मनांतील सर्व राग ती विसरून गेली. तिनें हंसून त्याचें स्वागत केलें.

* * *

खेजूनें सन्धी मिळतांच सगळा प्रकार झिलूच्या कानांवर घातला. झिलूही विचारांत पडला.

"असं काय बरं? कसला विचार करतोस रे?" खेजूनें अगदीं गळीं पडून विचारलें.

"तूं दादांच्या म्हणण्यास कां सम्मती दिली नाहींस?" त्यानें आंवडा गिळला. "त्यांनीं तुला सांगितल्याप्रमाणं घरदार बांधून दिलं असतं—अन्नवस्त्राची ददात जन्मभर राहणार नव्हती, आणि—"

"मी त्याची राख बनून रहावं असं का तुला वाटतं?" तिनें कांपऱ्या आवाजांत विचारलें. तिचा कण्ठ भरून आला.

"असं कसं बरं ह्मणूं मी! पण माझ्याकरतां तूं हें सुखाचं जिणं सोडावं हें मला कससंच वाटतं. मी तुझ्याशीं पाट लावला कीं दादा आपल्याला हांकलून देतील हें खास. नन्तर माझ्या फाटक्या संसारांत तुला पोटभर अन्न अन् अंगभर वस्त्र मिळेल कीं नाहीं देवाला माहीत!" झिलू करुण स्वरानें म्हणाला.

"बरं बरं! ह्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी मला सांगूं नकोस." खेजू हंसूं लागली.

* * *

"झिलू, तुला अजून सांगतों—खेजूचा नाद सोड, नाहींतर मी तुला हांकलून देईन." दादा करड्या आवाजानें पण समजावणीच्या स्वरानें म्हणाले.

"दादा! तुमच्याच पेजेवर हा देह वाढला आहे. असं करूं नका. आम्हीं पाट लावला तरी पूर्वीप्रमाणं आपल्याच घरीं राबूं." झिलूनें काकुळतीनें गयावया करीत ह्मटलें.

"बस्स. तुमच्याशीं हुज्जत घालायला मला वेळ नाहीं. आजच्या आज, आत्तांच्या आतां हें घर सोडून चालूं लागा. पुन्हां तोंड दाखवाल तर खबरदार!" दादा कडाडले.

* * *

त्याच दिवशीं तीं दादांच्या घराबाहेर पडलीं. झिलूस तर घर सोडतांना फार वाईट वाटलें. त्यास कित्येक वर्षांच्या सहवासानें त्या घराबद्दल प्रेम वाटत होतें. त्यानें घरांतील सजीव–निर्जीव वस्तूंचा प्रेमानें निरोप घेतला. त्याचे डोळे भरून आले. दादांच्या पायांवर डोकें ठेवून

नन्तर जावें म्हणून तो दादांच्या खोलीकडे वळला, पण त्यांनीं त्याला दारांतूनच हुसकावून लावलें.

* * *

त्याच दिवशीं पाटलांचा भाचा पणजीहून त्यांच्या घरीं आला होता. दुसऱ्या दिवशीं रविवार असल्यामुळें त्यानें सोमवारच्या अभ्यासाचीं पुस्तकेंही आणलीं होतीं—दादांस जरी पोर्तुगीज समजत नव्हतें तरी आपल्या भाचानें यस् फयस् केलें म्हणजे त्यास आनन्द वाटत असे.

भोजनोत्तर दादांनीं आग्रहानें त्यास कांहींतरी वाचून दाखवावयास सांगितलें—सहज हातास आलें तें पुस्तक उघडलें; तें लॅटीन भाषेचें होतें. त्यानें वाचण्यास सुरवात केली.

In principatu comutando pauperes nihil mutant nisi nomen domini.

"हं! याचा अर्थ काय रे?" दादांनीं विचारलें.

"राजवटींतल्या घडामोडींत गरिबांचे धन्याशिवाय कांहींच बदलत नाहीं!"

दादा या वाक्याचा अर्थ आजच्या घटनेकडे लावीत होते.

# व्यापाचा ताप

आणि आज वरदा रडत होती. सगळ्या गतेतिहासाचा चलच्चित्रपट तिच्या डोळ्यांसमोरून धांवत होता. आणि त्याच गतीनें तिच्या डोळ्यांतून अश्रुबिन्दु झिरपत होते.

प्रशस्त बंगल्यांत ती रहात होती. गडीमाणसें पावलास पंचवीस होतीं, फिरावयास जाण्यास उत्तम मोटार होती, घरांत तर लक्ष्मी नुसती राबत होती, इतकें असून आज वरदा रडत होती.

तिला लग्नापासूनचे प्रसंग आठवत होते.

* * *

नटवरलालशीं तिचें लग्न झालें त्यावेळीं त्यांचा संसार अगदीं सुखपूर्ण असा होता. नटवरलालचें दुकान होतें. सायंकाळीं तो दुकानावरून परत आला म्हणजे वरदनें त्याचें हंसतमुखानें स्वागत करावेंआणि त्यामुळें त्यास आपले सगळे श्रम परिहार झाल्यासारखें वाटे.

नटवरलाल तरुण, देखणा व रसिक होता. दुकानावर होणारी प्राप्ति साधारण बरी असल्यामुळें त्यांचा प्रपंच सुखासमाधानानें चालला होता. तारुण्य, आरोग्य, पैसा व योग्य मनुष्य जन्माचा जोडीदार लाभल्यावर सुखास काय कमतरता ?

एरव्हीं श्रीमन्त होणें जरी मनुष्याच्या हातीं नसलें तरीपण नटवर-लालास आपण श्रीमन्त--अगदीं खूब श्रीमन्त — व्हावें असें केव्हांही वाटलें नाहीं. वरदेस मात्र मधून मधून, मधून मधूनच कां नेहमीं वाटे कीं आपल्या नवऱ्यानें अगदीं गिरिधरलालप्रमाणें श्रीमन्त व्हावें आणि याकरितां तिची नटवरलालच्या मागें नेहमीं पिरपीर असे.

— आणि आजही तसेंच झालें.

आज नटवरलाल दुपारींच दुकान बंद करून घरीं आला. त्याचें कपाळ बरेंच दुखत होतें.

'आज लवकरसें दुकान बन्द केलेंत?' वरदेनें विचारलें.

'एरव्हींच' नटवरलाल पुटपुटला.

'एरव्हींच काय? असें दुकानाकडे दुर्लक्ष करून नेहमीं आजच्याच परिस्थितींत रहावयाचा का विचार आहे?' ती म्हणाली.

नटवरलाल उगीच राहिला.

'गिरिधर भाऊजींचा तो प्रासादतुल्य बंगला बघा, तो तुमच्या या झोंपड्याकडे बघा कसा हिणवून बघतो आहे. त्यांची ती बाग, ती मोटार—' तिची अंतःकरणांतील अंतिम इच्छा तोंडावाटे बाहेर पडूं लागली.

'वरदे! खरंच सांग, मी तुला काय कमी करतों? मणिबेन वहिनी वापरते त्यापेक्षां अधिक उंची कपडे मी तुला वापरायला नाहीं का देत? तिच्याच तोडीचे दागिने तुझ्याजवळ नाहींत का? मग? आपल्या या बंगल्यापेक्षां त्या थोर बंगल्यांत जास्त तें काय आहे? मला तर कांहीं समजत नाहीं.'

'त्यांत समजत नाहीं ह्मणजे काय? गिरिधरलालभाऊजी तुमचेच भाऊ ना? मामंजी वारले त्यावेळीं त्यांनीं आपली इष्टेट समभाग तुह्मां

दोघां भावांत वांटली ह्मणतात. आणि आज सहा वर्षांनीं पहावें तों ते लक्षाधीश झाले व तुह्मी मात्र अगदीं त्यांच्या मानानें जसेच्या तसे राहिलांत. साऱ्या मुम्बईभर त्यांचीं दुकानें झालींत आणि —

'वरदे! वेडे, डाकोरनाथांनीं आपणास काय कमी केलं आहे? मोठा व्यापार केला, लक्षांनीं रुपये मिळविले ह्मणजे जास्त सुख उत्पन्न होतें असें का तुला वाटतें? मी तर असें समजतों कीं फक्त पैसा कांहीं सुख देत नाहीं सुख पूर्ण होण्यास तो अंशानें कारणीभूत होतो एवढेंच–पैशास पैसा जोडून लक्षाचे दोन लक्ष करण्यांत काय सुख असतें कोणास ठाऊक'?

'तसला वाद मला वेडीला समजत नाहीं. पण एकच वाटतें कीं आपण खूपखूप पैसा मिळवावा आणि गिरिधरभाऊजींप्रमाणें' —

'वेडे! गिरिधर सुखांत आहे असें का तुला वाटतें? या व्यापाराच्या व्यापामुळें त्याला बिचाऱ्याला जेवावयास देखील फुरसद मिळत नाहीं.'

'पुरुषांना व्यवसायाचा व्याप हें भूषण असतं बरं?'

'मग मीही तसंच करावं असं का तुझं ह्मणणं आहे'?

'हो!' वरदा लगेच उत्तरली. आतां कुठं तिची कळी उमलली.

'बघ, मागाहून पस्तावशील. लक्षाधीश होण्याकरितां लक्षांच्या व्यापारांत मी जर जास्त लक्ष घातलं तर तुझ्याकडे दुर्लक्ष होईल.'

'ती भीति राहूं द्या. झालं तर झालं.' वरदा किञ्चित हंसत ह्मणाली.

अस्सं का? मग मला पाहूं दे माझ्या मनगटांतील जोर आणि नशिबाची परीक्षा. गिरिधर कांहीं स्वर्गातून उतरला नाहीं—माझाच भाऊ तो—गुजराथ्यांच्या गर्भाला व्यापार शिकवायची जरूरी नाहीं. तुझी जर तशीच इच्छा आहे तर तसें का होईना! कुणीकडून तरी तुला सुख मिळालं ह्मणजे झालं.' गिरिधर सन्त्रस्त स्वरानं पुटपुटला.

वरदेस मात्र आनन्द झाला — इतक्या वर्षांची तिची आकांक्षा फळाला येऊं पहात होती.

झाल्या प्रकाराबद्दल वरदेस प्रथम प्रथम बराच आनन्द वाटूं लागला पण नटवरलालास मात्र त्रास होई. त्याच्या सुखासीन वृत्तीस हे वाढलेल्या व्यापाचे त्रास बरेच जाणवूं लागले. परन्तु कोणत्याही ध्येयास एकदां वाहून घेतल्यानन्तर मग त्यांतच तनमनधन अर्पून श्रम करणें हें योग्यच !

आणि नटवरलालही पण आपली जबाबदारी जाणत होता.

नटवरलालनें व्यापाराचा व्याप आतां बराच वाढवला होता आणि अगदीं मनापासून तो त्यांत खपूं लागला. इतर आवडीनिवडीला त्यानें तिलांजली दिली. फक्त आपला व्यापार आणि आपण—थोडीशी फुरसद मिळाली तरी त्याच त्या व्यापाराच्या विचारांत त्यानें गुंगत असावें.

व्यापारी पूर्ण माहिती, थोरांमोठ्या गुजराथी व्यापाऱ्यांची ओळख, सचोटीचा व्यवहार, कष्टाळु व्यापारी, आणि या सर्व गोष्टींपेक्षां नशिबाची अनुकूलता, मग आणखी काय पाहिजे? दोन वर्षांतच नटवरलालचा नूर पालटला. खाऊन पिऊन सुखी असलेला नटवरलाल आतां श्रीमन्त व्यापाऱ्यांत मोडूं लागला आणि शुक्लेन्दुवत् त्याची द्रव्यतृष्णा वाढतच गेली.

भावनाप्रधान माणसाच्या मनांत जें एकदां काय भरलें तें कायमचें ठाण मांडून बसतें. नटवरलालास आतां व्यापाराचें व्यसन जडूं पहात होतें.

* * *

वरदेस मात्र आतां आपली चूक हळूहळू जाणवूं लागली. एरव्हीं जनदृष्टीनें तिला काय कमी होतें? पूर्वीची ती छोटी बंगली जाऊन नटवर-

लालानें अगदीं गिरिधरलालच्या बंगल्यासमोर असलेला अवाढव्य वाडा खरेदी केला होता, किती तरी नोकर चाकर ठेवले होते, वरदेस फिरण्यास स्पेशल मोटार, वापरण्यास पॅरिसच्या साड्या आणि, आणि— जेवढें ह्मणून पैशांनीं खरेदी करतां येईल तेवढें सुख जय्यत होतें पण—

पण यापूर्वीं वरदेच्या इच्छा पुरवतांना तिच्या आवडीनिवडीच्या वस्तू स्वतः नटवरलाल खरेदी करीत असे, बैळीं प्रसंगीं इतर बाबतींत मितव्ययी असणारा नटवरलाल वरदेनें इच्छा दर्शवतांच शक्तिबाहेरची किंमती वस्तूसुद्धां घेत असे. पण आतां ती सगळी व्यवस्था मेथाजींच्या हातांत गेली होती. त्यास आतां पूर्वीसारखें करण्यास वेळ कुठं होता? नटवरलालनें मेथास स्पष्ट बजावलें होतें कीं वरदा जें काय बोलेल तें आणून द्यावयाचें, त्याकामीं कितीहि पैसा लागला तरी फिकीर नाहीं.

परंतु दिवसांतून दुकानाचा वेळ वगळून नेहमीं तिच्या सहवासांत
असणारा नत माणसाच बसून राहिला असंत. ला दुरावला होता. महिन्यांतून एकवेळसुद्धां
निवाण्णा तेवढ्या प्रमाणंच आतांहि पण नसे. आज कुठं कलकत्त्यास
खरेदीस जें शक्य होतें चीस आणखी परवां भलत्याच
ठिकाणीं—— पासून

आणखी या कामांतून त्यास केव्हांहि सवड मिळून तिची त्याची रात्रीं भेट झाली तर—

त्याची ती विचारी मुद्रा तिला असह्य होई—तो पूर्वीचा रसिक व प्रेमळ नटवरलाल आतां शुष्क अंतःकरणाचा बनला होता. जणूं काय त्याचे पूर्वीचे सारे कोमल मनोविकार भस्मीभूत होऊन त्यांची जागा द्रव्यतृष्णेनें व्यापली होती.

तिला आतां आपल्या करणीचा पश्चात्ताप होत होता परंतु तो उशिरा होता. तिला वाटत होतें आपण गरीब अगदीं साफ गरीब व्हावें, आणि

आपल्या प्रेमळ नटवरलालच्या संगतींत चोवीस तास रहावें; या कामीं चोवीस तास राबण्यासुद्धां तिची तयारी होती, पण—?

—पण काय? झाल्या गोष्टीस उपाय नव्हता.

एक एकदां तर तिला ह्या विचारांचा त्रास असह्य होई.

तिनें ठरविलेंसुद्धां. जेव्हां पतीची गांठ पडेल त्यावेळीं त्यास सांगायचें कीं पुरे झाला हा द्रव्य-मोह ह्मणून—

—आणि त्याप्रमाणें तिनें सांगितलेंही;

त्यावेळीं नटवरलाल हंसून ह्मणाला, 'चल वेडी कुठली! वेडी नाहीं तर काय? मला या आजच्या स्थितीस आणून पोंचविणारी स्फूर्तिदेवता तूंच आहेस असेंच मी माझ्या मित्रांना सांगत असतों. तूं जर माझें मेलेलें मन व महत्त्वाकांक्षा जागृत केली नसतीस तर हा नटवरलाल-कीं ज्याच्या शब्दावर या अवाढव्य मुम्बईचा व्यापार झुलतो तोच नटवर--शेर अर्धाशेर सामानाच्या पुड्या बांधीत त्या दुकानाच्या फळीवरच गोष्टींपक्षा ...—

'पण त्यावेळीं आपण माझं जसं ऐकलंत तरच नटवरलालचा ऐकलं पाहिजे.' ाल आतां

'बोल! सांगना? वरदे बोलत का नाहींस? द्रव्यता ... रोल्सराइस मोटार घेऊन देऊं कीं तितक्याच किंमतीची तुला कुडीं करूं? बोल?'

'मला कांहींएक नकोय. जें कांहीं तुह्मीं मला दिलं आहे तें इतकं आहे कीं मला सात जन्म वापरलं तरी संपायचं नाहीं. माझं ह्मणणं एवढंच कीं आपण आतां हा धंदा सोडायचा. लक्षांनीं इष्टेट आपण कमावली आहे आतां पैसा पैसा ह्मणून तरी तो घेऊन काय करायचा?

'काय करायचा आहे? पैसा आणि काय करावयाचा आहे? हा प्रश्न मी माझ्या आयुष्यांत प्रथमच ऐकतों—थांब, हो बरी आठवण झाली. मी जरा बाहेर जाऊन येतों हं?

—आणि एवढ्या रात्रीं ? — वरदेनें आश्चर्यानें विचारलें.

'हो! मला वाटतं अजून कांहीं बाजार बन्द होणार नाहीं, मला त्या मनसुखलालशीं बोलायचं आहे त्या कालच्या सट्ट्याबद्दल.'

नटवरलाल कपडे करावयास निघून गेला.

वरदा तेथेंच थिजली —

जिन्यावर नटवरलालचे बूट वाजले, थोड्याच वेळांत मोटार पण भर्रर् करून निघून गेल्याचा आवाज तिच्या कानीं आला.

ती विमूढ मनस्थितींत पलंगावर बसली.

शेजारच्या तिपाईवर नटवरलालनें मघाशीं टाकलेला किल्ल्यांचा घोंस तेथेंच पडला होता. तिला त्या किल्ल्यांचा तिरस्कार आला.

तिला वाटलें — जेव्हां या किल्ल्यांचा जन्म झाला तेव्हांच मानवजातीच्या अन्तःकरणांत स्वार्थानें व विशेषतः द्रव्यलालसेनें जास्त पेट घेतला —ही किल्लीच जर जन्माला आली नसती तर मिळवलेल्या संपत्तिचें रक्षण करण्यांत माणसाचा जास्त वेळ गेला असता, आणि मग त्याची द्रव्यतृष्णा तेवढ्या प्रमाणांत का होईना कमी होणार होती.

तिनें शक्य होतें तितका वेळ विचार केला. नटवरलालास या व्यापाराच्या व्यसनापासून परावृत्त करण्याचा तिला मार्गच सुचेना. या सर्व अनर्थाचें मूळ आपणच आहों हें शल्य तिला जाचूं लागलें—अगदीं गरिबी पत्करण्यास तिची तयारी होती पण नको ही श्रीमन्ती—एवढी तिला संपत्तीची किळस आली होती.

तिची नजर फिरून त्या किल्ल्यांच्या घोंसावर गेली. तिला उगीच त्यांचा संताप आला. त्या आपल्याला हंसून हिणवून ह्मणताहेत 'वरदे बघितलंस तुझ्या नवऱ्याचं तुझ्यापेक्षां आमच्यावर जास्त प्रेम आहे' असं तिला वाटलं.

तिनें त्या उचलल्या पण —?

यांचा सूड कसा उगवायचा?

बाहेर टाकून दिल्या तर पुन्हां सांपडतील, अगदीं नाहींशा केल्या तर पुन्हां नव्या घडवून आणतां येतील.

मग?

क्षण दोन क्षण विचारांत गेले.

ती धिम्या पावलांनीं कोनांत बसविलेल्या तिजोरीकडे गेली.

जवळ जवळ दोन महिने अविश्रांत खपून कुठल्याशा कम्पनीकडे त्यांनीं कसलें एक कन्त्राट केलें होतें; त्याचे महत्वाचे दस्तऐवज अगदीं वरच्याच खणांत मघांशीं नटवरलालनें आणून ठेवले होते ते तिनें पाहिले होते त्यांच्यावर तिचें लक्ष गेलें. याच कागदांनीं जणूं तिला नटवरलालास भेटण्यास मनाई केली होती अशा आवेशानें तिनें त्यांच्यावर झडप घातली.

दुसऱ्या क्षणीं खिडकींतून आलेल्या मन्द झुळकीनें त्या कागदांचे फाडलेले तुकडे पायाखालच्या उंची रुजाम्यावर विखुरले.

नटवरलाल केव्हां आंत खोलींत आला हें तिला विकारांच्या धुन्दींत कळलें सुद्धां नाहीं.

"वरदे! काय केलंस हें? महत्वाचे कागद फाडून टाकलेस ना? छेः छेः काय म्हणावं तुला. तरी बरें कीं ओरिजिनल, अस्सल कॉपी मी पेढीवरच्या तिजोरींत ठेवली होती म्हणून. नाहीं तर वार्षिक पांच लाखांचं नुकसान करणार होतीस—पुनः असं करावयाचं नाहीं बरं?"

"वेडे उद्यां तुला पाहिजे तर तुझ्या नांवानें दोन लक्ष रुपये कुठल्याही देवस्थानास नाहीं तर संस्थेस देतों—लक्ष्मीची अशी बेअदबी करूं नये बरं? चल झोंप आतां—बारा वाजायला आले बघ. मला आज फार श्रम झाले आहेत मी झोंपतों."

थोड्याच मिनिटांनीं नटवरलाल दिवसाच्या श्रमानीं घोरूं लागला.

—आणि वरदा? आरामखुर्चीवर पडून त्या काळोखांतच मुस-मुसून रडूं लागली



# सुखाचा संसार

'कमा, हे बघ जरा इकडे ये!' गच्चीवरून शब्द आले.

'कशास? काय आहे तिकडं?' आंतल्या खोलींतून कुणी त्रासिक स्वरानें ह्मटलें.

'कमल! किती सुंदर चांदणं बाहेर पसरलं आहे. आणि वारा पण झुळुकाझुळुकांनी इतका सुन्दर वहातोय म्हणून सांगूं? चल थोडा वेळ आपण फिरून येऊं बागेंतनं,' गच्चीवरून कमलेच्या खोलींत येत उमाकान्त म्हणाला.

'अह, कमला फुरंगटून ह्मणाली.

'मग गच्चीवर तर बसू थोडा वेळ गप्पा मारीत—खरंच चांदण्यांत प्रेमळ माणसाच्या सहवासांत गप्पा मारीत बसणं यांत कांहीं और मजा असते—चांदण्या रात्रीं असें उंचावर बसून सभोंवार पाहिलें ह्मणजे मला तर जगाचा विसर पडतो. आकाशाकडे सारखं बघत राहिलं ह्मणजे तारका खचित आकाश अगदीं जवळ आल्यासारखं वाटतं. आणि आपण या मृत्युलोकाच्या हद्दींतून निसटून स्वर्गावर पोंचलों आहोंत असा मला भास होतो. चल उठ ना कमा, अस्सा सारा दिवस वाचीत असतेस. थोडा वेळ तरी मोकळ्या हवेंत नको का घालवावयास?

'पण बाहेर चांदण्यांत बसून मला असं विशेष तें काय लाभणार आहे?' कपाळास एक बारिकशी आंठी चढवीत कमलेनें प्रश्न केला.

'काय मिळणार आहे? आनन्द, पूर्ण सात्विक आनन्द' उमाकान्त ह्मणाला.

'पण तो बाहेर बसून मिळविण्यापेक्षां मला जर इथंच या पुस्तकाच्या वाचनांत मिळतो तर मग? यावर तुमच काय ह्मणणं आहे?' कमलेनें प्रश्न टाकला.

उमाकान्त वरमला, कमलेला समर्पक उत्तर त्याला सुचेना. पण तें न दाखवितां तो ह्मणाला 'तें कांहीं नाहीं, आज तूं माझं ऐकलंच पाहिजेस अशा सुन्दर, शान्त व शीतल वातावरणांत भरून राहिलेला आनन्द आपण क्षणभरसुद्धां चाखला नाहीं, तर मग ईश्वरानें हा निर्माण करून तरी काय फायदा? ऊठ कमल, तो गालिचा नेऊन गच्चीवर अंथर. मी हातपेटी घेऊन येतों. अशीं दोन सुन्दर पदें ह्मण कीं–तूं न ह्मटलींस तर मी ह्मणेन बापडा, साथ तर करशील कीं नाहीं माझी?' उमाकान्तानें तिच्या हातून पुस्तक लाडिवाळपणें काढून घेतलें व तिला आरामखुर्चीवरून बळजबरीनें उठविलें.

कमला उठली पण निरुपाय झाला ह्मणून. खुषीनें कांहीं नव्हे.

उमाकान्तानें गच्चीवर गालिचा नेऊन अंथरला, हातपेटी नेऊन त्यावर ठेवली व तो आंत येत ह्मणाला 'हं चला राणीसरकार.'

कमलेचा चेहरा रागानें अगदीं लाल झाला होता. राग दर्शविणें शक्य नसल्यामुळें जणुं काय नसानसांतून तो बाहेर पडण्यास धडपडत होता. आंतल्याआंत सन्ताप गिळीत तिनें गंभीर मुद्रेनें ह्मटलें.

'कृपा करून मला एक भीक घालतां का? तिच्या चेहऱ्यावर राग व तिरस्कार याचें मिश्रण अगदीं स्पष्ट दिसत होतें.

'कमल असं काय वरं करतेस? माझ्याकरतां एवढा क्षुल्लक स्वार्थ-त्याग करण्याची देखील तुझी तयारी नाहीं का?

कमल स्वस्थ उभी होती.

उमाकान्तच बोलूं लागला. 'फार वेळ बसायचं नाहीं कमल! फार तर अर्धा तास—मग सारी रात्र आहे तुझ्या स्वाधीन—सगळी रात्र वाच मग तुझें तें पुस्तक.'

उमाकान्तानें तिला नेऊन गालिच्यावर बसवलेंच. पेटीचा स्वर लावून त्यानें भाता हलविला.

'हं कुठल्या रागांतनं सुरुवात करायची' बागेश्री रागाचे स्वर चपल बोटांनीं भरकन काढले—सारें वातावरण प्रसन्न झालें.

'कां? मनांतनं राग आला ह्मणून तोंडांतून राग बाहेर पडूं नये असं आहे कीं का?' उमाकान्तानें आपल्या मतें कोटी केली व तो हंसला.

पण एक ना दोन. कमल अगदीं पुतळ्याप्रमाणें स्तब्ध होती. तिच्या वाचनाच्या ऐन रंगांत उमाकान्तानें तिचा विरस केला होता. व यानें तिचा मानी स्वभाव दुखल्यामुळें ती रडकुण्डीस आली होती. 'नव-ऱ्यानें आपणास सक्तीनें उठवून येथें आणलें व आपल्या वाचनाच्या तन्द्रीचा भंग केला, तेव्हां हे पुरुष बायका ह्मणजे आपली मालमत्ता समजतात कीं काय? हे पुरुष कितीही सुशिक्षित असले तरी मुद्यावर गोष्ट आली व ती आपल्यावर बेतली ह्मणजे यांची समता कुठं दडी मारून बसते?' हे असलेच विचार तिच्या मस्तकांत पिंगा घालीत होते.

'काय, नाहीं लागत तब्येत राणीसरकारांची? एक, फक्त एक भैरवी तरी? खरंच या शान्त वेळीं भैरवी किती छान रंगते सांगूं? ह्मण ना? उमाकान्तानें आग्रह करीत ह्मटलें.

कमला कांहींच हालचाल करीत नाहींसें पाहून त्यानें पेटी तिच्या-

पुढें केली व ह्मटलें — 'केलाच ना तूं तुझा हट्ट खरा? बरं ही पेटी घे, मी तरी ह्मणतों' त्यानें भैरवी रागिणीच्या स्वरांत एक खटकेबाज तान घेतली.

'हं काय म्हणूं? 'नइ जोबन बालिका?

कमलेनें पेटीस हातसुद्धां लावला नाहीं—उमाकान्ताच्या स्निग्ध व शान्त शब्दांनीं तिच्या अंतःकरणांत धुमसणारी वाफ द्रवीभूत होऊन अश्रुरूपानें डोळयांतून पाझरूं लागली. व त्या पाण्यांत उमाकान्ताचें मूळचेंच मृदु मन पार विरघळून गेलें.

कमलेच्या डोळयांत अश्रु पाहून उमाकान्त उलट रडकुण्डीस आला. त्याला कल्पना नव्हती कीं आपल्या वर्तनानें आपल्या कमलेस इतकें वाईट वाटेल ह्मणून.

त्याचें हळवें हृदय हळहळलें.

'कमल, चल वेडी कुठली. पूस ते डोळे. असं काय करतेस. खरोखरीच मला कल्पना नव्हती कीं माझें वर्तन तुझ्या डोळ्यांतून पाणी निघण्याइतकें कठोर झालं असेल ह्मणून! चल जाऊन झोंप, नाहींतर वाच पाहिजे तर—उगीच क्षुल्लक गोष्टीबद्दल का कुणी जिवास एवढ लावून घेतो?'

आपला अपमान झाला असतांनासुद्धां त्यानें तिला प्रेमानें उठविलें व तिला घेऊन तो आंत गेला. उमाकान्ताच्या या वर्तनानें कमलेस कसेंसेंच झालें पण आपला पराजय कबूल करण्यास तिचें मानी मन कबूल होईना. भावनाप्रधान उमाकान्त मात्र बागेंत जाऊन एका बांकावर बसला व दोन्हीं हातांनीं आपलें तोंड झांकून घेऊन बायकांसारखा रडूं लागला.

* * *

दुसऱ्या कीं तिसऱ्या दिवशीं रविवार होता. सन्ध्याकाळच्या प्रशान्त

समयीं उमाकान्त आपल्या लष्ट तम्बोऱ्याच्या तारा लावीत गच्चीवर बसला होता. थोड्या वेळांत त्याचें आयुध सज्ज झालें व तो गाऊं लागला. तो यमनचे स्वर आळवीत होता. त्या रागाच्या त्या सुन्दर विळम्पती चालू असतांनाच तम्बोऱ्याची तार तुटली. त्याचा विरस झाला. तो ती परत लावीत असतांना कमला गच्चीवर आली—तिच्या डाव्या हातांत एक मिटलेलें पुस्तक होते व खुणेकरतां तिनें आपलें बोट त्यांत घालून ठेवलें होतें. उजव्या हातानें गच्चीवरच्या वाऱ्यानें फडफडत असलेला पदर सांवरीत ती ह्मणाली.

'हें पाहिलंत का? विवाहजन्य प्रेमाची व आनन्दाची मीमांसा या लेखकानें किती सुन्दर लावली आहे ती?

तिनें वाचावयास सुरवात केली.

पण मधेंच तिला थांबवून उमाकान्त ह्मणाला, 'ती मीमांसा आपणास चाटावयाची का आहे? विवाहजन्य प्रेमाची व आनन्दाची चव आपण किती छान घेत आहों ती तूं पहात नाहींस का? तो बेटा आणि विशेष काय सांगणार?' उमाकान्त उद्वेगानें ह्मणाला.

'कमल खरंच सांगूं? मला आतां स्पष्ट कळून चुकलं कीं माझी निवड चुकीची झाली, आणि त्याचं प्रायश्चित आज आह्मां उभयतांस भोगावं लागत आहे. पण यांत माझा तरी काय अपराध? कॉलेजच्या गॅदरिंगच्या वेळीं तुझं काव्यगायन ऐकलं, दुसऱ्या कुठल्याशा प्रसंगीं पेटीवादन ऐकलं आणि वाटलं जर आपल्या आवडीनिवडी अशा जुळतात तर मनाची मिळणी खात्रीनं होईल व आपला संसार सुखाचा होईल, ह्मणूनच मी तुला मागणी घातली——मला कुठं ठाऊक होतं कीं तूं या संगीतादि कला आवडीनें कला ह्मणून न शिकतां केवळ शास्त्र ह्मणून शिकली आहेस——कुठल्याही विषयांत आपलें वैगुण्य राहूं नये ह्मणून जर

तूं हें संगीतशास्त्र शिकली आहेस असें मला कळलें असतें,—नुसता संशय सुद्धां आला असता तर—? पण आतां कशास हव्यात त्या गोष्टी. निदान घटस्फोट तरी आपल्या समाजांत रूढ असता, सर्वमान्य असता तर मी तुला खुषीनें काडीमोड करून दिली असती. परन्तु आतां काय त्याचं!

कमला अगदीं मर्मरी पुतळीप्रमाणें निश्चल उभीं होती.

'संगीतादि कला स्त्रियांनीं साध्य करावयाच्या आणि शुष्क शास्त्रांचा कीस हा आह्मा पुरुषांच्या वाटणीस यावयाचा. पण देवानें आपल्या बाबतींत केवढी ही घोडचूक केली. मला जर संगीताची आवड तर तुला शास्त्रीय निबन्धाइतकें दुसरें काहीं प्रिय नाहीं—खरंच देवा हा विजोड जोडा जमवून आणण्यांत तुला कोणता पराक्रम वाटला कोण जाणे!'

उमाकान्त भावनावेगानें आज कितीतरी बोलला. मुलांच्या खेळ-ण्याच्या मोटारीस दिलेली किल्ली सुटण्याचा अवकाश, ती अगदीं भरकन धांवते. उमाकान्ताच्या हृदयांत इतके दिवस धुमसणारा उद्वेग आजच्या क्षुल्लक कारणानें उफाळला.

* * *

'अरे मिस्टर उमाकान्त, आज असा उबगलेला कां दिसतोस?' दुसऱ्या दिवशीं सोमवारीं फिलिपनें—त्याच्याच ऑफिसांतल्या त्याच्या मित्रानें त्याला प्रश्न केला.

'बाबारे, तुला काय सांगूं? ही उबगण लागलीच आहे माझ्यामागें मरेपर्यंत' उमाकान्त उद्वेगानें ह्मणाला.

'अरे दोस्त अस काय करतोस, त्रासतोस कां असा? माझ्याकडे बघ, मी दिसतों कां तुला त्रासलेला कधीं? मग तूंच दुर्मुखलेला कां?

'बाबारे, काश्मीरच्या थण्ड हवेंत वावरणाऱ्या माणसांस मारवाडां-तील वाळवण्टी हवेची काय कल्पना येणार?'

'अरे उपमा नकोत—मी आपला साधा माणूस, मला त्या उपमान्‌ ती रूपकं नको आहेत.' फिलिप ह्मणाला, एरव्हीं तुझ्या माझ्यांत फरक तर कांहीं मला दिसत नाहीं. तुझं माझं वय एक, पगार एक, तो दुष्ट हेडऑफिसर सुद्धां एक! मग—?' फिलिप मजलेदार हंसला.

'फिलिप, मी परवां तुझ्याकडं चहाला आलों होतों कीं न... त्यावेळीं तुमचा तो सुखाचा संसार पाहिला आणि वाटलं कीं खरा भाग्यवान प्राणी आहेस तूं! खरंच मला अगदीं आनन्द वाटला, किती सारखे तुमचे स्वभाव. आवडीनिवडी—खरंच रे फिलीप मला तुझा हेवा वाटला. अगदीं राजानेंसुद्धां तुमच्या भाग्याचा हेवा करावा!'

'आणि तुझा रे उमाकान्त? तुझी बायको वादविवादास जर एकदां का बसली तर कुणाची माय व्याली आहे तिची मतं खोडून काढावयाची तिचं अफाट वाचन, सभ्य वर्तन—आपल्याला तर भारी आवडतंय बुवा.' फिलिप ह्मणाला.

'अरे तें खरं असेल पण तुला कल्पना नाहीं आमच्या आवडीनिवडींची व स्वभावाची; अरे बाबा, थोडक्यांत जर माझ्या तिच्या स्वभावांतलें अंतर सांगायचें झालं तर उत्तर दक्षिण ध्रुवांइतकें खास भरेल. माझं तोंड पूर्वेस तर ती पश्चिमेकडचें आपलें तोंड फिरवणार नाहीं.'

'वेडा आहेस तूं उमाकान्त, अरे असं चालायचंच- माझी हकिगत तुला ठाऊक नाहीं- माझ्या सुखाच्या संसाराची गुरुकिल्ली तुला ऐकायाची आहे कां?

'हो हो तर!' उमाकान्त उत्सुकतेनें ह्मणाला.

ऑफिसच्या मधल्या सुट्टींत फिलिपनें आपली हकिगत सांगितली.

'माझ्या सुखाच्या संसाराचा इतिहास ऐकायाचा आहे ना आतां तुला?' फिलिपनें एक सिगारेटचा झुरका मारीत ह्मटलें.

‘माझं लग्न झालं व त्यानन्तर मला कळलं कीं माझ्या पत्नीस संगीताची फार आवड असून ती गाण्या वाजविण्यांत पूर्ण तरबेज आहे. ती रसिक व मी हा असा अरसिक, माझ्या या अरसिकपणानें ती मनांतल्या मनांत कुढूं लागली, तिनें सुन्दर गाणें ह्मणावें आणि मला तर तिला शाबासकी देण्याचेंही ज्ञान नव्हतें — तिला नेहमीं वाटे कीं मीं तिचें कौतुक करावें, आणि असे कांहीं दोनचार चमत्कारिक प्रसंग घडले कीं मला माझी चूक स्पष्ट कळून चुकली. संसार जर सुखासमाधानाचा करावयाचा असेल तर पतिपत्नी हीं एकाच मनोवृत्तीचीं असावयास पाहिजेत दोन परस्पर भिन्न जीवांचा लग्नानन्तर एकजीव झाला पाहिजे—माझ्या कोमल मनोवृत्तीच्या पत्नीस माझ्या जडाभ्यासाची संवय लावणें शक्यच नव्हतें—कोमल वेल विरुद्ध दिशेनें वळवतांना तुटण्याची भीति फार असते. आतां राहतां राहिलें मी तिच्या सारखें होणें. आणि मी हळुहळू तोच बेत पसन्त केला. आणि माझ्या वर्तनांत हा फरक–ही क्रांति घडवूनही आणलीं. प्रथम प्रथम मला मनस्वी त्रास झाला. पण मग हळुहळू तो जीवनक्रम माझ्या अंगवळणी पडला. तो इतका कीं मीं पुरा बदलून गेलों. मला अभिमान वाटतो सांगायास कीं, मीं माझ्या जुन्या मनोवृत्तींचा होम करून त्यांतून सुखी जीवन निर्माण केलं— ’ फिलिप तद्रुपतेनें बोलत होता.

उमाकान्तास हें पटलें, अगदीं पुरेपूर पटलें.

आपण कमलेवर आपल्या इच्छेची सक्ती कां करावी? आपणास तो अधिकार कुणी दिला? फिलिपप्रमाणें मीं माझ्या पत्नीच्या आवडीसारखें कां बनूं नये? त्याला या विचारांत पूर्ण सत्य दिसलें आणि त्यानें तो विचार अंमलांत आणण्याचा निश्चय केला.

—आणि दुसऱ्याच दिवशीं दुपारीं कमलेस नकळत उमाकान्ताची आवडती पेटी, तम्बोरा व ग्रामफोन जुना माल विकत घेणाऱ्या व्यापाऱ्या-

कडे गेला व त्याच दिवशीं तारापोरवाल्यास उत्तमोत्तम शास्त्रीय ग्रंथाची ऑर्डर मिळाली.

... ग्रंथ संग्रहालय ...
अ. क्र. ९७३८
वाचनालय ...

# अनुताप

दुर्गाकडे मी चोरून एक लावून पहात असतांना माझ्या विभावरीनें मला पुष्कळदां पाहिलें असावें, बाकी त्या गैरसावध स्थितींतसुद्धां मी तिच्या दृष्टीस पडूं नये ह्मणून काळजी घेत असें, पण माझ्या कलोपासक दृष्टीला दुर्गाची एखादी सुन्दर पोझ ती काम करीत असतांना दिसली ह्मणजे मी देहभान विसरत असें. तिची ती पोझ मनांत अगदीं पुरी ठसेपर्यन्त मला तेथून नजरच काढवत नसे, आणि नेहमीच मला तिचें पुरें निरीक्षण करण्यास मिळण्यापूर्वीच ती इतर कामास निघून जाई. तिला बिचारीला कुठून ठाऊक असणार कीं मी तिची पोझ घ्यावयाला बसलोंय ह्मणून! आणि एरव्हीं मी जरी चित्राकरतां बसावयास आग्रह केला असता तर ती केव्हांही बसली नसती हें एक, आणि नेहमींच्या वागण्यांत एक नैसर्गिकपणा असतो तो मुद्दाम बसवून का कुठं मिळत असतो?

दुर्गास बनवतांना, एरव्हीं कांटेकोर मारवड्याप्रमाणें वागणारा विधाता कुठें तरी घसरला खास. नाहीं तर एवढा प्रेमळपणा, कर्तव्यदक्षता, निर्मल अन्तःकरण इत्यादि गुण एके ठिकाणीं सामावणें फार कठीण असतें. साध्या चालींतला तो आकर्षकपणा, अवयवांतल्या हालचालीतलें कलात्मक माधुर्य, पोषाखांतला निटनेटकेपणा सगळं कांहीं सुन्दर नी

आकर्षक! कलोपासकाची दृष्टि सुन्दर वस्तूकडे वेधायची नाही तर कुठं ?

माझ्या ज्या चार चित्रांना बक्षिसें मिळालीं होतीं तीं सारीं मी तिच्या निरनिराळ्या सुन्दर पोझवरूनच तयार केलेलीं होतीं एकप्रकारें माझ्या चित्रकलेंतल्या उत्कर्षाची ती आधारभूत व्यक्ति होती हें केव्हांही कबूल केलें पाहिजे.

परवां काय झालें, माझ्या बंगलीच्या मागच्या बाजूस माझ्या नेहमींच्याच ठिकाणीं मी चित्रफलक व रंगसामान घेऊन बसलों होतों — येत्या प्रदर्शनांत एक बक्षिस खात्रीनं मिळवायचं असें ठरवूनच मी बसलों होतों—चित्राची स्केच पुरी झाली. दुर्गाची एक सुन्दर पोझ मला फार आवडली होती आणि त्यावरूनच मी तें चित्र तयार करीत होतों.

दुपारचा सुमार होता, बाहेर उन्ह अगदीं कडक पडलें होतें पण माझ्या बंगलीच्या आवारांत मी इतकी दाट झाडी राखली होती कीं मला उन्हाळ्यांत सुद्धां उष्णतेचा सम्पर्क होत नसे. अगदीं क्षुल्लक झुळकेनेंसुद्धां हालणारीं माडांचीं चुडतें मला वारा घालण्यास नेहमीं सुसज्य असत, आणि व्हरांड्यांत मीं कुंड्यांतून लावलेलीं व जोपासना करून वाढवलेलीं गुलाबाचीं रोपटीं माझ्याविषयींची कृतज्ञता दर्शवण्याकरतांच कीं काय नेहमींच फुलत आणि आपल्या सुवासानें व सौंदर्यानें मला आनन्दवीत असत.

काढीत असलेली स्केच पुरी होतांच मी पेन्सिल टाकून दिली, हात झटकले, बोटांना आलेला थकवा घालविण्याकरतां बोटें मोडून हात जरा चोळले व जरा दूर अन्तरावर निरनिराळ्या ठिकाणीं राहून माझी कृति न्याहाळली. मला अगदीं पाहिजे तशीच ती निघाली होती. मला आनन्द वाटला. कलानिर्मितीचा आनन्द कांहीं और असतो; त्या भरांत मी माझी

सिगार शिलगावली. त्या तन्मयावस्थेंत माझ्या कृतीचें मनाशीं कौतुक करतांना माझी नजर सहज बागेकडे वळली.

बागेंत दुर्गा उभी होती. ती अगदीं साधेंसुधें पाढरें शुभ्र पातळ नेसली होती, पण किती चुणीदार नी आकर्षक. जणुं एकाद्या पुतळयाचें वस्त्रच.

साबण लावून धुतलेल्या माझ्या धोतरांचे पिळे तिच्या हातांत होते. तिनें ते एका स्वच्छशा जागेवर खाद्यांवरचा टुवाल टाकून त्यावर ते ठेवले व त्यांतील एक घेऊन तिनें तो झटकला. सुकल्यानन्तर धोतरास सुरकुत्या राहूं नये ह्मणून तिनें तें दोनदां आलटून पालटून निऱ्या काढून झडकलें तेव्हां कुठें तिच्या मनासारखें झालें.

मला आनन्द व अभिमान वाटला. माझ्या धोतरास नुसती सुरकती राहूं नये ह्मणून तिची केवढी आटापीट चालली होती, आणि तीही मी न सागतां,—खरंच इतकीं प्रेमळ, कर्तव्यदक्ष व स्वतःचें घर समजून काम करणारीं गडी माणसें मिळावयास भाग्य लागतें.

माडांस उंच बांधलेल्या सऱ्यांवर तिनें एकमागून एक वाळत घातलीं. तिची सगळी हालचाल अगदीं कलापूर्ण होती. मी मुग्धपणानें तें दृश्य पहात होतों.

शेवटीं एकच राहिलेलें धोतर तिनें झटकलें, आणि तिचें लक्ष तितक्यांत कुठं वेधलं कुणास ठाऊक.

तें धोतर तसेंच डाव्याहातावर अर्धें टाकून उजव्या हातांत त्याचा अर्धा भाग वाळत घालण्याच्या तयारींत घेऊन ती कुणीकडेसें पहात होती, अगदीं अनिमीष नजरेनें न्याहाळून पहत होती. ती काय पहात असावी याचा मला अन्दाज लागला नाहीं, पण—

त्या स्थितींत तिच्या देहाला आलेली मनोहर बांक कुतुहलानें दीप्त

झालेली ती गहिरी नजर व त्यामुळें विस्तृत झालेले तिचे ते डोळे, क्षणभर देहभान विसरल्यामुळें वक्षस्थलावरचा ढळलेला पदर व त्यामुळें चोळींतून उठून दिसणारीं अर्धवर्तुळ वक्षस्थळें, सगळें कांहीं उन्मादकारी व विलोभनीय दिसत होतें. माझ्यासारख्या कलाप्रेमी व कलोपासकाला तें दृश्य अगदीं रम्य वाटलें. मनांत चटकन एक कल्पनासुद्धां येऊन गेली. त्यावेळीं जर माझ्यापाशीं कॅमेरा असता, तर तिच्या सूक्ष्म हालचालींची केवढी मोठी फिल्म घेतां आली असती व मग त्यावरून जगाला वेड लावणारें चित्र--च् च् च्. माझी दृष्टी तेथून हलेचना— वाटलं हें दृश्य डोळयांवाटे हृदयांत उतरवून सांठवून ठेवावें. प्रदर्शनाकरतां मीं जें चित्र तयार करीत होतों, ज्याची स्केच मी नुकतीच पुरी केली होती तें चित्र आजच्या या दृश्यापुढें अगदींच कलाहीन व निःसत्व वाटूं लागलें.

एखादें गूढ उकलीत असतांना पुष्कळशा नव्या नव्या गोष्टी कळाव्या त्याप्रमाणें मला दुर्गांत आज नवनवें सौंदर्य दिसूं लागलें.

'बस्स ठरलें!' प्रदर्शनाकरतां जें चित्र करावयाचें तें आजच्या या विलोभनीय दृश्यावरूनच करायचें, पार्श्वभूमी तेवढी बदलली म्हणजे झालें. मी मनाशीं निश्चय केला.

'काय ठरलं?' विभावरी अचानक कुठून माझ्यापुढें येऊन उभी राहिली, कल्पना नसतांना एखादेवेळीं मेघांचा भयंकर गडगडाट होऊन वीज चमकावी तसं मला वाटलं--मी क्षणभर दचकलों आणि ओशाळलोंही— मी अपराध्याप्रमाणें मान खालीं घातली, विभावरीच्या डोळयांतील तो अंगार मला सहन होईना. —आणि जरा वेळानें मी वर मान केली त्यावेळीं मला काय दिसलें—

आगीनें जळून जाऊन एखादा रमणीय प्रदेश भकास व उजाड व्हावा, तीच भकासता व भेसूरता मला विभावरीच्या डोळयांत दिसली.

असें कां व्हावें ?–मघांशी माझ्या विभेच्या पाणीदार डोळयांच्या शिंपल्यांत आनन्दाचे मोती नाचत होते, त्यांत ही क्रोधाची व दुःखाची माती कां कालवली जावी ? मला अत्यंत वाईट वाटलें भावनाप्रधान माणसाचें असेंच होत असावें.

मीं विपण्ण चित्तानें त्या चित्राकडे आणि दुर्गानें वाळत टाकलेल्या धोतरांकडे आळीपाळीनें पहात होतों. आणि विभा फुत्कारीत होती. तिला बोलण्यास कशी सुरवात करावी हें कळत नव्हतें.

"आजच नाहीं, मीं किती तरी दिवसांपासून पहात आहें. अशा बेमुर्वत व अभिलाषी नजरेनें तुम्हीं तिच्याकडे पहातांनां मीं तुम्हांस कैक वेळां पाहिलं आहे, पण बोलतें मात्र आजच, हृदयांत दडवून ठेवलेला हा भार मला आतां सहन होत नाहीं. या भारानें माझ्या हृदयाचे बंध तुटूं पहातात, आज मला हा भार ओकून टाकलाच पाहिजे—

—"तुम्हां शिकल्यासवरल्या माणसांस हे चाळे शोभतात का ? कला व नीति यांचा सम्बध नाहीं हें तत्व तुम्हीं आज बोलून दाखवितां, त्याप्रमाणेंच कलावन्तांचा व नीतीचाही सम्बध नाहीं हं तुमचें मत असणार, आतां हें बोलायला जरा कचरतां येवढेंच—आणखीं कांहीं काळानें, कलावन्तांनी कलावंतिणींप्रमाणें नीतीचा मुलाहिजा ठेवतां कामा नये असेंच तुम्हीं प्रतिपादन करणार, नव्हें ?" विभावरी फुत्कारली ! सिंहाची गर्जना पुरवली, पण नागिणीचा फुत्कार धैर्यवान माणसांच्या अंगावर देखील शहारे आणतो.

"छे छे. विभा उगीच अर्थाचा अनर्थ करून डोक्यांत राख घालून घेतेस" मला पुरें बोलूं न देतांही विभा मधेंच ह्मणाली—

—'आणखी अनर्थ तो काय व्हायाचा आहे, तुमची ही वेलगामी व वेछूट मनोवृत्ति काय अनर्थ करणार नाहीं ? आणि या करण्यानीं संसा

रास आग लागल्यावर त्याची राख माझ्याच डोक्यांत घालून घ्यावी लागेल.

विभावरी उत्तराकरतांही थांबली नाहीं.

'च् च् च्. दुर्गाचा आणि माझा काय संबंध आहे. हें हिला ठाऊक का नाहीं? मग? स्त्रियांना देवानें विशालदृष्टी दिलीच नाहीं कां?' मला कसेंसेंच होऊं लागलें—मी धाडकन् आरामखुर्चीवर अंग टाकलें.

—त्याचवेळीं आंतल्या खोलींतून कोणीसें खोल सुस्कारलें—मीं आजूबाजूंस पाहिलें, कुणीही नव्हतें—खोलींत कुणाचींशीं भारावलेलीं पाऊलें जमिनीवर वाजलीं आणि तींही किती मन्दपणें! चालणाऱ्या माणसाच्या भारावलेल्या जड अंतःकरणाचा भारच जणुं त्या पावलांना साहत नव्हता, हृदयांत दाटलेल्या खिन्नतेमुळें पाऊल उचलवत नव्हतें.

मी चमकून पाहिलें--दुर्गा तर तेथें नव्हती ना?

*　　　*　　　*

माझे चार दिवस मनस्वी मनस्तापांत गेले—विभेवर माझें फार प्रेम होतें आणि तिनें अबोला धरला होता, क्षुल्लक गोष्टीवरूनसुद्धां ती त्रागा करीत होती. मनाच्या त्या अवस्थेंत केवळ मनःशांती करतां मी तें चित्र, दुर्गाच्या मनोहर पोझचें चित्र पुरें केलें. तेव्हां कुठें जरा मला बरें वाटलें.

माझें चित्र पुरें झालें. त्या दिवशींचीच गोष्ट, विभेसही आपल्या वागण्याचा पश्चात्ताप झाला असावा, पण तो व्यक्त करण्याचें मनोधैर्य मात्र तिला होत नव्हतें. आज बऱ्याच उशिरां मीं घरीं आलों, चार वाजतां मित्रांकडे बसायाच्या निमित्तानें घराबाहेर पडलों होतों; टेबलावर एक पत्र माझी वाट पहात होतें. मीं तें फोडलें आणि वाचूं लागलों, माझे डोळे भरून आले.

पत्र तसेंच हातीं घेऊन मीं घरांत गेलो. विभा कायसें करीत होती मींच बोलावयास सुरवात केली.

'विभे, आज दुर्गा कुठं गेली? तूं तर तिला कांहीं बोलली नाहींस ना?'

'मीं कशाला बोलूं?' विभा जरा तोऱ्यानेंच ह्मणाली.

'मग? दुर्गा कुठं गेली?'

'मला तर ती ह्मणाली कीं आज आपणास आपल्या एका मैत्रिणीस भेटावयास जावयाचें आहे व त्याकरतां आपण तुमची परवानगीही घेतली आहे, तेव्हां मी बापडी तिला कशास अडकवून ठेवूं?

'मीं आणि परवानगी दिली आहे? काय ह्मणतेस तूं! आज चार दिवस ती माझ्याशीं बोलली सुद्धां नाहीं—'

'मी खोटें का सांगतें? ती आली ह्मणजे विचारा पाहिजे तर'

'ती आतां कुठची परत येते—मी हताशपणानें ह्मणालों.

'ह्मणजे' विभा आश्चर्यचकीत होऊन ह्मणाली.

'ह्मणजे काय! हें बघ, घे वाच'

मीं ते पत्र विभेच्या अंगावर फेकलें.

विभावरी वाचूं लाली. दुर्गानें लिहिलें होतें:—

भार्गवदादा यासः—

माझे शतशः नमस्कार

मीं परवांचा तो प्रसंग पाहिला आणि ऐकलाही, मला पूर्णपणें कळून चुकलें कीं वहिनीच्या मनांत आमच्याविषयीं संशय उत्पन्न झाला आहे, आणि तो गैरसमज कसा दूर होईल याचाच विचार गेले दोन तीन दिवस मीं करीत होतें, पण परिणामकारक उपाय मला सुचत नाहीं, पण एकच एक गोष्ट मनास पटली ती ह्मणजे मी येथून नाहींसें होणें आणि तेंच तर आज मीं करीत आहे—एक दोनदां विभावहिनीच्या मनांतलें संशय पिशाच्च घालविण्याचा मीं प्रयत्न केला. पण तो अपयशस्वी ठरला. इतकेंच

नव्हे तर त्या करून बसलेला त्यांचा ग्रह जास्त दृढ झाला दिवा मालवण्या-करतां त्यावर वारा घालावा, आणि त्यामुळें तो न विझतां जास्त भडकावा तसें झालें. त्यांचा गैरसमज दूर करण्याचें सामर्थ्य माझ्या शब्दांत नाहीं.

मला शोधण्याचा तुह्मीं प्रयत्न बिलकूल करूं नका, त्याचा किंचितही उपयोग होणार नाहीं अशीच तयारी करून मी बाहेर पडत आहें.

भार्गवदादा, बाबांनीं मीं घरच्या गरीब मोलकरणीची पोर हें लक्षांतसुद्धां न घेतां माझा, एका अनाथ अर्भकाचा प्रतिपाळ केला. त्यानीं मला मुलासारखं वागविलं आणि गरजेपुरतं शिकवलंही, आणि त्यांच्या पश्चात तूं मला लहान बहिणीचा मान दिलास. अशा गोष्टी करणारीं उदार हृदयाचीं देवमाणसें दुनियेच्या बाजारांत मिळत नसतात रे— आणि विभावहिनीच्या मनांत आतां कुठला सैतान संचारला देवास माहित.

भार्गवदादा मी जर तुला परका मानलें असतें, तर आभारप्रदर्शनाचें अवडंबर माजवून पत्र भरून टाकलें असतें—भावानें बहिणीकरितां केलेला स्वार्थत्याग कां कुठं मोजतां येतो? आणि त्याबद्दल कोण आभार मानतो?

मला जें काय वाटतें तें लिहितां येत नाहीं तूं जर या तुझ्या बहि-णीला पुरं ओळखलं असशील तर मला काय वाटतें, माझ्या अंतःकरणांत तुमच्याबद्दल काय वसत आहे हें तुम्हांस मीं न लिहितांही कळेल अशी खात्री आहे.

विभावहिनीच्या मनांतली संशयाची अभ्रें जर कधींकाळीं वितळलीं तर मीं मला स्वतःला धन्य समजेन.

आणि काय लिहूं?—लिहिलें तेंच पुष्कळ झालें

तुझी मानलेली बहिण

दुर्गा—

मीं विभेकडे पाहिलें. तिच्या डोळ्यांतून अविरल अश्रुप्रवाह होत होता. दुर्गानें लिहिल्याप्रमाणें तिच्या मनांतली संशयाची अभ्रें तर वितळून डोळ्यांतून पाझरत नव्हतीं ना?

म. फ. ..., ...
... नं. 7332 मौ. दि. ...
वि. कथा

# खुनी !

‘दादा गरिबाला एक पैसा देतां कां?’

केंविलवाण्या शब्दांनीं माझें लक्ष वेधून घेतलें मीं मोटारींत चढतां चढतां थबकलों.

तिला मी पाहिलें मात्र, मला अगदीं कसेंसेंच वाटूं लागलें, मूर्तिमन्त कारुण्य, दारिद्र्य व दुर्बलता मानवी स्वरूप घेऊन माझ्यासमोर उभी तर राहिली नाहीं ना? असा क्षणभर मला भास झाला.

तसें पाहूं गेल्यास तिचें वय फारसें नसावें—असेल पंचवीशीच्या अलिकडे. ठिकठिकाणीं फाटलेलें लुगडें तिच्या आक्रसलेल्या देहाची देखिल लाज झांकण्यास समर्थ नव्हतें. त्याचा मुळचा रंग–? कुणास ठाऊक कसला होता तो, पण त्यास आतां जो मळका रंग प्राप्त झाला होता त्यास नांव नव्हतें. फाटक्या चोळींतून बाहेर डोकावणारे ते चिंबलेले स्तन दारिद्र्याची आत्यंतिक सीमा दर्शवीत होते. शरिरयष्टी पाण्याच्या अभावीं मरावयास टेकलेल्या शुष्कपर्णाच्छादित केळीप्रमाणें दिसत होती, आणि फाटक्या कपड्यांबाहेर डोकावणाऱ्या हातांपायांच्या काड्यांना तर उपमाच देववत

नव्हती—चेहऱ्यावर तर मांसाचा लवलेश दिसत नव्हता—कपाळाची करवटी अगदीं स्पष्ट दिसत होती व कानशिलांवरील शिरा आपलें अस्तित्व स्पष्ट दर्शवीत होत्या. गालांचीं हाडें खूब वर आलीं होतीं व त्यामुळें तिचे डोळे खोल विहीरीच्या मुळाशीं पाणी दिसावें त्याप्रमाणें त्या खांचांत लुकलुकत होते. नेहमीं तुडुंब भरून असणारा तलाव आवर्षण पडून शुष्क व्हावा व त्यामुळें त्याचें अंतरंगांतलें दैन्य प्रतित व्हावें तसे तिचे डोळे दिसत होते. आतां पूर्ण निस्तेज व भकास दिसणारे डोळे एकाकाळीं फार तेजस्वी व सुन्दर असावे असें अनुमान त्यांच्या सुबक ठेवणीवरून करणें चुकीचें ठरलें नसतें. डौलदार, सुन्दर व भरगच्च केशकलाप मात्र धनिनीशीं अजून बेईमान झाला नव्हता, कित्येक महिने तेल आणि फणीचा संपर्क न लागल्यामुळें केसांच्या जटा झाल्या होत्या पण त्याचा संभार मात्र तिळभरही कमी झाला नव्हता.

एवढे हे विचार एका क्षणांत माझ्या डोक्यांत येऊन गेले. पावसाळ्यांतील काळोख्या रात्रीं चटकन वीज चमकावी व क्षणमात्र सारा प्रदेश दृग्गोचर व्हावा तसें झालें—

मीं थबकलेला पहातांच तिला वाटलें आपणांस कांहींतरी भिक्षा मिळेल. ती लाचारीनें जवळ आली. तें मूर्तिमंत दैन्य पाहून माझें अंतःकरण कळवळलें.

मी खिशांत हात घातला. मोडीचे पैसे नव्हते. पाकिटांत फक्त नोटीच होत्या. वेड्यासारखी मी रुपयाची नोट काढली, पण पैशाचा मोह फार कठीण असतो. मीं परत ती आंत कोंबली.

—पण तिची ती दीन मुद्रा पहावेना—मी भावनावेगानें परत तीच नोट काढली व तिच्या हातावर ठेवली व मोटारींत बसलों.

तिचे डोळे भरून आले—त्या अश्रूंत रुपया मिळल्याच्या आ-

नंदापेक्षां कृतज्ञताच पुरेपूर भरली होती. हे मला स्पष्ट दिसलें. पैसा दोन पैसे मिळण्यास कोण मारामार पडते. मग रुपयाची नोट हातावर पडणें ह्मणजे काय कमी आश्चर्याची गोष्ट? जेथें हिमकण दिसत नव्हता तेथें हिमालय उभा केल्यास कोण भांबावणार नाहीं?

ती आभार मानण्याचें नुसतें 'देव तुमचं भलं करो' असं ह्मणण्याचं देखील विसरून गेली.

कोणीसें मागें बोललें.

"रावसाहेब तुह्मीं अपात्रीं दान केलेंत. ही एक महाभयंकर बाई आहे. तिच्या साळसूद चेहऱ्यावर जाऊं नका —ही हडळ खुनी आहे."

मी मागें वळून पाहिलें. मागच्या सीटवर एक वयस्क गृहस्थ बसला होता.

ही बाई आणि खुनी? मला कल्पनाच असह्य झाली, अणि मी ह्मणलों मुद्धां "ही बाई आणि खुनी? उद्यां मुंग्यांनीं हिमालय उचलला नाहींतर समुद्र पिऊन टाकला या सारखें असंभाव्य तुह्मीं सांगाल" मी हेटाळणीनें हंसलों. मला त्या गृहस्थाचा अंतर्यामी राग आला होता.

"मीं खोटं का सांगतो, ऐकणार कां हिची हकिकत?

"मीं मानेनेंच अनुमती दर्शविली.

पॅसेंजर अजून पुरे भरले नव्हते, शॉफर विड्यांच्या दुकानीं एका तिपाईवर बसून विड्या फुंकित होता.

*   *   *

हिचं नांव हिरा?

गेल्या चार पांच वर्षांत जर तुम्हीं हिला पाहिली असती तर? वर्णन कशाला करून सांगूं साऱ्या म्हाडदोळांतच नव्हे तर उभ्या अंत्रुज महालांत इच्यासारखी सुन्दर कलावंतीण नव्हती. तिच्या सहवासास आतुर

झालेले रंगेल शौकड्यांनीं रक्कम मोजावयास तयार होते — हिची आई आपल्या धन्द्यांत उत्तम कसलेली असल्यामुळें सगळ्यांस तिनें झुलवीत ठेवलें होतें, हेतु हा कीं जो जास्त पैसा देईल त्याच्याशींच तिची "हात लावणी" (मधुचन्द्र) साजरी करावयाची. शेवटीं एका रंगेल गुजरानें सव्वा हजाराचा सोन्याचा साज व दोनशें रुपयांचा शालू तिला नेसविला. यावरून तुह्मांस तिच्या सौंदर्याची कल्पना येईल. मला तर ऐकूनसुद्धां माहित नाहीं कुणा कलावंतिणीनें एवढी रक्कम घेतल्याची.

झालें, त्याचा दीड हजार दीड महिन्यांतच सम्पला. आणि त्यानन्तर किती उल्लू तरुणांनी आपलीं घरें धुळीला मिळवून या चांडाळणीचें दार भरलें, आणि शेवटीं येथल्या बाबू सावकाराचा मुलगा केशव इच्या नावडींत सापडला, अगदीं पुरा इच्या अहारीं गेला. एरव्हीं पोर किती सालस आणि शहाणा, पण इनं कसलं चेटूक करून त्याला मारून टाकला होता देव जाणे !

केशवनें अगदीं ठरवून टाकलें कीं आश्विनशेटप्रमाणें हिलाच आपली पत्नी करावयाची. त्याच्या वडिलांना ही गुणगुण कळली पण त्यांनीं तिकडे त्यावेळीं विशेष लक्ष दिलें नाहीं — कारण त्यांना वाटलं असावं कीं श्रीमन्तांच्या मुलांनीं एखादं अंगवस्त्र बाळगलं तर त्यांत विशेष दोषार्ह असें काय आहे ?

पण लवकरच त्यांची ही चूक त्यांच्या नजरेस आली.

केशवास जेव्हां थोरा मोठ्यांच्या मुली सांगून येऊं लागल्या तेव्हां सारा प्रकार उघडकीस आला — केशवनें आपण लग्न करणार नाहीं असें अगदीं चक्क सांगितलें.

बाबू सावकारानें प्रथम प्रेमानें, नन्तर रागानें, अगदीं हरतऱ्हेनें समजाऊन सांगितलें, तूं नुसता लग्न करतों ह्मण, मग पाहिजे तर

हिरेला जन्मभर राख ठेव असेंसुद्धां त्यांनीं त्याला सांगितलें. पण एकनिष्ठ प्रेमाच्या कैफानें धुन्द झालेल्या केशवनें सारें धुडकावून लावलें.

साम, दाम, दण्ड, भेद सगळे झाले. केशव कांहीं आपल्या निश्चयापासून ढळला नाहीं. इतका त्याला या डांकिणीनें भारला होता.

शेवटीं बाबू सावकारांनीं एक अचुक युक्ती काढली आणि तिचा अगदीं सोळा आणे उपयोग झाला.

त्यांनीं केशवास बोलावून घेतलें आणि विचारलें.

"केशव तूं या सांगून आलेल्या मुलींशीं लग्नच करणार नाहींस कां?"

"नाहीं" केशवनें स्पष्ट उत्तर दिलें.

पण हा जो एवढा स्वार्थत्याग तूं करतो आहेस त्यास ती हिरा योग्य तरी आहे का"

"अलबत! तिच्या इतकी योग्य स्त्री दुनियेंत लाभणार नाहीं" हिरेच्या मादक प्रेममदिरेनें धुंद झालेला केशव उत्तरला.

" अस्सं? इतकी खात्री तूं कशाच्या जोरावर देतोस?"

"कशाच्या ह्मणजे? मी माझ्या स्वतः इतकाच तिला ओळखतों."

"अस्सं? मग प्रत्यक्षास प्रमाणं नकोत. तसं झालं, ती जर माझ्या कसोटीस उतरली तर तिला सून म्हणून अंगिकारण्यास मला केव्हांही कमीपणा वाटणार नाहीं" सावकारानीं उत्तर दिलें.

"होय का? सांगा तर मग. तुम्हीं सांगाल तें दिव्य मी तिला करावयास लावतों. माझ्याकरतां ती प्राणसुद्धां देईल मग इतर गोष्टींची काय कथा." केशव आनन्दून ह्मणाला.

"मी सांगतों. वेश्यांना वित्ताशिवाय दुसरं कांहीं मोठं नसतं— हिरेस ह्मणावं कीं आम्हीं तूर्त अडचणींत आहोंत तेव्हां दोन महिन्याकरतां

तुझे एकंदर सगळे दागिने दे—आणि तिनें जर ते दिले तर तुला पाहिजे तसें करण्यास मी संमति देईन

"ऐकतांना रावसाहेब–" बोलतां बोलतां तो इसम माझी जिज्ञासा जास्त प्रज्वलीत करण्याच्या हेतूनें ह्मणाला.

मी मानेनेंच होकार दर्शविला.

—आणि तो पुढें सांगू लागला.

" आणि ऐन मुद्यावर येतांच सारा इमला गडगडला—किती झालं तरी वेश्या. जातीवर ही जायचीच—हिनं स्पष्ट नकार दर्शविला आणि बिचाऱ्या केशवनें भावनेच्या भरांत या हिरेपायीं हिरकणी खाऊन प्राण दिला—तुम्हींच आतां सांगा? या खुनाची, मृत्यूची म्हणा हवीतर नैतिक जबाबदारी या चांडाळणीवर नाहीं कां पडत?

"पापाचा पैसा तरी कुठं राहातोय? तो आल्या पावलींच गेला. हिची ही अशी वाताहात झाली आणि हातीं ही नरोटी आली."

तो अगदीं मनापासून बोलत होता.

मी सहज जिज्ञासेनें विचारलें—

'तुम्हांस ही इतकी बित्तम्बातमी कशी लागली?'

'अहो काय सांगू तुम्हांला? त्या दुदैवी केशवचा मी मामा' तो कपाळावर हात मारून म्हणाला.

मीं वळून त्या भिकारणीकडे पाहिलें, ती पण तिथेंच उभी होती. मला वाटलं ती गेली असेल—आपला घाणेरडा पूर्वेतिहास ऐकत कोण उभा रहाणार?

पण माझा अन्दाज चुकला—ती तेथेंच उभी होती व थरथर कांपत होती. तिचें हे कांपणें भीतीचें कीं रागाचें होतें कुणास ठाऊक. पण तिच्या डोळयांतून अश्रुप्रवाह मात्र चालला होता.

मीं तिच्याकडे रोखून पाहिलें—हें खरं ना? असं विचारण्याचा माझा मानस होता पण त्या पूर्वीच ती बोलूं लागली.

'तुम्हीं त्यांचे मामा ना? ऐका तर मग—तुम्हींच तें ऐकावें अशी माझी इच्छा आहे. जी गोष्ट आजपर्यन्त मी कोणाजवळही बोललें नाहीं ती आज प्रथमच तुमच्यापुढें बोलतें—आणि हें बोलणें शेवटचेंच आहे. या पुढेंही कोणाजवळ मी ती गोष्ट बोलणार नाहीं—माझ्याबरोबरच ती माहिती नष्ट होणार होती परन्तु ओघास आलें, आणि माझ्या या उपकार कर्त्यासमोर तुम्हीं माझी बदनामी केली म्हणूनच मला बोलावं लागलं, आणि हृदयांत दडवून ठेवलेलं कटु सत्य उजेडास आणाव लागलं. पण हें पत्र वाचा.'

तिनें आपल्या मळक्या चोळीच्या फाटक्या खिशांत ठेवलेलें एक पत्र काढलें, वर दोन चार कागदांची आवरणें होतीं.

'हं, मोठ्यानें वाचा—यानां ऐकूं द्या' ती ह्मणाली.

मीं मोठ्यानें वाचावयास सुरवात केली.

माझ्या हिरेस,

—कोणत्या तोंडानें मीं तुला सांगूं? तुझी केवळ परिक्षा पहाण्यास ह्मणून माझ्या वडिलांनीं अडचणीची थाप देऊन माझ्याकडून तुझे दागिने आणावयास सांगितले पण मला लगेच कळलें कीं तें सोंग होतें—तुझे दागिने त्यांच्या तिजोरींत पडले ते कायमचे—तुझे हे दागिने गिळंकृत करण्यांत त्यांना आणखी एक अमानुष दुष्ट हेतु होता—या दागिन्यांमुळें तुझ्या माझ्यांत वितुष्ट येईल व तें आलें ह्मणजे माझें लग्न कोणाही श्रीमन्ताच्या मुलीबरोबर लावायचें—त्यांचा हा डाव फार उशिरां माझ्या लक्षांत आला—वाटलं कीं वडील न ह्मणतां त्या नरपशूच्या नरडीचा घोंट घ्यावा पण—पण—?

असो; तुला विस्तृत तें आणखी काय लिहूं? तुला मीच सर्वस्वी नागवली, हें ऋण एकच नव्हे तर शम्भर जन्म घेऊन फेडीन, तोंपर्यंत माझ्या आत्म्यास मुक्ति मिळणार नाहीं!--पण पुनर्जन्माच्या गोष्टी कशाला? या शेवटच्या वेळीं तुला पुष्कळ पुष्कळ लिहावेंसें वाटतें पण लिहवत नाहीं--- मी तुझा शतशः अपराधी आहे ही जाणीव उराशीं घेऊनच मी आत्महत्त्या करीत आहे--तुला हें पत्र जेव्हां पोहोंचेल त्यावेळीं माझा आत्मा शरिराचीं बन्धनें तोडून गेलेला तुला आढळून येईल.

मला विसरून जा असें तुला कोणत्या तोंडानें सागूं?

तुझा ह्मणण्यास लाज वाटते पण या शेवटच्या वेळीं लाजायचं तरी कुणास!

तुझाच,

**केशव बाबू सावकार**

'सही आणि अक्षर पहा! त्यांचंच ना हें?' ती ह्मणाली.

मामानीं पत्र पाहिलें, ते उगीच राहिले---

'पुढची हकिकत अगदींच त्रोटक. त्यांच्या निधनानन्तर मी माझा शरिरविक्रयाचा धन्दा सोडला, इतकेंच नव्हे तर सगळे सौभाग्यालंकार वर्ज केले आणि त्यांच्या नावानं वैधव्य पत्करलं जन्मापासून पाठीस लागलेले पोट कसं तरी भरणं भाग होतं, आणि दुर्दैवानें मी त्यावेळीं गरोदर होतें---काबाडकष्टांची संवय नव्हती---जिवास फार त्रास होई---पण मी त्याची फिकीर केली नाहीं--पण दुर्दैवानें माझी पाठ सोडली नाहीं---मी त्या श्रमानीं आजारी पडलें आणि त्यांतच अपुऱ्या महिन्यानीं बाळन्तपण झालें. आम्हां कलावन्तीणींजवळ दागिन्याशिवाय दुसरी कसली सम्पत्ती असणार?

दागिने तर पूर्वींच गेले होते--- जें काय किडूक मिडूक होते तेंही

सम्पले---आजार चालूच होता---बाळन्त रोग थोडाच बरा होतोय लवकर. अशा स्थितींत भिक्षेशिवाय दुसरा कोणता मार्ग मी पत्करणार ?

क्षणभर नितांत शान्तता पसरली.

'आतां तरी ह्मणाल का मला खुनी ?

माझ्या हातांतलें तें पत्र हिसकावून घेऊन ती निघून गेली.

मामा तिच्या अदृश्य होत जाणाऱ्या पाठमोऱ्या आकृतिकडे आ वासून पहात होते.

# पंढरीचा वारकरी

आणि अजूनही जेव्हां जेव्हां मला त्या प्रसंगाची आठवण येते, तेव्हां तेव्हां हृदय अगदीं भरून येतें व तें डोळयांतून अश्ररूपानें वाहूं लागतें. मी एरव्हीं त्यावेळीं अगदीं मोकळया मनानें व निर्व्याज अन्तःकरणानें ते शब्द उच्चारले होते; त्याचें प्रत्यन्तर मला इतकें तन्तोतन्त मिळालें, कीं तें आठवलें ह्मणजे मन खिन्न होतें. त्यावेळीं जर ही भीषण भवितव्यता मला समजली असती तर ---!

पण आतां काय त्याचें! बोललेला शब्द आणि सोडलेला बाण थोडाच परत येणार आहे!

मी माझ्या मनाचें समाधान करून घेऊं लागलों ह्मणजे ह्मणतों--'बोलाफुलाला गांठ पडली झालें;' काकतालीय न्यायानें पुष्कळशा गोष्टी आपोआप घडतात ह्मणून कां कोण इतकें जिवास लावून घेतो? मी जें बोललों तें त्याचें अकल्याण व्हावें या उद्देशानें खात्रीनें नव्हे;---आणि अशा तऱ्हेनें मी दोषमुक्त होऊं पहातों. पण----

पण बोलतों हे शब्द ऱ्हदयाला पटत नाहींत. उलटतपासणींत कस-

लेला विद्वान वकील खऱ्या साक्षीदारासुद्धां कायद्याचा कीस काढून खोटें बोलल्याच्या आरोपांत पकडतो; पण तें बोलणें बुद्धीस भारणारें, चकविणारें असतें. एक वेळ बुद्धीस दिपवणें शक्य असतें; पण भावनेला हृदयाला चकविणें कांहीं सोपी गोष्ट नाहीं. साऱ्या जगाच्या डोळ्यांत धूळ फेंकून उजळ माथ्यानें फिरणारा संभावीत हृदयाच्या जाचणीनें बेजार होऊन जातो. अफाट विश्वास चुकविणें एक वेळ शक्य असेल, पण मूठभर हृदयापुढें तो बापुडवाणा होतो. साडेतीन हात देहांत जर कुठें ईश्वर वास करीत असेल तर तो हृदयांतच. प्राणीमात्राच्या हृदयांत ईश्वर असतो असें म्हणण्यापेक्षां त्याचें हृदय हाच त्याचा ईश्वर असतो असें म्हणणें जास्त सयुक्तिक ठरेल.

पणजीस त्यावर्षीं मी प्रथमच 'लिसेव' शिकण्यास आलों. त्यावेळीं माझें वय फार तर बारा--तेरा वर्षांचें असेल. खेड्यांतील 'इश्कोलां'तून पणजीच्या 'लिसेवां'त आल्यावर जगाच्या अवाढव्यतेची साधारणशी कल्पना मला आली.

माझे वडील मला पणजीस रघुनाथाच्या देखरेखीखालीं ठेऊन गेले. त्यांना रघुनाथाचा पूर्ण विश्वास होता. शिस्त, टापटीप, अभ्यासू वृत्ति व गरीब स्वभाव या एकदर गुणांमुळें माझे वडील त्याला फार मानीत असत. घरचा अतिशय गरीब, पण रक्ताचें पाणी करीत शिकवण्या वगैरे करून त्यानें 'लिसेवा'च्या पांचव्या वर्षापर्यंत मजल मारली होती. यंदां तो पांचव्या वर्षांत होता.

परीक्षा जवळ आली ह्मणून रघुनाथ जारीनें अभ्यास करीत होता. मूळचाच तो 'अभ्यासू आणि त्यांत आणखी परीक्षा जवळ आलेली; मग त्यानें अभ्यासावर झोड उठविली असल्यास नवल काय? यंदा परीक्षा सुखरूपपणें पास झाल्यावर पुढल्या वर्षीं त्याला पोटाचा प्रश्न सोडवावयाचा

होता. कुठेंही चांगलीशी जागा रिकामी झाली, कीं पांचव्या वर्षाचा दाखला दाखविल्याशिवाय तिथें प्रवेश मिळत नसल्यामुळें ज्ञानप्राप्तीपेक्षां पोटाचा प्रश्न सोडविण्याकरितांच तो शिकत होता. त्याचें एकच ध्येय होतें आणि तें म्हणजे कुटुम्बांतील मण्डळीचा सुखासमाधानानें चरितार्थ चालविणें. आणि याकरितांच बिचारा हाडांची काडें झिजवीत असे. आणि तो डोक्याचा थोडा जड असल्यामुळें त्याला ती उणीव डोकेफोड करून भरून काढणें भाग होतें.

असाच एक दिवस तो अभ्यास करीत आपल्या चटईवर पडला होता. नुकतीच दिवेलावणी झाली होती. मी सारा सायंकाळ भटकून नुकताच परत खोलींत आलों होतो.

रघुनाथाच्या हातांत जॉमेट्रीचें पुस्तक पाहून मलाही दुसऱ्या दिवशीं जॉमेट्रीचा तास होता त्याची आठवण झाली.

मी जॉमेट्रीचें पुस्तक घेऊन बसलों, वाचलेंही, पण मला तें नीट समजलें नाहीं.

"रघुनाथ, मला जरा हें सांग!" मी माझ्या तोऱ्यांत म्हटलें. मी लक्ष्मीपुत्र होतों आणि रघुनाथाचा बाप आमचा आश्रित होता, एवढाच सम्बध पुरे होता.

"थांब! मला मधें अडथळा करूं नकोस, मला आतां वेळ नाहीं. जेवण झाल्यावर मग पाहूं." रघुनाथ पुस्तकांतून डोकें न काढतांच म्हणाला.

"मोठा आला आहे अभ्यास करणारा! अभ्यास करून काय दिवे लावणार तें कळलंच आहे. यंदा एक छानदारसा 'शुंभ' (नापास) पडला म्हणजे कळेल!" मी फटकळपणानें बोलून गेलों.

रघुनाथानें डोळे वटारले. माझ्यानें त्याच्याकडे—त्याच्या त्या

डोळ्यांकडे पहावलें नाहीं. पण त्यावेळीं कुठून मला दुष्ट इर्षा झाली. मी मान वर न उचलतांच पण चढेलपणानें म्हटलें.

"हो! हो! यंदा नापासच होणार तूं!"

रघुनाथ चटईवरून ताडकन उठला, व त्यानें माझे दोनही हात पकडले मला वाटलें, तो आतां माझ्या थोबाडींत भडकावणार! आणि तो तसें करणार होता. परंतु त्यानें दूरवर—अगदीं माझ्या वडिलांपर्यंत दृष्टी पोंचवून विचार केला व मोठ्या संयमानें त्यानें आपलें मन आवरलें. त्यानें माझे हात सोडले; नव्हे, त्याच्या हातून ते गळून पडले व तो परत जाऊन वाचण्याचा प्रयत्न करूं लागला. परंतु त्याच्या हृदयांत कसेंसेंच होऊं लागलें तो एकदम रडूं लागला. त्याच्या डोळ्यांतून सरसर वहाणारे ते अश्रूबिन्दु पाहून माझें हृदय विरघळलें. मला अगदीं मेल्याहून मेलें झालें. त्यापेक्षां त्यानें माझ्या थोबाडींत दोन भडकावल्या असत्या, तर एकवेळ चाललें असतें.

मला फार वाईट वाटलें. माझें हृदय व्यथित झालें. माझा अभिमान पार रसातळाला गेला. मी रघुनाथाच्या चटईवर जाऊन बसलों.

त्याचा हात माझ्या हातांत घेत मी म्हटलें, "रघुनाथ, तुला वाईट वाटलं का? रागाऊं नकोस, मी तुझी क्षमा मागतों. पोरपणानं कांहींतरी बोललों. दोन थोबाडींत पाहिजे तर मार; पण मनांत राग धरूं नकोस. नाहींतर मीच पाहिजे तर दोन थोबाडींत मारून घेतों." असें म्हणून मी भावनावेगानें खरोखर हात उचलले देखील. पण रघुनाथानें ते धरले, आणि एक दीर्घ सुस्कारा सोडला.

वादळी वाऱ्यानें एका क्षणांत एकादें स्थिर झाड कचकचून हलावें, तसें माझें हृदय त्या एवढ्याशा सुस्कारानें हलून गेलें.

— आणि दुर्दैवानें झालेंही तसेंच!

## पंढरीचा वारकरी!

रघुनाथ त्या वर्षीं तर नापास झालाच; पण आणखी दोन वर्षें परिक्षेस बसूनही त्याला तींत यश आलें नाहीं; दुर्दैव बिचाऱ्याचें! ज्ञान आणि परिक्षा यांतील संबंध पुष्कळ वेळां नाहींसा होतो. परिक्षेचा डोंगर चशिल्याचीं तट्टें सहज चढतात; पण पायीं चालणाऱ्या पांथस्थास तें सुलभ नसतें.

बिचाऱ्या रघुनाथाचीं सुखस्वप्नें शेवटीं स्वप्नेंच ठरलीं. त्याच्या आशा-आकांक्षा त्याच्यामतें धुळीस मिळाल्या.

तो शिकवीत असलेलीं मुलें त्याच्यावरोवर शिकूं लागलीं. त्याची त्याला अत्यंत लाज वाटूं लागली. त्याचे सोबती मेडिकल कॉलेजांत जात होते आणि वेळीं प्रसंगीं थट्टेनें का होईना, त्याला "पंढरीचा वारकरी" ह्मणून हिणवीत होते. आणि तो—? त्या राक्षसी थट्टेनें मनांत रडत असे.

त्यानें कंटाळून शेवटीं 'लिसेव' सोडला, पणजी शहर वर्ज केलें आणि आपल्या गावीं निघून गेला.

आणि—

—कांहीं महिन्यांनीं कळलें, कीं त्यानें जिवास कंटाळून आत्महत्या केली-

ातों

, चला,

ड करीत

# दिवजांची जत्रा

पहिल्यानदांच त्या वर्षी मी आमोण्यास गेलों. खाशांचा फार दिव-
सांचा आग्रह होताच, तेव्हां म्हटलें यन्दा जावेंच झालें. आणि त्या-
शिवाय मीही बराच भाविक होतों. अमोण्याच्या वेतालावर माझी श्रद्धा
होती. वेताळाच्या साक्षात्काराच्या गोष्टी मीं लहानपणापासून ऐकत होतों,
व दर वर्षी त्यांत भरच पडत होती. आमच्या घरांतसुद्धां त्यास नवस
केल्यानें पुष्कळशा गोष्टी आमच्या मनासारख्या घडल्या होत्या. अशा
देवस्थानीं एरव्हीं यापूर्वीच पोंचावयास पाहिजे होतें. तेव्हां यन्दाचा योग
तरी वायां जाऊं द्यायचा नाहीं म्हणून निश्चय केला आणि त्याप्रमाणें
गेलोंही.

दारा दुसऱ्या दिवशीं आम्हीं सकाळींच ढोलांच्या आवाजानें जागे झालों.
सुवासि रून कांहीं तरी वाजत जात होतें. आमच्या बिऱ्हाडासमोरील रस्त्यानें
हातांत ए नी स्त्रियांची एक जंगी मिरवणूक जात होती. प्रत्येकीच्या उजव्या
आणि डा कएक 'दिवज' (झाडाच्या आकाराची मातीची पंचारती) होतें,
तेलाचें भाण्ड या हातांत एक लहानसें मातीचें नाहीं तर तांब्या-पितळेचें
तरी तिला डें होतें. मिरवणूक किती तरी लांब होती. सरासरी एक तास
आमच्या बिऱ्हाडापुढून जावयाला लागला; मिरवणुकींत माझ्या

सारख्या चिकित्सक दृष्टीच्या माणसास पहाण्यासारख्या किती तरी गोष्टी होत्या. प्रत्येक सुवासिनी स्त्री ऐपतीप्रमाणें कमी अधिक उंची लुगडीं नेसल्या होत्या, व त्यांस साजेशा कोंपरापर्यन्त पोंचणाऱ्या चोळ्या व दागदागिने त्यानीं घातले होते. सगळ्या बायका ब्राम्हणेतर व विशेषतः कुळवाडी, गापती वगैरे अशिक्षित समाजांतील होत्या. त्यांच्या त्या तजेलदार काळ्या वर्णावर हीं वस्त्रभूषणें अगदीं मजेदार दिसत होतीं. चालतांना नव्या लुगड्यामुळें होणारा गोंधळ, आजच घातलेले दागिने जागच्या जागीं आहेत कीं नाहीं हें फिरून फिरून चांचपून पहाण्याची धांदल, हें करतांना दुसरा कोणी आपणाकडे पहात नाहीं ना ही भीति, व त्यामुळें त्यांच्या चेहऱ्यावर क्षणोक्षणीं बदलणारे भाव यामुळें तें दृश्य प्रेक्षणीय होतें प्रत्येकीनें बुचड्यावर इतकीं फुलें माळलीं होतीं कीं जवळ जवळ केंस दिसतच नव्हते असें म्हणणें अतिशयोक्तीचें खात्रीनें होणार नाहीं. बाबिलोनियाची झुलती बाग जगांतल्या सात आश्चर्यांपैकीं एक समजण्यांत येते, परंतु या झुलत्याच नव्हे तर चालत्याबोलत्या बागा पाहून आश्चर्य वाटल्यास नवल कसलें! शहरांतल्या बायका चार फुलें बुचड्यांत खोवावयाचीं झालीं तर किती आढेओढे घेतात, मग फुलांचीं ओझीं वहाणाऱ्या या विरांगना पाहून कुणास कौतुक वाटणार नाहीं!

शेवटीं माझें निरिक्षण सम्पण्यापूर्वीच मी ज्यांच्याकडे उतरलों होतों त्यांच्या मुलानें मला या तन्द्रींतून भानावर आणलें.

'हं! विचार कसला चाललाय? चहा घेणार कीं नाहीं — हं, चला, धुवा तोंड. आपणास कौल घ्यायला जायचं आहे!' तो गडबड करीत म्हणाला.

'कुठें रे तें पण?' मी विचारलें.

'सांतेरीच्या देवळांत.' त्यानें उत्तर दिलें.

'आणि कौल कसला घ्यायचा आहे तुला?' मी किंचित आश्चर्यानें विचारलें.

"कौल आणि कसला?" त्यानें जवळ जवळ मला वेड्यांत काढल्यागत प्रश्न केला, 'तो तुम्हांला प्रत्यक्ष दाखवतों म्हणजे झालं ना? चला तर मग.'

'आणि ह्या मघां बाया गेल्या त्या कुणीकडे?'

'तिथंच आपणास जायचं आहे!' तो म्हणाला.

मला आनन्द झाला -- पुन्हां तेंच दृश्य दिसणार तर!

आम्हीं कौल घेण्यास गेलों. देऊळ जवळच एका निर्जन टेकडीवर फार जुन्या काळीं बांधलेलें आहे. सभोंवार चारपांच आंब्याच्या विशाल वृक्षांची दाट सावली पडल्यामुळें अगदीं थंडगार वाटत होतें. मूळचेच थंडीचे दिवस, आणि सकाळींच वाहणारा तो उत्साहजनक मंद वारा नसासांत चैतन्य व आनन्द भरीत होता. झाडांतून वाट काढीत खालपर्यंत आलेले सूर्याचे उबदार किरण मधूनमधून पसरले होते; व या नैसर्गिक उष्णतेचा उपभोग फाटक्या अंगाची व कपड्यांच्या अभावीं उघडीनागडीं असलेलीं गरीब महारांचीं पोरें घेत होतीं. उन्चवट्यावरून दिसणारा सभोंवारचा तो हृदयंगम देखावा तन्तोतन्त वर्णन करणें शक्य नव्हतें. तेव्हां तें वर्णन करून वाचकांचा वेळ घेण्यापेक्षां तो एक निसर्गसौंदर्यसंपन्न गोमन्तकांतला नयनमनोहर देखावा होता—एवढ्यांतच त्याचें यथासांग वर्णन आलें.

देवळासमोर मघां दिवजें घेऊन येणाऱ्या बायांची गर्दी होती. दिवजें ओंवाळून आलेल्या बायका हुश्य करीत दूर अंतरावर बसल्या होत्या; व बाकीच्या देवळाच्या दरवाजाशीं गर्दी करून आंत जाण्याची संधी साधण्यास सुसज्ज होत्या. जरा एका बाजूस 'गांठवल' (नवऱ्याच्या उपरण्याच्या

टोंकाशीं बायकोच्या पदराचें टोंक बांधणें हा प्रकार खालच्या जातींत विशेष आहे.) बांधलेलीं कांहीं नवविवाहित जोडपीं उभीं होतीं. आठआठ दहादहा वर्षांच्या या परकऱ्या पोरी पंचवीस वर्षांच्या नवरोजीशेजारीं मान दुमडून उभ्या होत्या; व हे नवरोजीही उसनी लाज आणून जरा लाजल्या-सारखें दाखवीत होते.

शेवटीं गर्दी बरीच कमी झाली व दूर अन्तरावर थांबलेलीं महारांचीं दिवजें आलीं. एकाच रक्तमांसाचे आणि अस्थिचर्माचे, व आज तर इतर मंडळीसारखे स्वच्छ व शुद्ध असूनही त्यांस देवालयांत प्रवेश नव्हता अंगणांतच त्यांनीं वहिवाटीप्रमाणें आपापलीं दिवजें ठेवलीं व व तेथूनच भक्तिभावानें देवीस नमस्कार केला. एका पोरसवदा तरुणीनें तर विशेष भक्तिभावानें केला असें मला दिसलें, तिनें हात पसरले व डोळयांत आंसवें आणून ती कायसें पुटपुटली; थोड्याच वेळानें डोळयांत सांचलेले अश्रू गालांवर ओघळले. मला तिच्या शुद्ध भाविकपणाचा फार आदर वाटला इतक्या उत्कट भक्तीस व प्रार्थनेस जर देव पावला नाहीं तर मग देवा-च्या देवपणाचे अस्तित्व तें काय? असे विचार माझ्या डोक्यांत येऊन गेले.

त्या बायांनीं भराभर आपलीं दिवजें उचललीं व त्या चालूं लागल्या. ती पोर पण उठली, आणि चालावयास पाऊल पुढें टाकण्यापूर्वीच घेरी येऊन खालीं आदळली मी चटकन पुढें झालों. स्पृश्यास्पृश्यतेचे ला-जिरवाणे विचार माझ्या मनाला शिवलेसुद्धां नाहींत. पण इतक्यांत तिच्या बरोबरच्या बायाही तिला सावध करण्याचा प्रयत्न करूं लागल्या. मी पुजाऱ्याकडून पंचपात्रभर पाणी मोठ्या मिनतवारीनें मिळवलें व थोडेंथोडें तिच्या तोंडावर शिंपडण्यास सुरवात केली.

'अरे म्हारड्यांनृ, कौलाचो वेळ जालो—ओडा तिका कुशीक—'

एक म्हातारा गांवकर तुच्छतेनें व संतापानें कडकडला. मीं डोळे वटारून त्याकडे पाहिलें. कुणास ठाऊक, पण तो आणखी कांहीं न बोलतां बाजूस झाला. आणि देवदयेनें तीही सावध झाली. सभोंवार तमासगिरांची गर्दी जमली. एका पोऱ्याकडूनच एक आडसर मीं विकत घेऊन तिला तें थंड पाणी प्यावयास दिलें. माझी ही सक्रिय सहानुभूति पाहून लोकांची तोंडें चमत्कारिक झालीं, व तो भाव त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेला पहातांच मी जरा मागें सरलों. गंगेचें मुख बांधतां येईल पण लोकगंगेचें तोंड कोण धरणार आणि याच जगांत त्यांच्यासमवेत आपणास रहावयाचें आहे, मग त्यांची बेपर्वा तरी कशी करणार?

ती सावध झाली व उठून बसली. तेल चोपडून तराटून बांधलेला तिचा बुचडा आतां विसकटला होता. लुगड्याचा पदर तोंडावर शिंपडलेल्या पाण्यानें भिजला होता. रोजांचा (झेंडूच्या फुलांचा) गजरा व पातीचीं हिरवींचार कणसें बाजूस पडलीं होतीं.

"काय झालं हिला? एकाएकीं घेरीशी आली?" तिला सावध करणाऱ्या एका बाईस मीं विचारलें.

"तिला व्हय? धन्यांनू, ती चार दिसांची उपाशी आसा." ती बाई म्हणाली.

"उपाशीं—आणि कां?" मीं विचारलें.

"तिचो घव बरो नाय; ताका थावर दीस (पुष्कळ दिवस) झाले, ताप येता." तिनें उत्तर दिलें

"मग तापाचा आणि उपवासाचा काय संम्बध?" मीं अधिकाधिक आश्चर्यचकित होत म्हटलें.

"तिनें आंगवण (नवस) केल्या, पांच दिवस उपास करून दिवज वोंवाळीन म्हणून."

"असं!" आतां सगळा प्रकार माझ्या ध्यानांत आला. थोड्या चवकशीनंतर मला माहिती मिळाली.

साळू म्हणजे ती पोर ही खेमल्या महाराची बायको. तिचें लग्न रूढीप्रमाणें वयाच्या सातव्या कीं आठव्या म्हणजे दहा वर्षांपूर्वी झालें, व गतवर्षींच ती वयांत येऊन तिचें गर्भादान वगैरे संस्कार झाले. तोच दिवस नेमका अशुभ होता कीं काय कुणास ठाऊक, एका महिन्याच्या आंतच धट्टयाकट्या खेमल्यास बारीक ताप येण्यास सुरवात झाली व तो वाढतच गेला. व आतां तर तो आवांक्याबाहेर गेल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसुं लागलीं. एरव्हीं खेमा महार म्हणजे साधा, सरळ, निर्व्यसनी व प्रेमळ माणूस होता. साळू त्याची फार आवडती होती; आणि साळूलाही तो फार आवडत असे. साऱ्या महारवाड्यांत खेमासारखा हुशार, सशक्त आणि साधा माणूस नव्हता; तर साळूसारखी सद्गुणी, प्रेमळ व नाकींडोळीं नीटस पोरगी नव्हती. परंतु हा सुखाचा संसार दैवाला पहावला नाहीं.

घराकडे म्हातारी सासू तर या साऱ्या अनर्थांचे कारण साळूच असा ग्रह करून तिला छळीत होती. मरणोन्मुख खेमा तशा आजारी स्थितींत साळूला न छळण्याविषयीं आईचीं आर्जवें करित होता. परंतु त्याचा तितकासा उपयोग होत नसे.

साळूस कोणीसें सांगितलें कीं, पांच दिवस उपवास करून सांतेरी देवीला दिवज ओंवाळलें म्हणजे ती नवसास पावते व इच्छित मनकामना पूर्ण होतात, म्हणून तिनें हें व्रत केलें होतें, व सुसंगतपणानें तें आज पारही पडलें होतें.

"देव तुझ्या नवऱ्यास खात्रीनं बरा करील बरं! त्यावरच विश्वास ठेव. आमोण्याचा देव नवसास पोंचल्याशिवाय केव्हांही रहावयचा नाहीं

हा विश्वास ठेव.' मी सहानुभूतीनें व तिला धीर देण्याच्या उद्देशानें म्हणालों.

तिच्या चिन्तामेघांनीं काळवंडलेल्या चेहऱ्यावर आनंदाचें उन्ह क्षणभर चमकलें. आम्हीं कौल घेऊन घरीं परतलों. माझ्या नजरेसमोर तेंच तें उदात्त प्रेमचित्र नाचत होतें. जगव्यापक प्रेमास महाराच्या झोंपडींतसुद्धां स्थान असतें तर?

* * *

वेताळाच्या देवळापुढील अंगण मनुष्यांनीं नुसतें फुलून निघालें होतें. मध्यभागीं मानामानाप्रमाणें खाशी खाशेमण्डळी भरजरी फेटे बांधून बसली होती व राहिलेल्या जागेंत इतरेजन उभे होते. जत्रेच्या उत्सवांतील एक महत्वाचा कार्यक्रम व्हावयाचा होता. 'खेत्र' म्हणजेच मुख्य कार्यक्रम. देवालयांतून तरंग व तलवार बाहेर आणण्यांत आली. ठराविक जागेवर 'तरंग' धरून 'जलमी' उभा राहिला. त्याच्याचसमोर लखलखणारी ती तलवार ठेवण्यांत आली.

महारलोक आपले ढोल निरनिराळ्या तालांवर वाजवून 'कुडींत' अवसर आणण्यास मदत करीत होते- सारें दृश्य गंभीर व भयानक वाटत होतें. ढोल जोराजोरानें वाजूं लागले. मीं महारांकडे पाहिलें; त्यांच्या समुहांत जर खेमा असता तर त्यानें कसा ढोल वाजविला असता याचें कल्पनाचित्र मी खेमास अजून एकदांही न पहातां डोळ्यांसमोर दिसूं लागलें.

खेत्राचा विधी सुरू झाला. प्रथम नवसास आलेल्या शेंपन्नास कोंबड्यांचे बळी देऊन नंतर बकरीं कापलीं गेलीं. साऱ्या जमिनीवर रक्तच रक्त झालें. शेवटीं कोणिएक ठराविक पद्धतीचे हेल काढून गाऱ्हाणें घालूं

लागला. इतर 'हय सायबा' म्हणून ठराविक वाक्याच्या शेवटीं माथ करीत होते. कोणिएक फाटक्या अंगाचा म्हातारासा इसम तरंगाकडे निश्चल नजरेनें पहात होता. ढोल एका विवक्षित पद्धतीनें वाजूं लागले. त्या म्हाताऱ्यावर 'सर सायबा फुडें' म्हणून तांदुळ मारण्यांत येऊं लागले.

थोडक्याच वेळांत त्या म्हातऱ्या इसमावर 'अवसर' आला. त्यानें धांवत जाऊन ती खालीं ठेवलेली तलवार उचलली व चटकन कपाळावर ठेवली, डाव्या हातानें जरा दाबली, सळकन रक्त आलें. कार्यक्रम संपला, आम्हीं उठलों. आमच्या मागच्या गर्दींत कोणीसें बोललें, "बघितलंत, किती जागृत देवस्थान आहे?"

"अरे, पण आपणास आतां देवदर्शन घ्यायचं आहे; चाललास कुठं?" माझा मित्र म्हणाला.

"चल तर! उशीर नको. माझं डोकं दुखायला लागलंय्." मी उत्तरलों. आम्हीं देवळांत गेलों; तेथेंही गर्दीच होती. कोणिएक इसम देवास मूल्यवान पोषाखाची भेट घेऊन आला होता.
मीं सहजच एकाला विचारलें, 'कोण हे?'

'ते शेजारच्या गांवचे इनामदार.'

यांच देवाचे महाजन आहेत ते. त्यांच्याहितीं 'देमांद' झाला म्हणून केलेला नवस फेडायला ते आले आहेत.' दुसऱ्या एकानें मला माहिती पुरवली.

सकाळच्या प्रकारची मला आठवण झाली. असाच साळूचा नवरा बरा होऊं दे अशी देवास मी प्रार्थना केली.

बिऱ्हाडीं येऊन कपडे काढून आम्ही विश्रांति घेत होतों. इतक्यांत एक महार येऊन अंगणांत उभा राहिला. मी ओटीवर चटईवर आडवारलों होतों बाकी मंडळी चहाच्या गडबडींत होती.

"काय रे? काय पाहिजे तुला?" मीं विचारलें.

"धन्यांनू, आमचो तो खेमलो आतांच भायर पडलो! धनयांक सांगूक इल्लंय. घरांत ना ते?"

आमच्या बिऱ्हाडाचा घरधनी गांवचा रेजिदोर असल्यामुळें तो सांगावयास आला होता.

"काय म्हणतोस? खेमा वारला?" मीं विचारलें.

मी आश्चर्यविमूढ झालों. मग सकाळची प्रार्थना फुकट गेली तर!

"आणि साळू काय करते आहे रे?" वास्तविक हा प्रश्न विचारणें कमालीचें मूर्खपण होतें परंतु त्या मनःस्थितींत माझे तोंडून काय शब्द निघाले ते मलाच कळले नाहींत.

"धन्यानू, तांय तुमकां समजलां तर!" तो आश्चर्यानें माझ्याकडे टकमकां पाहूं लागला.

"काय रे? काय समजलं?" मीं उत्सुकतेनें विचारलें.

"खेमाचो जीव गेल्यानंतर ती जी नाहींशी झाल्या तिचो पत्तोच नाय!"

"काय म्हणतोस? साळू नाहींशी झाली?"

"तसलीच ती अवदिसा!" तो म्हणाला. साळूच्या सासूच्या पक्षाचाच तोही असावा.

मला ते शब्द फार कडक वाटले. साळूसारख्या सालस पोरीला त्यानें अवदसा कां म्हणावें? मला फार वाईट वाटलें. पडलेल्यावर पाय देण्यांत या लोकांना भूषण का वाटतें?

मी तसाच पडून राहिलों. सीमोल्लंघनास गेलेलें 'तरंग' परत येत होतें. सगळयांनीं उभें राहून देवास नमस्कार केला. मला मात्र उठावें असेंसुद्धां वाटलें नाहीं — मग नमस्कार कुठचा!

माझ्या इच्छेविरुद्ध मीं 'पेणीं' पहाण्यास गेलों. कलावंतिणीचें नाचगाणें चाललें होतें, रसिक-अरसिक मण्डळी गाण्यांत रंगली होती. मला मात्र तें दृश्य पहावेना कीं गाणें ऐकवेना. तो चंद्रजोतींचा संथ सुन्दर प्रकाशसुद्धां डोळ्यांस त्रास देऊं लागला.

सुन्दर सुन्दर कलावंतिणी आपापल्या मधुर व सुरेल आवाजीनें गाऊन प्रेक्षकांचीं मनें रिझवीत होत्या. त्यांच्यासमोर लोकांचा अगदीं गराडा पडला होता. एरव्हीं मिरवणूक देवाची होती; परंतु त्याच्याकडे कोणीही पहात नव्हतें. उलट देवाच्या बाजूस पाठ फिरवूनच बहुतेक मण्डळी होती.

मी हळूच गर्दींतून निसटलों व शेजारींच जरा अंतरावर असलेल्या पिंपळाच्या पारावर जाऊन बसलों. मनांत एकच विचार धिंगाणा घालीत होता. साळूवर पडलेला दुर्दैवाचा दारुण घाला! सकाळीं कपाळभर कुंकू व गळाभर पिरडुकांचें मंगळसूत्र असलेली साळू आतां त्या सौभाग्यद्रव्यांसच नव्हे तर संसारसुखासही अंतरली होती! सुखाची कल्पना येते न येते तोंच त्या सुखाची इतिश्री व्हावी ना!— असलेच विचार सारखे मनांत येत.

कुणा महाजनाच्या आग्रहावरून कलावंतिणींनीं कालंगडा राग गाइला. त्याचे ते करुण स्वर दुरून अगदीं स्पष्ट ऐकूं येत होते. माझ्या डोळ्यांतून अश्रु गळूं लागले. मनास विरंगुळा वाटावा म्हणून मी पुन्हां गर्दींत मिसळलों; पण तें जमलें नाहीं. माझी मानसिक खिन्नता किंचितही कमी झाली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं मोठ्या मिनतवारीनें अत्याग्रह असतांनासुद्धां पणजीस परतण्याची परवानगी मी मोठ्या कष्टानें व त्यांचें मन किंचित् दुखवून मिळवली. एरव्हीं रहाण्यास मला हरकत नव्हती -- पण मनच जाग्यावर नव्हतें. बन्दरावर आलों. वळईहून पणजीस जाणारा वाफर येण्यास अजून

अवकाश होता. दूर अंतरावर नदीकांठींच कांहीं मण्डळी गर्दी करून उभी होतीं —माझी पावलें न कळतच तिकडे वळलीं.

— आणि तेथें काय पाहिलें ?

—साळूचें प्रेत ! अजूनही तिचें सौभाग्यालंकार तसेच होते. कुंकुवाचा तजेलाही अजून तसाच कायम होता !!

# कर्तव्याची जाणीव

एखाद्याचा सारा जन्म दुःखांत जातो तसाच दुसऱ्याचा पूर्ण सुखांत जातो हें आपण पहातों. जगांतली ही विषमता काल्पनिक सृष्टींतील नसून सत्यसृष्टींतीलच आहे एवढें मात्र खरें.

सुरेशचें आजपर्यन्तचें सारें आयुष्य इतक्या सुखांत गेलें होतें, कीं दुःख म्हणून कांहीं पदार्थ विधात्यानें निर्माण केला आहे याची त्याला जाणीवच नव्हती. फुलपांखराप्रमाणें त्याची वृत्ति नेहमी आनन्दी असे. कसलीच चिन्ता मागें नसल्यामुळें त्याच्या देहाची वाढसुद्धां सुन्दर झाली होती. त्याच्या शामल वर्णाच्या रुबाबदार चेहऱ्यावर नेहमीं बालकाची निर्व्याजता व हास्य खेळे. अभ्यासांत जरी तो विशेष लक्ष घालीत नसला तरी परिक्षेंत तो केव्हांच नापास झाला नाहीं. सर्व खेळांत मात्र त्यानें असामान्य प्राविण्य संपादन केलें होतें. कुठल्याही सार्वजनिक कामांत, मग तो एखादा सामना असो अगर सभा--संमेलन असो, त्यांत तो नाहीं असें केव्हांच झालें नाहीं. कदाचित पौर्णिमेस तारांगणांत चन्द्र न दिसतां राहील अगर सूर्यमंडळांत सूर्य न उगवेल, परंतु सुरेश विद्यार्थ्यांच्या अग्रभागीं चमकल्याशिवाय केव्हांही रहावयाचा नाहीं. असा सुरेश होता.

माधवराव कामतांस दोनच मुलें—पहिला सुरेश आणि त्यानन्तर

पांच वर्षांनीं झालेली सुधा. ते जेव्हां प्रथम मडगावीं आले तेव्हां त्यांना तीस रुपये पगार होता, आणि तेव्हांच त्यांचें लग्न झालें. देवदयेनें त्यांना सुन्दर व सुशील पत्नी लाभली. नाजुक तराजूवर किंचीत् भार पडतांच पारडें एकदम खालीं होतें, तसेंच मनुष्याची वेळ वरी असली म्हणजे गोष्टी अपेक्षेबाहेर यशस्वी होतात. माधवरावांचेंही तसेंच झालें. लग्नानंतर त्यांचा पगार वाढूं लागला. व दोनचार वर्षांच्या अवधींत तीस रुपये पगार मिळवणारे माधवराव शंभर रुपये मिळवूं लागले; आणि जेव्हां त्यांस सुरेश झाला तेव्हां तर त्यांचा पगार आणखी पंचवीस रुपयांनीं वाढला. परंतु जास्त उन्ह लागलें कीं जास्त घाम येतो, किंवा जास्त जलसंचयाची जास्त वाफ होते; तसें पगाराच्या वाढीबरोबर त्यांच्या खर्चाचीही त्याच प्रमाणांत वाढ झाली होती. पूर्वीं तीस रुपयांत ज्या सुखासमाधानांत त्यांचा प्रपंच चाले, तसाच आतांही चालत होता. ते स्वभावानें जरी उधळे नव्हते तरी बरेच खर्चिक होते. पैशांची टंचाई त्यास कधींच भासली नाहीं, व केलेल्या खर्चाबद्दलही त्यांस पश्चात्ताप वाटला नाहीं. मधून मधून आपण कांहीं तरी शिल्लक टाकावी असें त्यांना वाटे; पण वाटणें आणि अंमलांत येणें यांत आशिया — अमेरिकेइतकें अन्तर असतें! आपणांस कोणतीही गोष्ट एकदां करावीशी वाटली म्हणजे आपण तिच्या शक्याशक्यतेचा विचार करूं लागतों. प्रथमदर्शनीं ती आपणास सहज शक्य होईल असें वाटतें. परंतु थोड्याशा परिचयानें आपण समजतों तितकी ती गोष्ट सोपी नाहीं असें प्रत्ययास येतें. त्यामुळें माधवरावांचा बेत अंमलांत केव्हांही आला नाहीं. अशा संधीसच सुरेश जन्मला. माधवराव जरी जुन्या मताचे नव्हते तरी मुलाच्या पायगुणानेंच आपला पगार वाढला असें त्यांस वाटलें. आधींच योग्य वयावर झालेला आणखी त्यांत उत्तम पायगुणाचा ठरलेला, मग तर विचारावयासच नको. सुरेशचें कोड-

कौतुक पुरवण्यांतच त्याच्या आईबापांना धन्यता वाटूं लागली. आज तिचाकी सायकल, तर उद्यां छोटी मोटार—जें काय सुरेश बोले तें ताबडतोब घरांत येई. पगार भरपूर असल्यामुळें पैशाची ददात तर मुळींच नव्हती, आणि असती तरीसुद्धां माधवरावांनीं ऋण काढूनही हे सण साजरे केलेच असते. पैसा, सुख व समाधान यांनीं समृद्ध असलेल्या अशा कुटुम्बांत सुरेश वाढला.

सुरेशनन्तर पांच वर्षांनीं सुधा जन्मली. सुधेचें जरी सुरेशइतकें कोडकौतुक झालें नाहीं तरी तीसुद्धां सुखांत व लाडांतच वाढली. कुंडींत लावलेली आंब्याची इवलीशी कोय आज ना उद्यां वृक्ष होणार होती.

सुरेश कॉलेजांत जात होता व सुधा शाळेंत जात होती.

माधवरावांना आतां एक निराळीच चिन्ता लागूं पहात होती. पाऊस डोक्यावर आला म्हणजे वैशाखांतच पावसाळ्याची सारी तयारी सुज्ञ माणसें करतात. तशी मुलगी वयांत आली म्हणजे तिच्या लग्नाची तजवीज करणें आईबापांना भागच पडतें. निदान त्यांचें तरी तसें प्रामाणिक मत असतें.

सुधेनें शैशवावस्था संपवून तारुण्याच्या उन्मादकारी प्रदेशांत पहिलें पाऊल टाकलें होतें. माधवराव बरेच सुधारक असल्यामुळें इतक्या लवकर मुलीचें लग्न करावयाचें त्यांच्या मनांत नव्हतें, पण घरांत म्हाताऱ्या आईची नातीच्या लग्नाविषयीं नित्य कटकट व त्याला मधूनमधून पत्नीची साथ असल्यामुळें मनांत नसतांनासुद्धां माधवरावांच्या मनांत सुधेच्या लग्नाविषयींचे विचार घोळूं लागले. असेंच आहे, मऊ पाणीसुद्धां कठीण दगडावर नित्य पडत राहिलें तर त्यास भोंक पाडतें.

चांगला मुलगा दृष्टीस पडला म्हणजे मनांत नसतांनासुद्धां त्याच्या विषयीं किंचित् तरी चौकशी करण्याकडे हल्लीं त्यांची प्रवृत्ति होऊं लागली. त्यांच्या मनांत विचार येई— मी इतक्या लवकर ही उठाठेव कां करतों?

सुधा कांहीं अजून तशी वाढली नाहीं. अजून ती लहानच आहे—' लगेच दुसरा विचार पहिल्यास मागें सारी — 'पण चौकशी केली म्हणून बिघडलं कुठं ? स्थळ हेरून ठेवायला कसली हरकत आहे ? मी कांहीं उद्यांच तिच लग्न लावीत नाहीं.'

असें चालू असतांनाच एक मुलगा मात्र त्यांना भारी आवडला. घरचा श्रीमन्त, शिक्षणांत हुशार, स्वभावानें सरळ व गोड; मग इतका गुणसमुच्चय एका ठिकाणीं एकवटल्यावर आणखी काय पाहिजे? माधवरावांच्या नजरेंत हें स्थळ फार भरलें. हें स्थळ हातचें जाऊं नये म्हणून आपला पहिला बेत मागें घेऊन सुधेचें लग्न करावें असेंही त्यांना वाटूं लागलें. 'कितीही झालं तरी पोरीची जात. आज ना उद्या दुसऱ्याच्या घरीं जायाचीच—' मग एक वर्षभर आधीं लग्न करून जर मुलीला मनासारखें स्थळ लाभतें तर मग आपली मतें क्षणभर बाजूला ठेवावयाचें माधवरावांनीं—एका सहृदय व प्रेमळ पित्यानें मनांत आणलें तर त्यांस दोष द्यावयास नको.

माधवराव ऑफिसांतून आले व कसेबसे कपडे काढून आपल्या आवडत्या आरामखुर्चीवर पडले. मन विचारांत व्यग्र असलें, म्हणजे मनुष्याचा नजरेवर ताबा नसतो. ते समोरच्या भिंतीकडे निश्चल नजरेनें पहात होते. आपणसुद्धां विचारांत असलों कीं कुठें तरी निश्चल पण निरर्थक पहात असतों.

थोड्या वेळानें सुधा आंत आली. पण त्यांचें तिकडे लक्षच नव्हतें. आरामखुर्चीच्या हातावर बसून ती बोलूं लागली तेव्हां कुठें त्याचें लक्ष तिच्याकडे वेधलें.

"काय झालं बाबा तुम्हांला आज? तुम्ही गप्पसे बसलांत?" वडिलांच्या मुखाकडे टक लावून पहात सुधा म्हणाली. जणुं काय त्यांनीं

सांगण्यापूर्वीच आपल्यास समजल्यास पहावें म्हणून तिची शोधक नजर त्यांचा चेहरा धुंडाळीत होती.

माधवरावांनीं प्रेमभरानें आपला हात तिच्या पाठीवरून फिरवीत बोलण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना त्यांत यश आलें नाहीं. त्यांचा घसा, कां कुणास ठाऊक भरून आला. कदाचित् तिच्या भावी वियोगाची तीव्र जाणीव त्याचें हृदय हालवीत असावी. सुधासुद्धां चमकल्यासारखी झाली व भीतियुक्त नजरेनें वडिलांच्या तोंडाकडे पहात उभी राहिली. माधवरावांनीं हंसण्याचा प्रयत्न केला पण तो पहिल्याइतकाच अयशस्वी झाला. अशा विचित्र परिस्थितींतून त्यांची योगायोगानेंच अचानक सुटका झालीं. सुधेची आई उजव्या हातांत चहाची किटली व डाव्या हातांत फराळाची ताटली घेऊन आंत आली.

माधवरावांची विपण्ण वृत्ति त्याच्या पत्नीच्याही नजरेंतून निसटली नाहीं. रोग झाल्यावर आपण मुकाट्यानें , नाखुषीनेंच औषध घेतों तसा त्यांनीं चहा सम्पविला. एरव्हींच्या मन:स्थितींत जर आज ते असते तर चहाची त्यांनीं किती तरी स्तुती केली असती.

विचार करावयाची संवय नसलेल्या माणसांस एकदम गंभीर विचार करावयाची पाळी आली म्हणजे त्यांची अशीच करुणास्पद स्थिति होत असते. तो आपणच चितारलेल्या भावी संकटांच्या पर्वतांकडे पाहून भेदरून जात असतो. माधवराव शरीरानें स्वस्थ पण अस्वस्थ चित्तानें आरामखुर्चीवर पडले होते; त्यांची पत्नी खिडकीच्या दारास टेकून उभी होती; चहाचा रिकामा कप व फराळाचें ताट तसेंच स्टुलवर पडलें होतें. सुधेला ही गम्भीर शान्तता असह्य झाली म्हणून असो अगर आपले वडील आपण तेथें असल्यामुळें बोलण्यास कचरतात असें तिला वाटलें म्हणून असो ती तेथून झटकली. परंतु लगेच तिला आपले आईबाप असें

बोलतात तरी काय तें ऐकण्याची उत्कंठा वाटूं लागली आणि म्हणूनच ती हळूच दरवाजाच्या आड उभी राहून आंतील संभाषण ऐकूं लागली. असें ऐकणें तिला प्रशस्त वाटत नव्हतें; आपण करतों तें बरें नव्हे असें तिचें मन तिला सारखें बजाऊन सांगत होतें. परंतु एका बाजूला सदसद्विवेकबुद्धि व दुसऱ्या बाजूला तीव्र उत्कंठा यांच्या कात्रींत ती सांपडली. एक वेळ तिला आपण एथून निघून जावें असें वाटलें, परंतु पाय मात्र जागचे हालले नाहींत. माणसाची पापाकडे नैसर्गिक प्रवृत्ति असते ती ही अशीच!

सुधा बाहेर गेलीसें पाहून माधवरावांनीं एक लांब सुस्कारा सोडला.

"काय झालं, गेलां होतां तिथं?" त्यांच्या पत्नीनें उत्सुकतेनें विचारलें

"होणार काय? त्यांना पसंत आहे — "

"तर मग देवच पावला" माधवरावांना पूर्णपणें बोलूं न देतां ती मध्येंच म्हणाली.

"अशी इतक्यांतच हुरळून जाऊं नकोस. त्यांना मुलगी पसंत असली तरी एक निराळाच प्रश्न उपस्थित होत आहे."

"कोणता तो?" त्यांच्या पत्नीनें विचारलें.

"नवऱ्यामुलाच्या बापानं मोठ्या प्रेमानं माझं स्वागत व आदरातिथ्य केलं; व दुसऱ्या एका इसमास आपण शब्द देणार होतों, परंतु आमची उभयतांची जुनी ओळख व स्नेह लक्षांत घेऊन आमची मुलगी आपल्या मुलास करून घेऊं असं आश्वासनही दिलं परंतु एका निराळ्याच पद्धतीनं त्यांनीं मला हुंड्याची जाणीव करून दिली. ते कसल्याशा कामाकरतां घरांत गेले असता त्यांच्याच एका अंगभूतानं माझ्याशीं बोलणं सुरू केलं —

"तुमचं काम अपेक्षेबाहेर यशस्वी ठरलं कीं नाहीं? आमचे दादासाहेब आहेतच तसे थोर अंतःकरणाचे—एरव्हीं त्यांनीं ज्या गृहस्थास शब्द दिला होता, म्हणजे तसा शब्द देऊन ते मागें घेत आहेत असं नाहीं हं—" मधल्यामध्यें दादासाहेबांवर दोष येऊं नये याविषयीं खबरदारी घेत ते पुढें म्हणाले, "ते सहा हजार रुपये हुंडा मोजायला अगदीं एका पायावर तयार होते परंतु आमच्या दादासाहेबांना, ती मुलगी जरा मोठी असल्यामुळं पसंतीस उतरली नाहीं."

"अस्सं! अशा रीतीनं दादासाहेबांनीं गोष्ट मुद्यावर आणली तर!" माधवरावांची पत्नी एवढा वेळ पतीचें भाषण लक्षपूर्वक ऐकत होती ती म्हणाली.

"हो! आतां एकच प्रश्न माझ्या नजरेसमोर दत्त म्हणून उभा राहतो तो हा कीं, एवढी रक्कम कुठून उभी करावी? दादासाहेब माझ्याकरतां म्हणूनही पांच हजाराखालीं येणार नाहींत असं मला खात्रीनं वाटतं" माधवराव चिंतेच्या स्वरानें म्हणाले.

"हो! कुठून तरी ही एवढी रक्कम उभारली पाहिजे खरी—पैशाचं तोंड पाहून का असलं हें दुर्मिळ स्थळ हातचं सोडणार? कशी तरी ही झीज आपणास सोसलीच पाहिजे." त्यांच्या पत्नी चिंतायुक्त स्वरानें म्हणाल्या.

माधवराव पुन्हां आरामखुर्चीवर लवंडले.. त्यांच्या पत्नी चहाचें सामान आवरून आंत गेल्या ते पुन्हां विचार करूं लागले. त्यांना आपल्या खर्चिक स्वभावची फार चीड आली. आपण जर सुरवातीपासून शिल्लक टाकली असती तर आजपर्यंत पांच हजार सहज जमले असते पण आतां काय? घालवलेली संधी आणि सोडलेला बाण थोडाच परत येणार होता! आतां पश्चाताप करून काय उपयोग?

परिस्थितीच्या भयाण अंधारांत प्रकाशाचा एकच क्षीण किरण दिसत होता तो म्हणजे कर्ज उभारणें. परंतु तें उभारणार तरी कोणत्या तारणावर! माधवराव अजूनसुद्धां भाड्याच्याच घरांत रहात होते. त्यांच्या पत्नीच्या अंगावरसुद्धां फारसे दागिने नव्हते. मग तारण नसतांना कर्ज मागण्यास त्यांस तोंड तरी कुठें होतें? कदाचित् त्यांच्या एकाद्या मित्रानें हें मित्रकार्य जाणून त्यांस कर्जाऊ रक्कम दिली असती; परंतु त्याची फेड कशी होणार? नुसती व्याजाची रक्कमच त्यांस पोंचण्याची मारामार--मग? त्यापेक्षां सुधेचें लग्न एक गरीब पण सुशिक्षित व होतकरू तरुण पाहून करून दिलें तर? हो! तसें करावयास काय हरकत आहे? परंतु दुसऱ्याच क्षणीं पितृहृदयानें या विचारांवर विजय मिळविला. 'पैशाचं काय मोठंसं–पण मुलगी मोठ्या, श्रीमन्त व घरंदाज घरीं, प्रेमळ माणसांच्या संगतींत आणि गुणी व हुशार नवऱ्याच्या पदरांत पडते आहे, तर मग हा स्वार्थ त्याग करायलाच पाहिजे. सुखाच्या सावलींत वाढलेल्या सुधेला दारिद्र्याच्या उन्हाची झळसुद्धां कोमेजवून टाकील.' 'मुलांमुलींत फार मोठं अंतर असतं. मुलीच्या बाबतींत एकदां झालेली चूक सुधारणं फार कठीण; किंबहुना जवळ जवळ अशक्यच असतें. मुलीला एकदां काय तो हुंडा पांडा देऊन सुस्थळीं दिली म्हणजे आपण जबाबदारींतून मोकळे होतों. मुलाच्या बाबतींत तसं नसतं. मुलाचं हित आपणास सर्व जन्म साधतां येतं. सुधेचं एकदां लग्न झालं म्हणजे आपण मग फक्त सुरेशचंच हित पहायचं.'

माधवरावांच्या मनांत वरीलप्रमाणें विचारांचा एकच सांवळागोंधळ चालला होता. त्यांनीं आपला निश्चय केला--'कांहीं झालं तरी सुधेला दादासाहेबांच्याच घरीं द्यायची. त्यापायीं मग कांहींही करावं लागलं तरी हरकत नाहीं!'

## कर्तव्याची जाणीव

कॉलेज बंद होतांच सुरेश घरीं आला. माणसाच्या अभावीं निवान्त असलेलें घर सुरेशच्या आगमनानें भरल्यासारखें झालें. त्याची गडबडी वृत्ति व मोकळा स्वभाव यामुळें वसन्तकाळीं सृष्टी जशी प्रफुल्लित होते तसें माधवरावांचें घर झालें होतें. परन्तु त्याच्या या प्रसन्न वृत्तीस साथ देण्यास बाकीच्यांचीं मनें अमार्वा तशीं प्रसन्न नव्हतीं. यामुळे त्याच्या आनन्दी वृत्तीवर थोडसें विरजण पडलें. हल्लीं सुधा, माधवराव—विशेषतः एकटीं असलीं म्हणजे उदासीन व सचिन्त असत हें सुरेशच्या लक्षांत यावयास-अवधी लागला नाहीं, व याचें कारणही शोधण्याचा त्यानें अप्रत्यक्ष प्रयत्न केला; परन्तु त्याला त्याचा थांग लागला नाहीं. संधि साधून खुद्द वडिलांसच त्यांच्या चिंतेचें कारण प्रत्यक्ष विचारावें असें त्यानें मनाशीं योजलें.

आज सुरेश अत्यानन्दांत होता. आज त्याच्या टीमनें अद्वितीय विजय सम्पादन केला होता. मुद्दाम भरवलेल्या एका मोठ्या सामन्यांत--कीं ज्यांत पंचवीस तीस टिम्सनीं भाग घेतला होता, त्यांत शेवटपर्यन्त टिकाव धरून सुरेशची टीम विजयी झाली होती. चॅंपियनशिपचा मोटाला चांदीचा कप खुद्द गव्हर्नर जनरलांच्या हस्तें सुरेशला अर्पण करण्यांत आला. शिवाय मुद्दाम गव्हर्नरनीं ठेवलेले खास बक्षिस--मूल्यवान सुवर्णपदक जो सर्वांत उत्तम खेळेल त्यास मिळावयाचें होतें, तेंही सुरेशलाच मिळालें. त्याच्या छातीवर हें पदक लटकवितांना खुद्द गव्हर्नरसाहेबांनीं त्याच्याविषयीं मोठे प्रशंसोद्गार काढले. युरोपांतसुद्धां त्याच्यासारखे अद्वितीय खेळाडू फार थोडेच मिळतील, असें त्यांनीं आपल्या भाषणांत म्हटलें होतें. त्यांनीं भाषण संपल्यावर मोठ्या प्रेमानें सुरेशशीं हस्तान्दोलन तर केलेंच, परंतु आपला थोर हुद्दा विसरून त्यांनीं त्याला प्रेमानें आलिंगन दिलें. टाळयांचा प्रचंड कडकडाट झाला, व सुरेश डौलानें त्याच्याकरतां खास ठेवलेल्या खुर्चीवर बसला. त्याच्या ब्ल्यू

ब्लेझरच्या कोटावर आतांच्या या पदकांखेरीज आणखी पंधरा वीस पदकें लखलखत होतीं. तो तीं लावीत नव्हता, परंतु त्याच्या मित्रांनीं आपलें एकएक करीत आग्रहानें त्याच्या कोटावर तीं लटकावलीं. याशिवाय आणखीही पुष्कळ पदकें त्याला मिळालीं होतीं, परंतु आणखी लावण्याचें त्यानें प्रेमानें साफ नाकारलें.

फोटोग्राफरनीं निरनिराळ्या पोझिशनचे फोटो काढल्यावर त्याच्या मित्रमण्डळींनीं त्याची एक मिरवणूकच काढली म्हणावयास हरकत नाहीं. अशा आनन्दांत तो घरीं आला, तेव्हां सगळीकडे आनन्द पसरला आहे असें त्यास वाटलें जगांतील आनन्द अगर दुःख तें पहाणारांच्या मनोवृत्तींवर अवलम्बून असतें. एरव्हीं जगांत सुखदुःखें जुळ्या भावंडांप्रमाणें बरोबरच असतात. त्यानें दिवाणखान्यांतील तसबिरीकडे पाहिलें. त्यांतील प्रत्येक विभूति आपणाकडे सस्मित पहात आहे असें त्यास वाटलें. परंतु सुखाची परमावधि झाली कीं दुःखाचा प्रादुर्भाव होतो म्हणतात. लहान मुलें फार हंसूं लागलीं म्हणजे वडील माणसें त्यांस हंसूं देत नाहींत; कारण फार हंसल्यावर तीं फार रडतात अशी त्यांची प्रामाणिक समजूत असते.

सुरेश तोंडानें कसलेंसें गाणें गुणगुणत पहुडला होता. नुकतेच पांच वाजले असल्यामुळें माधवराव यावयाची वेळ झाली होती. चहाही तयार होत आला होता, इतक्यांत ते आले. आज त्यांचा चेहरा नेहमींपेक्षां बराच प्रसन्न दिसत होता. याचा अर्थ असा नव्हे, कीं ते पूर्ण आनन्दांत होते. चिंतेचे मेघ अजूनही त्यांच्या मनात किंचित् फिरत होते. चहापान चाललें असतांना त्यांनीं संभाषणांत आज बराच प्रामुख्यानें भाग घेतला. सुरेशाला वाटलें, कीं आपल्या आनंदांत भाग घेऊन तो द्विगुणित करण्यासाठीं म्हणून ते आनन्दांचें सोंग आणीत आहेत, आणि आपल्यावरील त्यांचें हें प्रेम पाहून तो गहिंवरला.

"सुरेश, तुझ्याशीं मला कांहीं बोलायचं आहे. जेवणानन्तर रात्रीं स्वस्थपणानें बोलूं." माधवरावांनीं चहाचा कप खालीं ठेवीत म्हटलें व ते उठले.

"पण—आतांच बोलू बाबा. मला काहीं काम नाहीं." सुरेश गडबडीनें म्हणाला. परंतु आपण तें ऐकलेंच नाहींसें करून माधवराव दिवाणखान्यांत जाऊन त्यांचा एक मित्र आला होता त्याच्याशीं गोष्टी बोलत बसले. पितापुत्रांच्या संभाषणाचा विषय तितक्यावरच थांबला.

सुरेशाला मात्र चैन पडलें नाहीं. त्यानें विचार कर करून पाहिला. वडिल आपणास काय विचारणार आहेत? कुठल्या विषयावर बोलणार आहेत? त्याला त्याचा कांहींच उलगडा होईना; व त्यामुळें त्याला चैनच पडेनासें झालें. बाहेरच्या वातावरणांत तरी हे विचार आपणास सोडतील असें त्याला वाटलें, म्हणून तो कपडे करून फिरावयास बाहेर पडला. वर्तुलाकार फिरणारी वस्तु फिरून फिरून मूळ बिंदुवर येते, त्याप्रमाणें जरा कुठें या विचारांचा विसर पडला न पडला तोंच ते परत मूळ मुद्यावर येत. शेवटीं फिरण्याचा कंटाळा येऊन तो घरीं आला.

जेवण आटोपल्यावर बऱ्याच वेळानें माधवरावांनीं सुरेशला आपल्या माडीवरच्या एकान्त खोलींत बोलावून नेलें. ते एका आरामखुर्चीवर पडून विपण्ण मनानें सिगार ओढीत होते. एकामागून एक जोराचे झुरके घेतल्यामुळें सिगार सम्पली होती. याकडे त्यांचें लक्षच नव्हतें.

सुरेश आंत आल्यावर त्यांनीं त्याला शेजारच्या खुर्चीवर बसावयास सांगितलें; हातांतील सिगारचें थोटुक फेंकून देऊन त्यांनीं नवी सिगार हातांत घेतली व हळूहळू काड्यांच्या पेटीवर ती उभी धरून आपटीत ते बोलूं लागले. सुरेश शेजारच्या मेजास टेंकून उभा होता. त्याच्या नजरेस नजर देण्याचें सामर्थ्य आज त्यांच्या नजरेंत नव्हतें, ते अपराध्याप्रमाणें खालीं मान घालून बोलत होते.

'सुरेश!' एक मिनिट स्तब्धतेंत गेलें. 'आज सकाळीं आपले ते श्रीधरपन्त केंकरे माझ्याकडे आले होते.' माधवराव अडखळत अडखळत एक एक शब्द बोलूं लागले.

'श्रीधरपन्त म्हणजे तुमच्याच ऑफिसांतले व तुमच्याच विभागाचे हेड ऑफिसर ना?' सुरेशनें ते उगीच राहिले म्हणून प्रश्न केला.

'होय, तेच! ते कां आले होते हें आहे ना तुला ठाऊक?'

सुरेश उगीच राहिला. ते कां आले होतें तें त्यास कसें कळावें? ते कां आले होते याची अन्धुकही कल्पना त्यास होईना; पण माधवरावच पुढें बोलूं लागले.

'त्यांची एकुलती एक मुलगी इन्दुमति तुला ठाऊक आहे ना? तिला तुला देण्याची त्यांची इच्छा आहे—इतकंच नव्हे तर त्यांनीं मला विलक्षण गळ घालून पेचांत पाडलं आहे. एक तर ते माझे वरिष्ठ अधिकारी, शिवाय–'

सुरेश कांहींसें बोलणार होता, त्याचे ओंठही कायसें पुटपुटले, पण शब्द उमटले नाहींत. त्यानें मागें वळून पाहिलें, त्याची आई दारांत उभी होती. माधवरावच फिरून बोलूं लागले,

'सुरेश! प्रथम मी ज्या कांहीं गोष्टी तुझ्यापुढें मांडणार आहे त्यांचा विचार कर आणि मगच मला जें काय उत्तर द्यायचं तें विचारपूर्वक दे.'

विषय कोणत्या रीतीनें मांडल्यावर जास्त परिणामकारी होईल याचा जरा वेळ विचार करून ते बोलूं लागले.

''तुला ठाऊकच आहे, आतां आपली सुधा लग्नाची झाली आहे,

—आणि तिला योग्य स्थळीं द्यायची म्हणजे हुंड्याचा प्रश्न येतो. आपले दादासाहेब आहेत ना, त्यांच्या प्रभाकरावद्दल मीं त्यांच्याशीं शब्द टाकला. सुधा त्यांना पसन्त आहे, इतकंच नव्हे तर सुधेचं प्रभाकरावर व त्यांचंही सुधेवर प्रेम जडलं आहे. परंतु पांच हजार हुंड्याखेरीज तें स्थळ

हातीं येणं शक्य नाहीं. मीं आजपर्यंत केव्हांच शिल्लक टाकली नसल्यामुळं हुंड्याचा प्रश्न मला भेडसावीत आहे. तुला आतां स्पष्टच सांगतों, तूं आतां वयांत आल्यामुळ तुझ्या–माझ्यांत पुत्रापेक्षां मित्राचंच नातं जास्त आहे असं मीं समजतों. संस्कृतांत सुभाषितच आहे, 'प्राप्तेषु षोडषे वर्षे पुत्रं मित्रमसमाचरेत्." जरा वेळ थांबून सुरेशच्या चेहऱ्यावरील भाव न्याहाळीत ते पुढें बोलूं लागले, "श्रीधरपंतांची इन्दुमति ही एकुलती एक मुलगी असल्यामुळं जबर हुंड्याशिवाय त्यांची एवढी थोरली इस्टेट तुलाच मिळणार आहे. इतकंच नव्हे तर विवाहप्रसंगीं ते तशी व्यवस्थाही करणार आहेत. हा संबंध जर तूं जुळवून आणलास तरच सुधेचा विवाह करणं आम्हांला शक्य होईल; नाहींतर वाटेवरच्या उपटसुम्भाच्या हातीं सुधेचं जीवित सोपवावं लागेल." त्यांचा कण्ठ भरून आला. "विचार कर! आज सुधेचं सौभाग्य व माझी नोकरी मीं तुझ्या हातांत सोंपविलीं आहेत. मला तुम्हां तरुणांच्या मनोवृत्तींची जाणीव आहे. मीही एक वेळ तरुणच होतों. तारुण्यावस्थेचा प्रवास संपविल्याखेरीज वार्धक्याच्या राज्यांत मी पोंचलों नाहीं. परंतु परिस्थिति ही अशी आहे; आणि—"

माधवराव पुढें कांहींच बोलले नाहींत. त्यांनीं आपले डोळे धोतराच्या सोग्यानें पुसले व ते खिडकींत जाऊन उभे राहिले. सुरेश पाषाणाच्या पुतळ्याप्रमाणें स्तब्ध व निश्चल उभा होता. वडिलांचा प्रत्येक शब्द त्याच्या कर्णरंध्रांतून मस्तकापर्यंन्त पोंचत होता, व त्यामुळें त्याचें मस्तक जास्त जास्त बधिर होत होतें.

'बाळ, तूं शहाणा आहेस. सुधेचें लग्न झालं पाहिजे, व आपला योगक्षेम अखंड चालला पाहिजे; नाहींतर विष खाल्ल्याशिवाय आम्हाला गत्यन्तर रहाणार नाहीं. तेव्हां नीट विचार कर!' सुरेशची आई दरवाजांतून पुढें येऊन सुरेशच्या पाठीवरून प्रेमभरानें हात फिरवीत म्हणाली.

'चला, झोंप जा तूं आतां. उद्यां तुझा विचार स्वस्थपणानें मला कळीव.' माधवराव प्रेमपूरित दृष्टीनें व शब्दानें म्हणाले.

सुरेश जड पावलांनीं व त्याहीपेक्षां जड हृदयानें आपल्या खोलींत गेला.

सुखदु:खाशीं झगडलेल्या मनुष्यास त्यांची विशेष पर्वा वाटत नसते, परन्तु त्या बाबतींत सर्वस्वीं अनभिज्ञ असलेल्या व्यक्तीस मात्र क्षुल्लक सुखदु:खांचासुद्धां मोठा धमका बसतो. सुरेशचें आजपर्यन्तचें आयुष्य इतकें सुखांत गेलें होतें, कीं आजच्या प्रसंगानें आपण दारुण दु:खाच्या दरींत पडलों असें त्याला वाटलें. त्याच्यानें विचारच करवेना. श्रीधरपन्तांची मुलगी --आणि आपली बायको होणार! त्याला अशाही स्थितींत हंसूं आलें. 'नांव केवढं पण सुन्दर! इन्दुमति ! प्रो. फडक्यांची मानसकन्या इन्दुमतीचं काल्पनिक चित्र त्याच्या नजरेसमोर उभं राहिलं कुठं ती धनुष्याकृति भुवयांची इन्दुमति आणि कुठं हें ध्यान!' तो आपल्याशींच उद्गारला.

तारुण्याच्या हिरव्याचार प्रदेशांत पहिलें पाऊल टाकल्याबरोबर प्रत्येक मनुष्य आपल्या भावी सुखाशांचीं सुन्दर व मोहक चित्रें आयुष्याच्या फलकावर कल्पनांच्या कुंचल्यानें चितारतोच; आणि ज्योतीभोंवतीं जसें प्रकाशाचें एक वलय असतें तसेंच या सर्व सुखाशांचें केन्द्र आपली पत्नी अमुक अमुक प्रकारची असावी हें असतें, हा सर्व साधारण सिद्धान्त आहे—यास अपवादही क्वचित असतील, नाहीं कुणी म्हणावें!—सुरेशला पण आपली पत्नी त्याच्या अत्यन्त आवडत्या लेखकाच्या, प्रो. फडक्यांच्या मानसकन्यांप्रमाणें असावी असें फार फार वाटत होतें. इन्दुमति, निर्मला, मीनाक्षी, मन्दाकिनी—प्रत्येकीच्या सौंदर्याची एकेक तऱ्हा त्याच्या मन:चक्षूसमोर उभी रहात असे. परन्तु सत्य सृष्टींत-- !

सुरेश ! हताश अंतःकरणानें अंथरुणावर पडला.

आणि खरेंच, सुरेशाला हताश होण्यास तसेंच सबळ कारण होतें. त्याची भावी वधू इंदुमति केंकरे म्हणजे तशीच असामान्य होती! तिचें सौन्दर्य वर्णन करण्यास चार तोंडांचा ब्रह्मदेव, किंवा हजार तोंडांचा शेष बोलावण्याची जरूरी नव्हती. जगांतील कुरूपतेच्या काढ्याचा अर्क म्हणजेच इंदुमति होती, इतकेंच तिच्या सौन्दर्याचें वर्णन केल्यास पुरें होतें. एका गोष्टीची उणीव दुसऱ्या गोष्टींत भरून काढावयाची म्हटल्यास, वडिलांच्या श्रीमन्तीशिवाय दुसरा कोणताही गुण तिच्या अंगांत नव्हता. शिक्षणाच्या नावानें आंवळयाएवढेंच कां—सूर्यगोलाएवढें पूज्य स्वभावानें फार हलक्या अंतःकरणाची व कुढ्या स्वभावाची, आणि त्यांत आणखी श्रीमन्तींत वाढल्यामुळें लाडांनीं शेफारलेली.

आपला भावी संसार कितीसा सुखाचा होईल हें सुरेशला स्पष्टच दिसत होतें. 'छट्, माझ्या आयुष्याची अशी उघड्या डोळयांदेखत मी राख होऊं देणार नाहीं.' त्याला किंचित् समाधान वाटलें.

पण दुसऱ्याच क्षणीं आणखी दोन चित्रें त्याच्या नजरेसमोर दिसूं लागलीं. हुंडयामुळें अडून राहिलेली, समाजानें वाळींत टाकलेली आपली लाडकी बहीण सुधा अपुऱ्या वस्त्राच्या पदरानें डोळे पुशीत आहे, व नोकरी गेल्यामुळें दरिद्री झालेले माधवराव फाटक्या वस्त्रांनीं, आसरा नसल्यामुळें भर रस्त्यांतून वणवण हिंडत आहेत. त्याच्यानें हीं दृश्यें पहावेनात. त्यानें डोळे मिटले, पण तींच तींच चित्रें जास्त भेसूरपणें त्याच्या दृष्टीपुढें नाचून त्यास भेडसावूं लागलीं. त्याच्या अंगावर नुसत्या कल्पनेनेंच शहारे आले, त्याला भय वाटलें; तो बाहेर गच्चीवर जाऊन उभा राहिला.

पौर्णिमेचा चन्द्र वैभवाच्या शिखरावर विहरत होता. सुरेश एक-

सारखा त्या चन्द्रबिम्बाकडे पहात होता. पुष्कळ वेळ असाच विमनस्क मनःस्थितींत गेल्यावर त्याच्या मनांत विचार येऊं लागले; केवढा स्वार्थत्यागी हा चन्द्र! स्वतःच्या मानलेल्या बहिणीस, पृथ्वीस त्रास होऊं नये, किम्बहुना तिला थोडेंबहुत तरी सुख मिळावें म्हणून स्वतःस सूर्याच्या प्रखर किरणांनीं भाजून घेऊनच तिला तो सुन्दर व शीतल चांदणें देतो ना? स्वतः दुःख भोगावें लागलें तरी हरकत नाहीं, पण जगास सुख व्हावें म्हणूनच थोर थोर महात्मे झटतात ना? आपल्या देशबांधवांस सुख व्हावें म्हणूनच आईबापांचा एकुलताएक मुलगा आपला देह राष्ट्रास अर्पण करतो ना? तर मग माझ्या कुटुम्बास, इतकेंच नव्हे तर पाठीस पाठ लावून आलेल्या एकुलत्याएक बहिणीसाठीं व जन्मदात्या पित्यासाठीं मी एवढाही स्वार्थत्याग करूं नये?

असाच कांहीं वेळ निघून गेला—दिवाणखान्यांतील घड्याळानें बारा टोले दिले. सुरेश भानावर आला; त्यानें सभोंवार पाहिलें. सारें जग जणु पूर्ण शान्तीचा आस्वाद घेत होतें;—त्यानें अश्रपूरित नजरेनें चन्द्राकडे पाहिलें, त्याच्या स्वार्थत्यागाची पूर्ण कल्पना सुरेशला झाली व त्यानें हात जोडले.

"कर्तव्याची जाणीव करून देणाऱ्या सुधाकरा! माझा, या चुकलेल्या मुलाचा प्रणाम घे." ढगांच्या मऊ गाद्यांवर विरल अभ्रांची दुलई पांघरलेल्या तारानाथानें तोंडावरील पांघरूण काढून पाहिलें व लगेच आपली उठावयाची वेळ झाली नाहीं म्हणूनच की काय तो पुन्हां आपलें पांघरूण लपेटून घेऊन निजला.

---

# हृदयाचें असमाधान

क्रिस्तिना जुलियेच्या घरीं आजच नोकरीस आली. बंगल्याच्या आवारांत पोंचतांच तिला भांबावल्यासारखें झालें. जुलियेचा बंगला सुन्दर होता, बंगल्याचें कम्पाउन्ड पण सुन्दर होतें. आणि बागेंत लावलेलीं चित्रविचित्र रंगाच्या पानांचीं आणि फुलांचीं सुन्दर झाडें त्या सौंदर्यांत भर घालीत होतीं जुलियेच्या सौंदर्याची तारीफ आणखी निराळी नकोच. या सुन्दर वातावरणाची मालकीण शोभेशी ती सुन्दर होती. बागेंतल्या पारिजाताच्या तांबूस देंठाच्या कळ्या आणि जुलियेच्या तांबूस हिरड्यांवरील दातांच्या हिरकण्या यांची स्पर्धा चालूच होती. चांफेकळीशीं तिच्या नाकाचें नातें जुळत होतें. बागेंतले गुलाब एकवेळ उमलत नसत, पण जुलियेच्या गालांवरचे गुलाब —

—जुलियेचें सगळें कांहीं सुन्दर होतें.

—आणि क्रिस्तिना ?

—तिच्या रंगाची तुलना करण्यास जुलियेच्या बागेंत कांहींच नव्हतें, नाहीं म्हणावयास सब्दुलीचीं फुलें गळून त्या जाग्यावर काळीं कुळकुळीत बीयें दिसत तेवढींच. दूर मागच्या दारीं, बेढब वाढलेल्या बदामाच्या झाडाखेरीज तिच्या बेढब शरिरयष्टीला दुसरी उपमा नव्हती

आणि गोकर्णीच्या फुलांतल्या मधल्या दोन पाकळ्या तिसऱ्या पाकळीपासून उठून दिसाव्या त्याप्रमाणें तिचे दांत खालच्या ओंठाबाहेर डोकावत होते.

---क्रिस्तिनेला वाटलें, किती सुन्दर वातावरण हें? आणि त्यांत आपण —? सौंदर्याच्या पार्श्वभूमीवर आपलें कुरूप चित्र जास्तच हिडीस नाहीं का दिसणार?

---पण लगेच तिचं दुसरें मन तिला म्हणालें 'तुला काय करायचं आहे इतर गोष्टीशीं? कुठें तरी नोकरी ही केलीच पाहिजे.' तिनें त्या विचारांची हकालपट्टी केली.

जुलियेनें तिला आपले उंची कापडाचे पण किंचित जुने झालेले कपडे दिले. क्रिस्तिनेच्या कुरुपतेला साजून दिसणारे ते मळके कपडे दूर झाले पण या नव्या ऊंची कपड्यांचा सुखस्पर्श तिला फारसा सुखावह झाला नाहीं. ते उंची कपडे आपणास अगदींच शोभत नाहींत असें तिला वाटलें. त्या कपड्यांनी आपली शोभा वाढण्यापेक्षां त्या कपड्यांचीच शोभा होत आहे असें तिला वाटलें. सुन्दर माणसांचें सौंदर्य वस्त्राभरणांनीं खुलत असेल, पण कुरूप व्यक्तींनीं ते पेहरले म्हणजे उलट त्यांचें सौंदर्य विटकें होतें. सुन्दर फुलांनीं प्रेत श्रृङ्गारण्यासारखाच प्रकार तो.

बंगलींतलें फर्निचर, रुजामे, दारांचे पडदे, भीन्तीवरचीं चित्रें, सगळें सगळें कांहीं जुलियेच्या रसिकपणाची व सौंदर्यदृष्टीची साक्ष पटवीत होतें. सगळें कांहीं सुन्दर आणि आपण तेवढें कुरूप; सुन्दर रमणीच्या गालावरचा तीळ तिच्या सौंदर्यांत भर घालतो; पण डांबराचा डाग! त्या मुळें कुठें सौंदर्य वाढतें का?

* * *

साडेपांच वाजतां जुलियेचा लुईश, आफिसांतून आला, तो पण सुन्दर होता. क्रिस्तिनेला वाटलें होतें की लुईश, तेवढा देखणा नसेल. पण--

## ........................................हृदयाचें असमाधान

क्रिस्तिनेचा अंदाज अगदीं चुकला. तो जुलियेला अगदीं शोभेसा होता हें पाहून तिला गुदमरल्यासारखें झालें.

पतिपत्नीचा चहा हंसत खेळत चालला होता; लुईशनें मध्येंच आपल्या पेल्यांतला चहा जुलियेच्या पेल्यांत ओतावा, आणि तिनें गोड संभ्रमानें त्याच्याकडे पाहून आपल्या बशींतले खाद्य त्याच्या तोंडांत घालावें.

—आणि क्रिस्तिना भारावलेल्या हृदयानें हें दृश्य पहात होती, तिला तें दृश्य गोड वाटलें, पण आनन्द झाला नाहीं. उलट अन्तर्यामीं थोडासा खेदच वाटला. हळुवार हातानें कोणीतरी जखमेवरील पडदा काढावा व जखम उघडी पडावी असें तिला झालें. जुलिया तिच्यापेक्षां सहा वर्षांनी लहान होती. पण ती संसारसुखांत नुसती न्हाऊन निघत होती, आणि क्रिस्तिना त्याच अमृताच्या थेंबाकरतां तळमळत होती. ज्या सुखाचा बिन्दु आपणास स्वप्नांतही मिळाला नाहीं, त्याचा मनमुराद उपभोग दुसरीं घेतांना पाहिलें म्हणजे मन असेंच होत असेल.

उठतां उठतां जुलिया म्हणाली 'लुईश मला तुझ्यावांचून इथें करमत नाहींरे! मी त्याला काय करूं?'

लुईशनें तिला कायसें उत्तर दिलें, पण क्रिस्तिनेचें तिकडे लक्षच नव्हतें.

जुलिया आणि लुईश गच्चीवर जाऊन बसलीं. जुलियेच्या पियानोचे व लुईशच्या गाण्याचे अस्पष्ट स्वर तिच्या कानीं येत होते.

चहाच्या सामानाची आवराआवर करतांना तिच्या मनांत निराळेच विचार वावरत होते.

जुलियेला लुईशचा अवघ्या तासांचा विरह सहन होत नाहीं आणि मला? हा मरेपर्यंतचा चिरविरह सोशीत जगावें लागणार' क्रिस्तिना म्हणत होती.

सामानाची आवरा आवर करतांना तिचा हात तेथेंच थबकला.

— तिच्या प्रणय विषयक आठवणी? तिनें आठवणीला ताण दिला पण नुसता रखरखाट! सहारा वाळवण्ट नुसतें! सहाऱ्यांत तरी ओयासीस सांपडतील पण तिच्या आयुष्याच्या वैराण वाळवंटांत तिला प्रणयाचा ओयासीस चुकून सुद्धां मिळाला नाहीं. कोणाही तरुणानें तिच्याशीं प्रणययाचना केली नव्हती नुसतें मान वळवून देखील पाहिलें नव्हतें. तरूण स्त्री स्वभावानुरूप आपण पुरुषांशीं मैत्री करावी, प्रितीचे खेळ आपणही इतरांप्रमाणें खेळावे असें तिला फार वाटे, पण कोणीही तरुण तिला आपल्यास सहवासास थारा देत नव्हता. मग नुसती इच्छा असून काय उपयोग! आकाशांत चमचमणाऱ्या चिमखड्या तारकांची माळ आपल्या प्रियकरणीच्या गळ्यांत घालावी असें कुणा प्रियकराला वाटणार नाहीं?

जुलियेच्या इथें येण्यापूर्वीं क्रिस्तिनेनें इतकें प्रेमळ व प्रणयी जोडपें कुठेंच पाहिलें नव्हतें; इतका सुखाचा संसार तिनें केव्हांच कल्पिलेला नव्हता.

मागें ती एका पेन्शनर म्हाताऱ्याच्या घरीं नोकरीस होती, त्याला बायको नव्हतीच. आणि मुलेंही कुठें पोटासाठीं परदेशी होतीं—त्याची वास्तपुस्त तिलाच करावी लागे. त्यानें खोंकून खोंकून भरलेल्या कफाची पीक–दाणी बाहेर नेऊन ओततांना तिला शिसारी येई.

त्यानन्तर ती एका सार्जण्टाच्या घरीं राहिली. तो दारुडा होता तर त्याची चढेल बायको मूर्ख व हट्टी होती. त्यांच्या घरांत भांडणें हीं नेहमींच चालायचीं, आणि भांडण शिखरास पोंचलें म्हणजे त्यानें दारूच्या कैफांत तिला यथेच्छ बडवायचें, हा जवळ जवळ त्यांचा ठरीव कार्यक्रम होता. ही मारझोड तिला आवडत नव्हती, पण तिनें त्या आवडीनिवडींना केव्हांच महत्व दिलें नाहीं. प्रत्येक वेळीं ती नोकरी सोडतेवेळीं पगाराकरतां अगर

दुसऱ्या कसल्या तरी बलवत्तर कारणाकरतांच ती सोडीत असे केवळ आवडीनिवडीकरतां नव्हे.

आज जुलियेचा सुखी संसार पाहून तिला प्रथम बरें वाटलें पण तें सुख अन्तरीं कुठें तरी सलतें आहे असा तिला अनुभव आला.

माणसाचें असेंच असतें, तो गरिबींत सुख मानून असतो, पण कोठवर? त्याच्या शेजारीं श्रीमन्त माणूस नसतें तोंवर. शेजारच्या त्या नव्या श्रीमन्त माणसाची सम्पत्ति पाहून तो क्षणभर आनन्दीत होईल. पण आपणाजवळ तें अल्पांशानेंही नाहीं हें पाहून त्याला तें गरीबीचें दुःख जास्त तीव्र होत असतें.

जुलियेनें क्रिस्तिनेला हांक मारली. क्रिस्तिना तशीच धडपडतच वर गेली. लुईश खालीं टेबलावर सिगारेटचा डबा विसरला होता तो आणण्याकरतां ती वळली इतक्यांत तिच्या कानावर शब्द आले.

लुईशचा एक मित्र त्याच्याकडे गप्पा झोडायला आला होता आणि तोच बोलत होता.

—'लुईश ही आफ्रिकन हुंडी केव्हां घेतलीस बाबा!' आणि तो खदखदां हंसला.

क्रिस्तिनेनें तें ऐकलें पण न ऐकण्यावर घालविलें; पण तो बाण तिच्या हृदयीं लागलाच, आणि त्यांतून निघालेलें रक्त अश्रुरुपानें ओघळलें.

* * *

रात्रीचें जेवण झाल्यावर जुलिया आणि लुईश फिरावयास निघालीं. क्रिस्तिना नको म्हणत असतां जुलियेनें तिला बरोबर घेतलें.

रस्ता ओलांडून तीं 'वेळे' वर रेतींत उतरलीं. आकाशांत तारका-

बरोबर चंद्र प्रेमाचे खेळ खेळत होता. घटकेंत त्यानें ढगांच्या विरल शे-ल्यानें आपलें तोंड झांकून घ्यावें तर क्षणांत तो बुरखा टाकून द्यावा. तारका आपल्या चमचमणाऱ्या नेत्रांनीं तें पहात होत्या.

जोत्स्नेच्या प्रकाशांत वेळेवरची रेती मोत्यांच्या चुऱ्याप्रमाणें शोभत होती. समुद्र आपलें प्रणय संगित गात व आपल्या हजारों जिभांनी धर-णीला चुम्बीत तिची प्रणयाराधना करीत होता. रेतीचा गुदगुल्या करणारा सुखस्पर्श पायांला होतांच क्रिस्तिनेच्या अंगांतून कसली तरी एक सुखद चमक निघून गेली. तिनें जुलियेकडे पाहिलें; लुईशनें आपल्या उजव्या हाताचा विळखा तिच्या कंबरे सभोंवतीं घातला होता, प्रणयी प्रियकराच्या स्पर्शांत किती अमृत सांठविलें असेल याची क्रिस्तिनेला अनुभव नसतानां-सुद्धां कल्पना आली.

जुलिया मध्येंच आपणास सोडवून घेत म्हणाली 'लुईश मला धर पाहूं!' आणि ती रेतींतून भराभर धावूं लागली. मंत्रमुग्ध नागाप्रमाणें लुईशही तिच्या मागें धांवूं लागला. तिचे उंच टांचाचे बूट तिला धांवतांना फार त्रास देत. ती मध्येंच पडे पण लगेच उठून धांवण्यास प्रारंभ करी. लुईश जवळ आला असें पाहतांच तिनें चटकन् बसावें, लुईश धावण्याच्या वेगांत जरा पुढें निघून जाई. खट्याळ जुलिया खदखदां हसत उठे आणि विरूद्ध दिशेनें धावूं लागे.

शेवटीं लुईशनें तिला पकडलेंच; आणि तिनें दिलेल्या या धांवण्या-च्या त्रासाची खंडणी वसूल केली. एकाद्या अधाशाप्रमाणें त्यानें तिच्या गळयाचीं, ओंठाचीं, कपाळाचीं, गालाचीं व केसांची किती तरी चुंबनें घेतलीं. जुलियेनें थोडासासुद्धां प्रतिकार केला नाहीं. तिनें त्याच्या खांद्यांवर असहायपणें मान टाकली होती.

—क्रिस्तिनेला हें दृश्य गोड वाटलें, पण नीट पहावलें नाहीं;

आपल्या हृदयाचें आजपर्यंत अबाधित असलेलें समाधान आपण हिरावून बसलों याची तिला तीव्र जाणीव झाली. हें असलें जीव जाळणारें सुख नित्य पहाण्यापेक्षां जुलियेची नोकरीच सोडून जावें असें देखील तिला वाटलें.

मित्रवर्य प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या 'हृदयाचें समाधान' (कल्पवृक्षांच्या छायेंत) या लघुकथेची दुसरी बाजू.

# रावबांचं ऋण

कामावरून येतांच बाबलीनें मोठ्या आनन्दानें 'मिलेर' फोडला तांब्याच्या पैशांची रास पडली. त्याला वाटलें आतां आपण कोणाच्या बापाला भीत नाहीं. त्यानें पैसे मोजले, मघां चेहऱ्यावर विलसणारा बेडरपणाचा प्रकाश लोप पावून आतां तेथें लाचारीची खिन्न संध्या पसरली होती.

त्यानें आणखी दोनदां ते पैसे मोजले; पण फक्त पांच रुपये पावणेचवदा आणेच निघाले. त्यानें ते परत मोजले नाहींत; न जाणो मापलेलं धान्य परत मापलें तर कमी भरतें असा त्याचा शेतकऱ्याचा अनुभव होता! पैशांच्या बाबतींत आणखी तसें व्हावयास नको!

त्याच्या चेहऱ्यावर चिंतेची दाट छाया पसरली. वळिवाच्या पावसाच्या वेळीं कडकडीत असणारें चक्क ऊन देखतां डोळां नाहींसें होऊन सूर्य होण्यास देखील अभ्राच्छादित वेळ लागत नाहीं. तसेंच बाबलीचें झालें—

संध्यासमयीं दिसणारा विरल अंधार जसजशी रात्र होते तसतसा वाढत जातो. बाबलीच्या चेहऱ्यावरील चिंतेचे मेघ हळुहळू इतके दाट झाले कीं, त्याचा चेहरा काळा टिक्कर पडला.

त्यानें आज जवळ जवळ दोन तीन महिने कमावलेला मजुरीचा पैसा फक्त जीवनोपयोगी वस्तूंखेरीज कशांतही खर्च होऊं न देतां सांठवून ठेवला होता. खेडेगांवची मजुरी ती काय आणि त्या मानानें खर्च जाऊन शिल्लक ती काय रहाणार! आपल्या फाटलेल्या लंगोट्यादेखील त्यानें नवीन न घेतां ही शिल्लक जमविली होती व त्यांतील पैसे काढण्याचा मोह होऊं नये म्हणून त्यानें ती मिलेरांत ठेवली होती. पैशाकडे अनिमिष नजरेनें पहात तो तसाच बसला होता.

मनुष्यास जरी कोणचीही सोबत नसली तरी विचार हा त्याचा सख्खा जिवलग त्याची पाठराखण करावयास नेहमींच तयार असतो. चिखलांत रुतलेला आणि विचारचक्रांत गुरफटलेला मनुष्य, दोघेही सारखेच. त्यांतून सुटण्याची जों जों धडपड करावी तों तों जास्त जास्त गुरफटत जातात.

'कालवण झालं! न्हाऊन येतां ना?' फुलूनें बाहेर येऊन विचारलें.

बावलीची विचारप्रणाली तुटली. तो तात्पुरता तरी त्या त्रासांतून मोकळा झाला.

हा! पण हे पैसे काढून ठेव बघूं!"

"कुठून आंणलेत हे?"

तिची नजर मिलेराच्या फुटलेल्या खापऱ्यांकडे गेली.

'हां मिलेर फोडलांत वाटतं?' फुलूनें विचारलें.

'हो! उद्यां रावबा नाडकर्णी येणार ना? उद्यां त्याच्या वायद्याचा शेवटचा दिवस' बावली सुस्कारला.

'हो! मला मेलीला आठवणच नव्हती त्याची! उद्यां त्याच्या रकमेची फेड झाली नाहीं तर तो काय करील नि काय नाहीं देवास माहीत!

आमच्या आईबापांचा उद्धार करून शिव्यांची लाखोली वाहीत मेला—'
फुलूनें अंग शहारल्यासारखें करून म्हटलें
बावली अगदीं स्वस्थ बसला होता, जणूं काय दगडच ?

'किती पैसे निघाले हे?' फुलूनें खुर्चाकडे बोट करीत विचारलें

'सहा रुपयांत नऊ पैसे कमी' बावलीनें खिन्नतेनें उत्तर दिलें.

'अगो ऽऽ बया! मग त्याला आणखी पुष्कळ दिले पाहिजेत तर?'

'हो. त्याला चवदा रुपये व सहा महिन्यांचं व्याज इतकी रक्कम दिली पाहिजे.' बावली उत्तरला.

'मग कसं होणार तर?' काळजीच्या काजळीनं आपला रंग फुलूच्या चेहऱ्यावर चढविला.

बावली बसला होता त्याच निश्चल स्थितींत होता. फुलू दरवाजाची लांकडी चौकट धरून उभी होती. राकेलची खिळयाला अडकवलेली दौत भक्भक् धूर सोडीत होती, व त्या धुराचा एक थर ओसरीच्या गवती छपराखालीं तरंगत होता; आणि या सगळया गंभीर वातावरणांत तो दिव्याचा तांबूस प्रकाशसुद्धां चमत्कारीक दिसत होता. त्या गम्भीर खिन्नतेचा भंग करीत फुलूच थोड्या वेळानें म्हणाली,

'उद्यांचं उद्यां? देवा वेताळा, तूं पाव! चला तुम्हीं आंघोळीला भात थंड होऊन जाईल.'

बावली उठला, त्यानें खिळयाला अडकावलेला तो दिवा घेतला. दिव्याचा प्रकाश जवळ आल्यामुळें त्याच्या अंगावरील चिखलाचे डाग स्पष्ट दिसूं लागले.

'हें बघ, माझ्या अंगाला या भाताच्या धुशीनं कशी अगदीं खाज सुटली आहे. थोडं तेल माझ्या हातावर घाल.'

'बघतें हं बाटलींत कांहीं असलं तर. फुलू आंत गेली, बाटलींतील

तेल परवांच्या रोजीच संपलें होतें हें तिला ठाऊक होतें; पण वेडी आशा! —असेल निदान पळीभर तरी.

एक लहानशी बाटली घेऊन ती बाहेर आली व तिचें कागदी बूच काढून तिनें ती नवऱ्याच्या हातावर उपडी केली. बऱ्याच वेळानें दोन तीन थेंब त्याच्या हातावर पडले.

'पुरे पुरे! पुष्कळ झालं.' त्यानें हात छातीस चोळला. गरिबींत समाधान मानण्याची त्याला संवयच होती. तो दिवा घेऊन न्हाणीकडे गेला. फुलूचे डोळे मात्र पाण्यानें भरून आले. तिनें ते पुसले व तीही न्हाणीकडे गेली.

अंगणाच्या एका टोकास न्हाणी होती. न्हाणी म्हणजे तीन धोंड्यांवर गवताच्या चुंबळ्यांवर ठेवलेली वरीलकांठ फुटलेली मातीची मडकी व उभें राहून आंघोळ करण्यास ठेवलेला फळीचा एक तुकडा.

'थण्ड पाणी पाहिजे कां?' फुलूनें मडकींतील पाण्याची उष्णता हातानें अन्दाजीत प्रश्न केला.

भरलेला तांब्या अंगावर ओतीत तो म्हणाला, 'छे-छे नको-पाणी तितकं कडक नाहीं.'

वास्तविक पाणी बरेंच कढत होतें. फुलूला विहीरीवर जाऊन पाणी आणावयास त्रास होईल ही जाणीव त्याला होती. सुशिक्षितांचें प्रेम बोलकें व अशिक्षितांचें मुकें असतें.

बाबलीनें कोरडी लंगोट लावली व तो जेवावयास बसला.

फुलूनें ताटलींत उकड्या तांदळांच्या तांबूस भातावर तांबडेंभडक पेडव्याचें कालवण घातलें.

कालवणांतील पेडवे बाजूला काढून ठेवीत तो म्हणाला, 'उद्या कसं होणार?'

'उद्यांचं उद्यां! देवाला आहे आमची काळजी.' फुलू म्हणाली. वास्तविक तिलासुद्धां हाच प्रश्न पडला होता; पण तिनें तसें दिसूं दिलं नाहीं. पुस्तकें न वाचतांसुद्धां पत्नीधर्म तिला उत्तम कळत होता.

—जेवतां जेवतां बाबलीस कसलासा संशय आला,

—'तुला नाहीं का राखलेस कालवणांतले?' बाबलीनें प्रश्न केला.

—'आहेत तर!'

बाबलीला खरें वाटेना–एका पैशाचे पेडवे ते किती येणार? आणि त्या मानानें त्याच्या पानावर पुष्कळ पडले होते. त्यानें दवल्यानें कुयण्यांत धवळून पाहिलें पण त्यांत कांहींही नव्हतें. आपल्या पानावरील थोडे त्यानें फुलूकरतां राखून ठेवले व तो उठला.

*　　　*　　　*

बाबलीच्या ऋणाचा इतिहास असा होता. बाबलीनें आपल्या बापाच्या आजाराच्या वेळीं रावबा नाडकर्ण्यांकडून सात रुपये उसनवट म्हणून व्याजीं घेतले. फेर्डीचा वायदा दोन महिन्यांचा होता. सात रुपये मुदलाचें तीन रुपये व्याज मिळून दहा रुपयांची रक्कम बाबलीनें पिकावर घ्यावयाची असें ठरलें होतें. परंतु बाबलीच्या बापाचें दुखणें वाढतच गेलें व वरिष्ट हुकुमान्वयें त्याची या जगांतून दुसऱ्या जगांत कायमची बदली झाली, आणि तीही ऐन पिकावर.

फिरंगी भाषेंत एक म्हण आहे–'मनुष्य हा इतका दुर्दैवी प्राणी आहे कीं, त्यास मेल्यानन्तरसुद्धां चार माणसांची आवश्यकता लागते.'

'परंतु बाबलीस चार माणसांखेरीज वडिलांच्या अंत्यविधीस आवश्यक सामानाकरितां रावबा नाडकर्ण्यांकडून आणखी तीन रुपये कर्जाऊ घ्यावे लागले. प्रथमचे दहा व आतांचे तीन मिळून तेरा व पंधरावीस दिवसांचें व्याज एक रुपया मिळून चवदा रुपयांचा हा बोजा होता.

जवळ जवळ पावसाळा बापाच्या दुखण्यांत गेल्यामुळें बावलीस आपल्या शेताकडे मुळींसुद्धां लक्ष. द्यावयास मिळालें नाहीं योग्य काळजीच्या अभावीं व गुरांढोरांनीं राहिलेलें खाऊन टाकल्यामुळें त्याला चांगलें पीक आलें नाहीं व त्यामुळें रावबांच्या ऋणाचा बोजा त्याच्या मस्तकीं तसाच राहिला.

भाताची मळणी चालू असतांना रावबांनीं आपल्या पैशांची निकड लावली; पण जें काय पिकलें होतें तें धन्याचा खण्ड वजा जातां ऋणाच्या फेडीस पुरण्याजोगें नसल्यामुळें त्यांनीं बावलीस आणखी दोन महिन्यांची मुदत मोठ्या मेहेरबानीनें मंजूर केली आणि या दोन महिन्यांचें व्याज म्हणून त्यांनीं बावलीकडून दहा कुडव भात देण्याचें कबूल करून घेतलें.

एकाएका धनकोचा असा विचित्र हातगुण असतो कीं, एकदां त्यांचें ऋण कोणी काढलें तर त्याची फेड होणें पुष्कळ दुरापास्त असतें. रावबाविषयीं कुळवाडी वर्गांत असाच समज होता.

त्या वर्षी बावलीस अनेक अडचणी आल्या. त्याची बायको फुलू आजारी पडली; ती बरी होते न होते तोंच त्याच्या स्वतःच्या पायावर कुऱ्हाड बसून बराच मोठा घाव झाला व त्यामुळें तो दोन तीन महिने निकामी झाला. त्यामुळें त्या वर्षांत ऋण फारीक कुठून करणार? परन्तु यन्दां पिकावर काय होईल तें होवो, आपणास जेवणास राहिलें नाहीं तरी फारीक करावयाचें म्हणून त्यानें एक खण्डी भात नेऊन रावबाच्या घरीं घातलें.

चौदा रुपयांचें व्याज पांज रुपये अन कितीसे आणे. त्यांतून भाताची किंमत वजा जाऊन, वगैरे हिशेबाचें भारूड उभारून ऋणाचा पक्का आंकडा बारा रुपये करण्यांत आला व ही रक्कम जर एका महिन्यांत

फिटली नाहीं तर एका महिन्याचें व्याज व दण्ड मिळून ऋणाची रक्कम पुन्हां चवदा रुपये होईल अशी तम्बी रावबांनीं गेल्या दोन महिन्यांपूर्वी बावलीस दिली होती.

आणि बावलीच्या दुर्दैवानें हाही वायदा चुकला व ऋणाचा आंकडा चवदा रुपयांवर आला; आणि इतकेंही असून जर रक्कम पंधरा दिवसांनीं मिळाली नाहीं तर "पुलिसेंत केस" (पोलिसांत फिर्याद) करीन अशी दहशत रावबांकडून त्याला घालण्यांत आली!

* * *

आणि तो सोमवार व दसरा आज. रावबांच्या वायद्याचा अजचा हा शेवटचा दिवस. भल्या सकाळींच रावबा बावलीच्या दाराशीं प्रविष्ट झाले. बावलीनें अंगणाच्या ओट्यावर कांबळ पसरली, रावबा त्यावर पोट सांवरून बसले.

'बावली, माझ्या पैशांचा काय विचार केलास?' रावबांनीं सामानेंच सुरवात केली.

'धन्यानूं, करतों थोडं थोडं करून फारीक?' बावली लाचारपणानें म्हणाला.

'अरे, थोडं थोडं म्हणून सांगायला शरम नाहीं वाटत? किती दिवस झाले रे या रकमेला? आणि वायदे काय थोडे केलेस?' रावबा तुच्छतेनें व तिरस्कारानें म्हणाले.

'होय, आम्हीं नाहीं का म्हणतों?' बावलीनें तोंड वेंगाडलें.

'तें कांहीं चालणार नाहीं, मला आजच्या आज पैसे मिळाले पाहिजेत. नाहींतर बघ मी पुळीसेंत कोमान्दांन्तीस सांगून ठेवलेंच आहे.'

'धनी, असं करू नका, आतांच्या आतां पैसे कुठून आणूं?'

'अरे, पैसे नाहींत तर बायकोला...' रावबा गरजलें.

बावली रागानें लालबुन्द झाला. त्याला वाटलें असेंच्या असें जाऊन त्यांच्या नरडीचा घोंट घ्यावा! पण? तो लाचार होता. त्यानें संयम केला. तरी पण त्याचे डोळे रागातिरेकानें लालबुंद झाले होते—रावबाला त्याच्या डोळ्यांस डोळा भिडवण्याचें धैर्य झालें नाहीं. तो दुसरीकडे पाहूं लागला.

'सायबानूं, आमच्यावर दया करा! आम्ही तुम्हांस नागवलं का आहे? दहा रुपये रकमेच्या व्याजापोटीं मीं तुम्हांस दीड खंडी भात दिलं, आजच्या दरानं पैसे केले तरी दहा रुपये सहज होतील, पण मीं व्याजा-बद्दल म्हणतों का कांहीं?'—

'हो तर? मोठा आला आहे फिदाल्ग! जेंटलमेनच कीं तूं! म्हणे व्याज घेतलं अरे, पैसा कांहीं झाडाला पिकत नाहीं. तुम्हीं शेतांत एक दाणा टाकून शंभर दाण्यांचं कणस नाहीं कारे काढीत? त्या वेळीं तुम्हांला वाटत नाहीं कीं बाबा मीं एक दाणा पेरला होता त्यालाच हें एवढें कणस आलं आहे म्हणून—तुम्हीं शेतांत राबतां, आम्हीं कुठं शेत लावतों? आमचं शेत हें–हा आमचा सावकारीचा धन्दा! तें कांहीं नाहीं, चवदा रुपये घेतल्याशिवाय मीं इथून हालणार नाहीं.' रावबा गरजले. त्यांना इतक्याच बोलण्यानें श्वास लागला.

'धनी! एवढे हे पैसे घ्या, आणि राहिलेल्या दोन महिन्यांची सवड द्या.' बायकोच्या हातून पैशांची परचुंडी घेऊन त्यानें रावबांच्या हातीं दिली.

'किती आहेत रे हे?' रावबा गुर्मीनेंच म्हणाले.

'पांच रुपये पावणे चवदा आणे.' बावली भीतभीत म्हणाला.

'तूं काय माझी थट्टा करतोस कीं काय? चवदा रुपयांऐवजीं पांच रुपये?' रावबा तुच्छतेनें म्हणाले व त्यांनीं पैशाची पुरचुंडी भिरकावून दिली.

जीर्ण झालेली चिंधी ती, खुर्द्याच्या वजनानें व जमिनीवर बसलेल्या आघातानें टरकन् फाटली व खुर्दा अंगणभर शिंपडला.

रावबांनीं रुद्रावतार धारण केला होता, शिव्यांची तर संततधार त्यांच्या तोंडून वाहत होती आणि गरीब विचारा बावली मुकाट्यानें ऐकत होता!

शेवटीं हातापायां पडून, हो ना करतां तडजोड झाली. पांच रुपये पावणेचवदा आण्यांपैकीं एक रुपया पावणेचवदा आणे त्यांनीं दंडादाखल घ्यावे व ऐन रकमेंत चार रुपये कमी करावे.

अशा रीतीनें हा देवचार एक रुपया पावणेचवदा आण्यांचा बळी घेऊन तात्पुरता तरी थण्ड करण्यांत आला.

* * *

कां कुणास ठाऊक, पण भर पाडव्याच्या दिवशीं रावबांच्या घरास ऐन दुपारीं आग लागली. आगीचें कारण कुणासच कळलें नव्हतें. त्यांच्या वाइटावर असलेले व त्यांनीं नाडलेले पुष्कळ लोक होते. परंतु भर दुपारीं असलें कृत्य करण्यास कोण धजणार?

एरव्हीं आग कांहीं वाऱ्या सारखी पसरत नाहीं; परंतु रावबाच्या घरीं मात्र हा चमत्कार झाला. प्रथम स्वैंपाकघराची बाजूच पेटली होती, परंतु अल्पावधींतच ही आग बरीच पसरली.

कोणी म्हणत कीं, रावबानें पावसाच्या दिवसांत पागोळ्याच्या पाण्यानें भिन्ती भिजूं नयेत म्हणून चुडतांचा त्याला बाहेरून झड बांधला होता त्यानेंच पेट घेतला. कोणी म्हणत, त्यांनीं छपराचें लांकूड लवकर खराब होऊं नये म्हणून त्याला डांबर लावलेलें होतें त्यालाच जास्त आग झोंबली. एक ना दोन, लोक हजार तर्कवितर्क लढवीत होते.

तरी बरें, त्या दिवशीं पाडव्याचा दिवस होता, आणि या सणाच्या

दिवशीं कुळवाडी लोक घरींच होते. नाहींतर सगळें घरच अग्नीच्या भक्षस्थानीं पडलें असतें!

रावबा सारखा आक्रोश करीत होता आणि भोळी बिचारी गरीब कुळवाडी जनता आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होती. एरवीं रावबानें दुखविल्याशिवाय तेथें एकही प्राणी नव्हता.

बाबली तर रावबाचे अपराध विसरून आग विझविण्याच्या कामीं पुढाकार घेऊन प्रयत्नांची शिकस्त करीत होता; पण ती आग या मानवी प्रयत्नास जुमानीत नव्हती. तो दैवी क्षोभ होता कीं काय न कळे!

आग विझविण्याची जेव्हां अशक्यता भासूं लागली तेव्हां तर रावबा ऊर बडवून घेत ओरडून विनंति करूं लागले.

'अरे कोणीतरी माझी झोंपायच्या खोलींत असलेली पेटी आणा रे! अरे, त्यांत माझे दस्तऐवज व पैसे आहेत. कुणीतरी आणा रे! बुडालों. ठार बुडालों!' रावबा छाती बडवून घेऊं लागले.

परंतु असल्या आगींत शिरतो कोण?

'अरे पन्नास रुपये बक्षिस देतों, शंभर रुपये देतों, काय मागाल तें देतों, पण या आगींतून माझी पेटी वांचवा रे!' रावबा गयवया करीत होते.

'बाबली, तूं तरी कर रे हा उपकार! मी तुला जन्माचा सुखी करीन!' रावबा बाबलीजवळ याचना करूं लागले.

आणि दुर्दैवानें त्याच दिवशीं एक सरकारी अधिकारी रावबांच्या घरीं पाहुणा होता. त्याची एक बॅग व एक कुत्रें त्या भडकलेल्या आगींत सांपडलीं होतीं. कुत्रें तर आंतून सारखें केंकाटत होतें.

'हे बघ, माझं कुत्रं आणि बॅग जर कोणी आणून देईल तर मी पण बक्षीस देईन—बॅग दिवाणखान्यांत आहे व कुत्रं पण तिथं बांधलेलं

आहे. बॅग एक वेळ गेलीं तरी पर्वा नाहीं; पण कुत्र्याचा जीव वांचवा' तो पाहुणा सांगत होता.

पण कोणीच पुढें सरलें नाहीं. सगळ्यांचे डोळे बाबलीकडे लागले होते. जणुं काय एवढें हें साहस करावें तर तें त्याच बहादराने.

आणि शेवटीं बाबलीनेंच ओला पंचा अंगाभोंवतीं गुंडाळून "देवा वेताळा, तूं पाव" असें म्हणून त्या जळत्या घरांत प्राणाची पर्वा न करितां धांव घेतली.

सगळ्यांचे प्राण नजरेंत सांठवले. आतां आपणांस बाबली जिवंत दिसेल कीं होरपळून-भाजून-मेलेला?

क्षणक्षण जात होता तसतशी लोकांची उत्कंठा व काळजी वाढत होता.

बाबलीच्या वेड्या साहसाला देवानें यश दिलें.

एका हातांत कुत्र्याची सांखळी, डोकीवर रावबाची पेटी व त्यावर पाहुण्याची बॅग अशा थाटांत एकदांचा बाबली या जगांत आला.

रावबा आदिकरून सगळ्या मंडळींनीं त्याला शाबासकी दिली, पाहुण्यानें तर त्याला प्रेमानें कुवटाळलें.

एकदां उच्च बिंदु गांठला म्हणजे कसल्याही गोष्टीस उतरती कळा ही लागावयाचीच. आगही जरा कमी झाली. घराचा दर्शनी भाग बराच वचावला.

* * *

दुसऱ्या दिवशीं बाबली पेज जेवून ओटीवर विढी ओढीत बसला होता. फुलूनें शिदोरी बांधून दिली, त्यानें आपला मळका पंचा डोकीला बांधला व कांबळ घेऊन कामास निघणार तों त्याच्या कानीं हांक आली.

'बाबली ऽ इकडे ये पाहूं.'

बाबलीला स्वर अपरिचित वाटला. बाहेर जाऊन पहातों तों कालचा रावबांच्या इथला पाहुणा. तो जाण्याच्या तयारींत होता. एका हातांत कुत्रें असून दुसऱ्या हातांत तीच बाबलीनें वांचवलेली बॅग होती.

'बाबली, काल तूं माझ्यावर केवढे उपकार केले आहेस त्याची कल्पना नाहीं तुला. या बॅगेंत माझे महत्वाचे कागद होते, आणि या कुत्र्यावर तर माझा जीव आहे.'

'कसलं काय घेऊन बसलांत राव!' आपण कांहींच केलें नाहीं या भावनेनें बाबली म्हणाला.

'हे दहा रुपये घे, तुला मी ते बक्षीस म्हणून देत आहें. माझ्या जवळ जास्त पैसे तूर्त नाहींत. असते तर दिले असते. रावबा तुझ्या कामाची कदर केल्याशिवाय रहाणार नाहीं.' पुढें तेच म्हणाले, 'बाबली, तुला माझी आठवण रहावी म्हणून मी तुला कांहींतरी देणार होतों,— '

'साहेब! तुमची आठवण केव्हांही मी विसरणार नाहीं, हें दिलंत तेंच पुष्कळ झालं, आणखी कशाला काय हवं?' बाबली कृतज्ञतेनें म्हणाला.

'छे! तसं कसं होईल?'

पाहुण्याची नजर आपल्या खिशाकडे गेली. घड्याळाच्या सोन्याच्या सांखळीला एक पौंड लटकत होता. बाबलीच्या चन्द्रमौळी घराच्या ओटीवर राहून फुलू हें संभाषण ऐकत होती. त्यानें चटकन दोनही गोष्टी पाहिल्या.

पाहुण्या गृहस्थाला काय कल्पना आली कुणास ठाऊक! त्यानें चटकन तो पौंड तोडून बाबलीच्या हातीं देत म्हटलें,

'बाबली, हा घे, तुझ्या घरकारणीच्या गळ्यांत ही माझी आठवण म्हणून घाल बरं. येतों मी.'

बाबलीच्या हाती तो 'पवन' देऊन तो चालूं लागला.

बाबली या औदार्यानें आश्चर्यमूढ झाला, त्याला आभार मानण्याचें सुद्धां भान राहिलें नाहीं.

पाहुण्याच्या औदार्याविषयीं व देवाच्या कृपेविषयीं त्यांचें बोलणें चाललें होतें; इतक्यांत वळून पहातो तों रावबा दारांत उभे.

बाबलीनें ओसरीवर रावबांकरतां कांबळ टाकली.

'काय धनी, कुठं जात होतां?' बाबलीनें अदबीनें विचारलें.

'अरे, कुठं म्हणून काय विचारतोस? माझ्या पैशांचं काय केलंस तें सांग. घर तर जळालंच आतां तें दुरुस्त करण्याला पैसा पाहिजे ना?

बाबली स्तिमितच झाला! काल आपणांस 'जन्माचें सुखी करीन' म्हणून आश्वासन देणारा हा गृहस्थ दहा रुपयांकरितां धरणं धरून बसतो म्हणजे काय? त्याला उलगडाच होईना! तरी थोडासा भीतभीत व घुटमळत बाबली म्हणालाच,—

'धनी! आपण काल नाहीं का म्हणालांत कीं, पन्नास रुपये बक्षिस देईन म्हणून?

'हात् वेड्या! अरे, त्या भयंकर प्रसंगीं मी काय बोललों तेच शब्द घेऊन बसलास वाटतं! अरे असलीं प्रसंगाच्या वेळचीं वाक्यं कोणी पाळतात का? वेडा खरा तूं!' रावबा मजलेदार हंसले.

बाबली मात्र पुतळ्यासारखा जेथल्या तेथें उभा होता—अगदीं थिजून गेला तो!

फुल्लू पुढें आली. मघांची दहा रुपयांची नोट त्याच्या पुढ्यांत ठेवीत ती म्हणाली, 'धनी, हे दहा रुपये घ्या आणि तुमच्या ऋणांतून आम्हांला एकदां मोकळं करा. फिटलं ना तुमचं ऋण?

'फिटलं बरं! अरे, इतका का मी हराम आहे?—अरे, बाबली,

पाहिजे तर है पैसे ठेव तूं––मला महिन्याभरानें दिलेस तरी चालतील.' रावबा कृपावन्त होऊन म्हणाले.

'छे–छे, धनी, पाहिजे तेव्हां येऊंच आम्हीं तुमच्या दारीं––' बाबळी वरपांगीं म्हणाला. पण तो मनांत म्हणत होता 'ऊन दुधानें तोंड पोळलेलें मांजर ताकाच्या भांड्याकडे आतां कशाला जातें?'

सांपळ्यांतून सुटलेला वाघ पुन्हा खाद्याच्या आशेनें तेथें जाईल का?

# कर्तव्याची व्याख्या

मीं तिला शक्य तेवढ्या कसोशीनें तपासून पाहिलें. मृत्यू
तिच्याभोंवती आपलें जाळें विणलें होतें, आणि त्याचे पाश तो हळुह
आंवळीत होता व तिचा जीव तें तोडण्याचा निष्फळ प्रयत्न करीत हो
मृत्यूशीं झुजून आजपर्यंत कोण विजयी झाला आहे?

माझ्या पेशास अनुसरून मीं घरच्या मंडळीस धीर द्यावया
पण तो धीर मला कांहीं झाला नाहीं—घटका पळें मोजणाऱ्या व्यक्तीच
धीर कसला देणार? न जाणों माझ्यासमक्ष तिचा प्राण गेला तर मा
आश्वासनाची वाट काय? उलट माझीच बदनामी व्हायची

पाण्याबाहेर तडफडणाऱ्या माशाप्रमाणें तिचा आत्मा शरीरा
कैदेंतून मुक्त व्हावयास धडपडत होता. एकाच स्वरूपाचीं तीन मातृसु
चिमणीं मुलें चिमणीसारखीं तोंडें करून दूर अंतरावर बसलीं होतीं, अ
तिचा नवरा मन घट्ट करून बिचारा मजबरोबर वावरत होता.

"डॉक्टर, मजकरतां नाहीं तरी या पोरांकरतां तरी हिला जीवद
द्या" बोलतां बोलतां त्याला भडभडून आलें.

त्याच्या शब्दांतली ती तीव्र तळमळ पाहून माझ्याही हृदयांत कालव
कालव झाली 'मीं माझ्या प्रयत्नाची पराकाष्ठा करतों, पण आयुष्या
दोरी — ती आम्हां दुर्बळांच्या हातीं परमेश्वरानें ठेवलेली नाहीं.'

तिच्या गळ्यांत हळूहळू होणारा आवाज मोठ्यानें होऊं लागला. मुलाना बाहेर नेण्यांत आलें, मीं एका खुर्चीवर काहीं उपाय योजीत बसलों होतों. खोलींत स्मशानशांतता नांदत होती, आणि त्या भीषण शांततेचा भंग तिच्या गळ्यांतून निघणारा भेसूर आवाज तेवढा करीत होता. ती घरघर म्हणजे यमदूतांच्या चक्रांचे आवाज होते आणि क्षणोक्षणीं कोंडणारा तिचा श्वास म्हणजे मृत्यू करीत असलेली तिची मुस्कट दाबीच जणू. तिला होणाऱ्या त्या दुःसह यातना पाहून मला, एका निढविलेल्य धंदेवाईकास सुद्धां कसेंसेंच होऊं लागलें, आणि तो तिचा नवरा, पुरुषासारखा पुरूष असून मुळूमुळू रडत होता.

* * *

मला चटकन आठवण झाली. कलाच्या मेलमधून एका प्रख्यात लेबोरेटरीतून नमुन्याकरतां आलेले इंजक्शनचे ट्युब माझ्या बॅगेंत होते. मी चटकन उठलों.

ट्युबचें टोंक मोडून फेंकून दिलें आणि पिचकारींत औषध भरतां भरतां त्या आसन्नमरण बाईकडे पाहिलें. तिची मृत्यूशीं धडपड चलूच होती संसाराचा स्नेह सुटत नव्हता आणि तिचा नवरा अतृप्त नजरेनें तिचा चेहरा न्याहाळीत होता.

आशा ही विचीत्र वल्ली आहे. मृत्यूच्या हद्दींत पडलेलें एक पाऊल सुद्धा कदाचित परत फिरेल असें वाटूं लागतें, अमूक अमूक इसम चितेवर ठेवल्यानंतर जिवंत झाला इत्यादि भाकडकथांवर विश्वास बसूं लागतो आणि दुःखार्णवांत बुडणाऱ्या त्या दुर्दैव्याला या भाकडकथा आधार वाटूं लागतात.

—अशा आशांच्या हिंदोळ्यावर त्याचें हृदय गोते घेत होतें क्षणभर आशेच्या तेजानें त्याचें तोंड उजळल्यासारखें होई तर दुसऱ्या क्षणीं सभोंवार

चा भीषण देखावा फडक्यानें एकादा फळा पुसून काढावा त्याप्रमाणें त्याचा चेहरा निर्विकार करी आणि नंतर हळुहळू काळवंडून जाई, आणि हें मीं निष्ठूर मनानें मुकाट्यानें पहात होतों.

इंजक्शन देण्याची तयारी करुन मीं तिच्या खाटेवर वांकलों. त्या अस्थिपंजरवत् शरिरास सुई टोंचतांना मला माझ्या निर्दयतेची क्षणभर शिसारी आली

औषधाचा परिणाम ऱ्याहाळीत मीं तिच्या उशाशेजारीं उभा राहिलों. खाटेवर तिच्या शेजारीं तो वसला. औषधाचा परिणाम हळूहळू होऊं लागला तिचें तें गुदमरणें कमी झालें व श्वासोश्वासही पण सरळ येऊं लागला. त्याचें तोंड जग उजाळलें, त्याला वाटूं लागलें ही कदाचित जगेल. माझी खात्री होती कीं ती काहीं जगणार नाहीं, ती तासा दोन तासांची सोबती होती एवढेंच. मरणोन्मुख माणसास किंचितकाल हुशारी देण्याचें तें औषध होतें हें मला माहित होतें, आणि त्यास —

—पण अज्ञानांतच आनंद असतो.

— तिनें डोळे उघडले. अंधास दृष्टीलाभ झाल्यावरोबर जो आनन्द होईल तो त्याला झाला, त्यानें कृतज्ञतेनें माझ्याकडे पाहिलें.

तिचे ओंठ हलले, त्यानें आपलें तोंड तिच्या तोंडाजवळ नेलें. क्षीण हास्याची लहरी तिच्या तोंडावर उमटली. दांतांच्या हिरकण्या क्षणभर चकाकल्या.

दुसरें इंजक्शन देण्याच्या तयारींत मी उठलों. शेजारच्या टेबलावर स्पिरीटच्या दिव्याखालीं इंजक्शनची पिचकारी शिजत होती. मी ती अचळय काढून घेतली.

ती हलके हलके बोलत होती. मी दुसरा टयुब शोधीत होतों.

औषध अत्यन्त जपून पिचकारींत भरावें लागत होतें. माझें सहजच तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष होतें.

औषध पिचकारींत भरून झालें. रिकामा ट्युब मी खिडकीवाटे फेंकून दिला, तेव्हां माझ्या कानावर कांहीं तुटक वाक्यें आलीं. मी तिच्या उशाशीं असल्यामुळें तिनें मला पाहिलें नसावें.

'मरणापूर्वी मला आपली क्षमा मागायाची आहे. परलोकाच्या प्रवासांत पापाचें ओझें आणखी मजबरोबर नको. इतके दिवस हृदय जळतें ठेऊन आपल्याशीं प्रतारणा केली. आज मी जरी पश्चात्तापानें पुनीत झालें असलें तरी तुमच्याशीं बेइमानी करणार नाहीं—' तिचे शब्द तुटक तुटक येत होते.

मी कान टवकारून ऐकत होतों.

'माझ्या मुलांपैकीं एक तुमचें नव्हे, तें मला—' तिला हुंदका आला, 'तें माझ्या पापाचें प्रतिक आहे, त्याच्यावर दया करा. तें मला—'

त्याचा चेहरा काळवंडा. त्याच्या चेहऱ्यावरून धांवणाऱ्या विकारांचें पृथःकरण करणें सोपें नव्हतें.

'माझा तिरस्कार करूं नका. अविचारानें घडलेलें पाप, पाप नव्हे—शोकावेगानें तिला मूर्च्छा आली, आणि विचारांत भ्रमण करणारें त्याचें मन जाग्यावर आलें.

'डाक्टर! धांवा!' तो ओरडला.

मीं औषधासकट पिचकारी खिशांत टाकली व जवळ गेलों.

—'आणि औषध टोंचणें शक्य नाहीं. कदाचित प्राणही तावडतोब निघून जातील' मनांतले विचारावेग दाबीत मीं संथपणानें म्हणालों.

* * *

त्याचा घरचा जिना उतरतानां मीं विचार करीत होतों.

—या वेळच्या माझ्या कर्तव्याची व्याख्या कोण करील का? निदान मला तरी ती करतां येत नव्हती. मीं देणार होतों त्या नव्या इंजक्शननें ती आणखीं पांच मिनिटें तरी खास बोलूं शकली असती आणि तिनें आपल्या त्या मुलाचें नांव कदाचित सांगितलें असतें, तर एका गरीब निष्पाप मुलाच्या आयुष्याची धूळधाण उडवण्यास मीं कारणीभूत होणार होतों.

—एका जीवाच्या पांच मिनिटांच्या आयुष्याचें चोज पुरविण्याकरतां एका निरापराधी बालकाच्या सबम्ध आयुष्याचा बळी द्यायाचा काय?

मला कांहींच निर्णय होत नव्हता.

# सवतीचा फोटो

कमलेनें जेव्हां मधुकराच्या घरांत गृहिणी म्हणून प्रवेश केला. तेव्हां तिच्या हृदयांत कितीतरी आशा आकांशा नाचत होत्या. सप्तपदी-करतां जेव्हां मधुकरानें तिचा हात धरला तेव्हां या हातावर आपला आतां, आजन्म हक्क आहे या सुखद जाणिवेनें तिला आनन्द व अभिमान वाटला. मधुकराचा प्रेमळ स्वभाव तिला पुष्कळसा ऐकून माहीत होता. त्याची बहीण कमलेच्याच गांवीं लग्न करून दिली होती तिची आणि कमलेची बरीच गट्टी होती. त्याच्या स्वभावांतील बहुतेक खांचाखोंचा तिला तिच्या-कडून माहीत झाल्या होत्या आणि त्या खांचाखोंचाप्रमाणें आपलें वर्तन ठेऊन त्यास आनन्द द्यावा व त्यापासून आपला आनन्द द्विगुणित करावा इत्यादि मनोराज्यें तिनें गृहराज्याचा ताबा घेतांना केलीं होतीं.

प्रथमच, घर दाखवतांना जेव्हां तिची नणंद तिला घेऊन मधुकरा-च्या खोलींत आली, तेव्हां तेथील सुन्दर सामानाची सुबक व आकर्षक मांडणी पाहून तिला मधुकराच्या रसिकतेची अगदीं स्पष्ट कल्पना आली. आपण कोणत्याही वस्तूविषयीं एक कल्पना करावी आणि ती कल्पनेपेक्षां जास्त चांगली असली म्हणजे आपणांस जें समाधान व आनन्द वाटतो तसेंच कमलेस वाटलें.

मधुकराच्या टेबलासमोर वर त्याच्या प्रथमपत्नीच्या, शान्तेचा भव्य व सुन्दर पेष्टलचा फोटो टांगला होता त्याच्याकडे तिचें लक्ष गेलें. ती क्षणभर स्तिमित झाली. शान्ता कांहीं सौंदर्याची मूस नव्हती परन्तु तें साधें सौंदर्यच जास्त आकर्षक होतें. जिवणेची नाजूक ठेवण, तेजस्वी डोळे व नेहमीं हंसतमुख चेहरा यामुळें केव्हांही, पहाणाऱ्याच्या मनांत तिच्याविषयीं आदर व सहानुभूति उत्पन्न होई.

—परन्तु कमलेस वाटलें शान्ता कांहीं तितकीशी आकर्षक नसावी. त्या फोटोंत तिच्या सौंदर्यापेक्षां चित्रकाराचें कौशल्यच जास्त असावें असें तिला वाटलें आणि ती म्हणाली सुद्धां.

—'किती छान फोटो निघाला आहे नाहीं ?

—'खरं विचाराल तर हा फोटो निघावा तितका छान निघाला नाहीं. शान्ता यापेक्षां कितीतरी सुरेख दिसत होती. तिला ज्यांनीं पाहिलें आहे तो प्रत्येक इसम असेंच म्हणतो.' कमलेच्या नणंदेनें उत्तर दिलें.

—'अस्सं ऽऽ! कमला उद्‌गारली. तिला त्या सवतीच्या निर्जीव फोटोविषयीं थोडीशी असुया वाटली.

त्याच खोलींत एका बाजूस मधुकराचा पितळी पलंग होता व शेजारींच उशाशीं एका स्टूलवर एक कातडी कव्हराचें डौलदार आकाराचें पुस्तक होतें खोली पाहातां पाहातां जेव्हां तीं तेथें आलीं तेव्हां कमलेनें तें पुस्तक उचललें व उघडतां उघडतां सहज विचारलें 'कसलं हो हें पुस्तक वन्सं ?'

—'तें होय ?' ती जरा अडखळली. 'शांतेच्या फोटोंचा आल्बम आहे तो'

कमलेने तें सगळे फोटो पाहिले. निरनिराळ्या पोझमधें काढलेले शांतेचे पंचवीस तीस फोटो त्यांत होते. त्यांतील बहुतेक फक्त शांतेचेच होते

फक्त चार पांच मात्र जोडप्यानें काढलेले होते. एका फोटोंत मधुकर युरोपियन ड्रेसांत खुर्चीवर बसला असून, हॅट शांतेजवळ देत होता तर दुसऱ्यांत शांता चित्रांचा आल्बम पहात बसली असून मधुकर मागून तिच्या खांद्यावर हात ठेवून वांकून चित्रें पहात होता—एक फोटो तर कमलेस विशेष आवडला तो कितीतरी वेळ ती सारखा पहात होती तो अगदीं पहिल्याच पानावर होता त्यात मधुकर व शांता अगदीं जवळ जवळ बसलीं असून, मधुकरानें आपला उजवा हात पाठी मागून नेऊन तिच्या खांद्यावर ठेवला होता. व या त्याच्या सलगीमुळें तिच्या चेहऱ्यावर गोड संभ्रम पसरला होता. विनयामुळें व स्त्रिसहजसुलभ लज्जेमुळें तिचें मुख जरा अवनत झालें होतें व मधुर मंदस्मितामुळें तिची जिवणी म्हणजे उमलु लागलेली गुलाबकळीशी वाटे.

फोटो खालील तारखेवर बोट ठेऊन तिच्या वन्सं म्हणाल्या ‘ मधु–दादानें हा फोटो आपल्या लग्नाच्या पंधराव्या दिवशीं काढला म्हणून शांतावहिनी त्यांत इतकी लाजली. ’ तिचें बोलणें ऐकलें न ऐकलेंसें करुन कमला म्हणाली ‘‘ पण हा आल्बम असा उघड्यावर कां टाकला आहे ? ’

‘ उघड्यावर नव्हे, दादाला नेहमीं त्याचीं गरज असते दररोज झोंपतानां निदान तास अर्धातास तरी ते फोटो चाळण्याचा त्यांचा नित्यक्रम आहे. इतकेंच नव्हे तर फिरतीवर जातानासुद्धां तो हा आल्बम घेऊन जातो. ’

‘ हं ’ कमलेच्या तोंडांतून उद्गार बाहेर पडला—पण तिला कसेंसेंच झालें तिचा भावनाविष्कार करणें मानसशास्त्रज्ञानालाही साधलें नसतें तिला ते फोटो पाहून बरें वाटलें नाहीं, आनंद झाला नाही हें वरिक खरें होते.

* * *

मधुकराची आणि कमलेची जेव्हां धर्माज्ञेनें प्रथम एकांतांत गांठ पडली, तेव्हां तिला समजून चुकलें कीं त्याच्या हृदयांत आपल्याविषयीं

असायास पाहिजे होता तसा प्रेमाच ओलावा नाहीं. त्याचें हृदय प्रेमाच्या वाव तांत शुष्क बनलें होतें असें नव्हे, तरीपण वर्षाकाळांतील बेफाम खळखळणारा ओहोळ आणि शरदऋतूंतील वाहाणारा संथ प्रवाह यांत अंतर असतेंच.

प्रथम पत्नीवर आत्यंतिक प्रेम केल्यामुळें त्याच्या हृदयांतला प्रेमनिर्झर आटत चालला होता कीं कुणास ठाऊक!

मधुकरास त्याची इच्छा नसतानाही आईबापांच्या अत्याग्रहानें दुसरें लग्न करणें भाग पाडलें हें कमला जाणून होती. परंतु आपण त्यास पुन्हा प्रेमी बनवूं त्याच्या वठलेल्या प्रेमलतेस प्रेमाचें पाणी घालून परत फुलवूं असा तिला भरवंसाच नव्हे तर खात्री होती. परंतु तो भरवंसा आतां डळमळूं पहात होता. आतां तिला तो आत्मविश्वास नव्हता. सर्पदंश झालेल्या माणसाच्या अंगांत जरा तरी धुगधुगी असावी लागते तरच त्यावर मंत्रिकाचा मंत्र चालतो. प्रेमाची ज्योत जास्त प्रज्वलीत करण्यास जितका जिवन्तपणा त्या ज्योतींत पाहिजे तितका तो तींत नाहीं असें कमलेच्या प्रत्ययास आलें.

* * *

मधुकराची नोकरी फिरतीची होती. कुठल्याशा एका कम्पनींत तो इन्सपेक्टर असल्यामुळें, आसपासच्या शहरांतून असलेले त्या कम्पनीचे डेपो तपासणें, विक्रीच्यांचे हिशेब कम्पनीच्या हेड ऑफिसांत सादर करणें हें त्याचें काम होतं यामुळें त्यास बिऱ्हाड करून रहाणें शक्यच नव्हतें. आठ पंधरा दिवसानीं फिरती सम्पली म्हणजे चार आठ दिवस त्यास विश्रांती असे त्यावेळीं तो घरीं असे.

असाच एक दिवस तो आला. येतानां त्यानें नुकतींच प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें आणलीं होतीं—कमला जवळ येतांच त्यानें तिला तीं उत्सुकतेनें दाखवलीं.

एका सुप्रसिद्ध ग्रंथकाराच्या त्या दोन अगदीं नवीन कादंबऱ्या होत्या.

'वाचलीं आहेत का तूं हीं पुस्तकें?' मधुकरानें प्रश्न केला.

त्यानें हातीं दिलेलीं पुस्तकें, तिनें उघडून पाहिलीं व शेजारच्या स्टुलावर ठेवलीं.

मधुकरानें एक क्षणभर तिच्याकडे भेदक नजरेनें पाहिलें व सुस्कारा सोडला.

ती वरमली, अगदीं कावरी बावरी झाली, तिला त्याचा अर्थ कळला नाहीं.

'कमल ! माझी शांता होती तेव्हां मी पुस्तक आणलें कीं ती झडप घालून तें घेई व ती तें लपवून ठेवी, कां तर आपण माझ्या पूर्वी वाचणार म्हणून. आणि तूं–? मी हातांत पुस्तक दिलें तरी त्या विषयीं अनास्था.' त्यानें शांतेच्या फोटोकडे पहात एक दिर्घ सुस्कारा सोडला.

'छे! तें भाग्य आतां माझ्या नशिबीं नाहीं' तो पुटपुटला—

—असेच दोनचार प्रसंग घडले; प्रत्येक वेळीं त्यानें शांतेची आठवण काढावी आणि तिची व कमलेची अगदीं उघड उघड तुलना करावी —कमला जवळ असतानां सुद्धां तिच्या अस्तित्वाची जाणीव विसरून तासचे तास शांतेच्या फोटोंचा आल्बम, तो न्याहाळीत बसे. तो हें मुद्दाम करीत होता अशांतली मुळींच गोष्ट नव्हती, पण खरी धांवाच्या मोटरींत बसावयास एकदा माणूस सवकला कीं घडघड चालणाऱ्या बैलांच्या सारवट गाडीची त्याला कींव वाटते आणि त्यास जर तींत बसण्याचा प्रसंग आला तर ती त्याला आपत्ती वाटूं लागते, हा कांहीं त्याचा दोष नव्हे.

या सहज घडून येणाऱ्या प्रसंगानीं कमलेला फार वाईट वाटत होतें, परंतु मधुकरास त्याची तितकीशी स्पष्ट कल्पना नव्हती, व असती तर त्यानें तिला तितकेंसें महत्व दिलें नसतें.

कमलेस मात्र आतां हळूहळू हा प्रकार असह्य वाटू लागला. मृत सवतीचें इतकें स्तोम माजवावें हें तिला मुळींच आवडलें नाहीं —फोटोंतील शांतेचा तो शांत व हास्यमुख चेहरा आपली हंसून कुचेष्टा करतो आहे असें तिला वाटूं लागलें. जिवंत सवत उरावर नाचावी तसा तो निर्जिव फोटो तिला वाटूं लागला.

*　　　　*　　　　*

मधुकर आजच सकाळीं फिरतीवर गेला होता. आतां आठपंधरा दिवस तरी तो येणार नाहीं अशी कमलेची खात्री होती – दुपारचें काम आवरून ती नुकतीच पलंगावर पडली होती — शेजारच्या स्टुलवर तोच फोटोंचा आल्बम पडला होता. आज मधुकर तो नेण्यांत विसरला होता.

पहिल्याच पत्रावरचा तो फोटो पाहून तिला असुया वाटली, मत्सर वाटला आणि रागही पण आला.

तिच्या तिव्र इच्छेवरून व तिनें फिरून फिरून पुष्कळ आग्रह धरल्यामुळें मधुकरानें तिच्यासमवेत आपला एक फोटो काढला होता तो तिनें पेटींतून काढला. त्यांत कर्तव्य म्हणून नाखुषीनें काम करणाऱ्या अपराधी माणसाप्रमाणें मधुकर बसला होता व ती पण शेजारीं बसली होती. पण — ?

— तिनें ते दोनही फोटो जवळ जवळ धरले. दोनही फोटोच होते, एकाच फोटोग्राफरनें ते काढले होते. दोहोंतही दोन दोनच माणसें होतीं. परन्तु या साम्यापेक्षां त्यांतील जमीनअस्मानाचा विरोध पाहून तिला राग आला, आपण आपल्या प्रेमामृताचा नित्य वर्षाव करीत असतांना त्यांच्या हृदयांत प्रेमाचा गुलाब फुलला नाहीं तो नाहींच पण मृत सवतीवरील त्याच्या प्रेमांत रतिभरही अन्तर पडलें नाहीं हें आठवून आठवून तिला जास्त वाईट वाटूं लागलें.

तिला सवतीच्या त्या फोटोचा अगदीं राग आला. त्या फोटोचे अगदीं फाडफाडून तुकडे करावे असें तिला वाटलें. तिनें आल्बमच्या पानाला हात घातला देखील. पण —

कुठुनसें सर्र झालें. ती चपापली तिनें वर पाहिलें. वाऱ्याच्या झोतानें कॅलेंडरची पितळी पट्टी भिंतीवर थांमत होती, आणि त्याच्यावर तो, तोच शान्तेचा दुष्ट फोटो आपणास हंसून खिजवीत आहे असें तिला वाटलें.

'खरंच किती मी मूर्ख! हा आल्बमांतला फोटो तरी नेहमी झांकलेला असतो. पण ही माझी सवत मला रात्रन्दिवस हंसून खिजवते आहे तिची वाट काय?

'वाट काय? म्हणजे?' तिची मुद्रा भेसूर दिसूं लागली. ती उठली व हळुहळू चालूं लागली. खुनी माणसाच्या डोळयांत जी धुंदी तरळते तशीच यावेळीं तिच्या डोळयांत दिसत होती. खून करावयास उद्युक्त झालेल्या माणसाच्या चेहऱ्यावर भय, क्रोध इत्यादि तामसी विकाराचें जें एक भयंकर प्रतिबिम्ब पडलेलें असतें तसाच तिचा चेहरा यावेळीं दिसत होता.

खोलीच्या मध्यभागींच मधुकराचें लिहिण्याचें टेबल होतें एका सुंदरशा पेपरवेट खालीं कसलेसे कागद होते व त्याच्या शेजारींच शाईची भली मोठी दऊत होती.

फोटोवर स्थीर व भेदक नजर फेंकीत तिनें पेपरवेटास हात घातला पण पेपरवेटा ऐवजीं तिचा हात दऊतीवर पडला, रागाच्या भरांत पेपरवेट म्हणून समजून तिनें दऊत हातीं घेतली व त्या बेभान स्थितींत फोटोवर फेंकून मारण्यास उचलली देखील. पण हात वर उचलतांच दऊतींतील शाई टेबलावरील कागदांवर सांडली व राहिलेली तिच्या कोंपरावरून

घरंगळून लुगड्यावर पडली. टेबलावरील हिरवी मखमल आणि तिचें पांढरें शुभ्र पातळ दोनही खराब झालीं तिच्या शुभ्र पातळावरील डाग फारच काळे दिसूं लागले. उजवा हात तर शाईनें माखून गेला.

तिचा चेहरा उतरला, राग मावळला, आणि हताश मुद्रेनें तिनें ती दऊत जमिनीवर टाकली. कांचेच्या त्या दऊतीचे तुकडे तुकडे झाले.

घाम पुसण्याकरतां तिने कपाळावर हात फिरवला. हाताची शाई कपाळभर झाली. पण त्याचें तिला भान नव्हतें.

— कोणसें बोलल्या सारखें तिला वाटलें. ती भ्याली, चपापली.

तोच दुष्ट फोटो हंसून कुचेष्टेनें बोलत होता.

'माझे फोटो तू फाडून टाकूं शकशील पण त्याच्या हृदयांत ठसलेली माझी मूर्ति तूं कशी काढून टाकणार?' तें तुला या जन्मी तरी शक्य आहे का?

'फोटो, निर्जीव फोटो का कुठं बोलत असतो? मग कोण बोललें तें? भासच कां सगळा.' तिनें खोलीबाहेर येऊन सुद्धां पाहिलें. 'मग भासच तर?' तिनें समाधानाचा सुस्कारा सोडला.

* * *

आपल्या प्रतिस्पर्ध्यास चीत करणें आपल्या हातचें नाहीं हें तिला लगेच कळून चुकलें. वेदनांच्या व भावनेच्या भरांत मनुष्य कोणतीही गोष्ट तडकाफडकीं करून जातो परंतु नंतर तो तितकाच गलितगात्र होत असतो तशीच कमलेची स्थिति झाली. रागाचा, असुयेचा पारा जसजसा चढूं लागला तसतशी तिची सूडाची भावना जास्त जास्त प्रज्वलीत होऊं लागली, आणि पेपरवेट म्हणून समजून दऊत भिरकावतांना आपलेंच तोंड काळें करून घेतलें तेव्हां ती भानावर आली. शान्तेची पुण्याई इतकी सबळ आहे कीं तिच्या नुसत्या फोटोचेंही वाईट करणें आपल्या

हातचें नाहीं हें तिच्या प्रत्ययास आलें, आणि ती गलितधैर्य झाली, तिला भीति वाटली, आपल्या या दुष्कृत्याबद्दल तिला पश्चात्ताप झाला.

—आणि शेवटीं ती त्या फोटोसच शरण गेली. — अगदीं मनोभावानें व शुद्ध अंतःकरणानें तिनें त्या शांतेच्या फोटोस नमस्कार केला. भाविक लोक आपल्या गालावर चापट्या मारून घेऊन जशी करुणा भाकतात तशी तिची क्षमायाचना चालली होती. शांतेच्या फोटोंत ती आपल्या नजरेनें देवपण भरीत होती. तिची मूक प्रार्थना हळूहळू बोलकी होऊं लागली

'बाई! खरंच तुम्ही माझ्या देव अहांत. एरव्हीं तरी काय, चांगली माणसें मेल्यावर देव होतात, नाहीं का? आपलें गुणवर्णन या घरांत मीं इतकें ऐकतें आहे यावरून आपण खात्रीनें देव झालांच पाहिजे. आणि तुमचं नांव शांता आहे; आणि माझी माहेरची कुलदेवी श्री शान्तादुर्गाच आहे—खरंच मीं तुम्हांस माझ्या कुलस्वामिनी श्रीशान्तादुर्गेप्रमाणें मानतें. देवी, माते या अजाण बालिकेला क्षमा करा' कमलेनें खरोखर पदर पसरला— तिचेच अश्रु तिच्या पदरांत पडले. हृदयाचा काळेपणा जणूं काय धुवून गेला होता आणि तीच भिक्षा शांतेनें तिला घातली होती.

शांतेचा फोटो पूर्वीसारखा हंसत होता परंतु आतां कमलेस वाटलें कीं तो कुचेष्टेनें हंसत नसून प्रेमानें व दयार्द्र दृष्टीनें हंसत आहे

—तिला धीर आला ती पुन्हां करुणा भाकूं लागली.

—'देवी! ते तुमच्या निर्जिव स्मृतिचित्रावर प्रेम करून एका जित्या जिवास यातना देत आहेत—एका मृत व्यक्तीवर निस्सिम व एकनिष्ठ प्रेम करण्यास जर जित्या जिवाच्या प्रेमाचा खेळखंडोबा होतो आहे हें आपणास पहावतें काय? खरंच देवी तुम्हांस अशक्य नाहीं. तुम्हीं तिकडच्या मनांत प्रेरणा करा आणि माझा संसार सुखाचा करा.'

कमला केंविलवाण्या नजरेनें, भरलेल्या हृदयानें व अश्रूपूरित

डोळ्यानीं अनन्य भावानें करुणा भाकीत होती. तिची त्यांत बराच वेळ तंद्री लागली.

* * *

आणि जेव्हां तिनें वळून पाहिलें तेव्हां खोलीच्या दारांत प्रवासी पोषाखांत स्तब्ध उभा असलेला मधुकर दिसला. तिला लाज व भय वाटलें ती ओशाळली — आपण केलेलें हें दुष्कृत्य त्यानीं पाहिलें तर नाहीं ना?

मधुकर धिम्या पावलांनीं आंत आला.

'कसली मागणी चालली होती माझ्या शान्तेकडे' त्यानें सस्मित विचारलें.

'मी माझ्या शान्तादुर्गेकडे तुमची काळजी नेली होती' तिनें खालच्या मानेनें पण धीटपणानें उत्तर दिलें.

'अस्सें? पण चुकलीस तूं. ती शान्तादुर्गेची तसबीर नसून माझ्या शान्तेचा फोटो आहे.

'पण माझी श्रीशान्तादुर्गा तीच आहे'

मधुकरानें तिला जवळ ओढलें. हातावरील व कपाळावरील वाळलेल्या शाईकडे आपण पूर्वी कांहींच पाहिलें नाहीं अशा संभावीतपणानें पहात त्यानें विचारलें.

'हें काय? शाईबरोबर खेळलीस वाटतें.'

मधुकरानें तिला जवळच्या आरशासमोर नेऊन उभें केलें. आपलें विकृत रूप पाहून तिला हंसू आलें.

'अरेच्या! माझ्या कामाच्या कागदांवर तूं शाई सांडलीस कीं. आणि हें काय दऊत फोडलीस. टेबल व तुझें पातळ घाण केलेंस. हें आज योजलें होतेंस तरी काय तूं?' महत्वाच्या कामाचे कागद विसरलों

म्हणून वाटेंतून परत आलों तर तूं ते हे असे घाण करून टाकलेस' रागाचा लटका अविर्भाव करून मधुकर म्हणाला.

"या सगळया कृत्याची जबाबदारी माझ्यावर आहे. आपण कसलीही शिक्षा केलीत तरी मला ती कमीच ठरेल एवढा मोठा अपराध माझ्याकडून घडला आहे. आपण ती शिक्षा केलीच पाहिजे कारण तें माझ्या पातकाचें प्रायश्चित होईल."

कमलेनें मधुकराच्या आग्रहावरुन सगळा वृत्तान्त कांहीही लपवून न ठेवतां सांगितला.

कमला अजून मधुकराच्या करपाशांत होती त्याने तिला आवळून आपल्या हृदयाशी धरलें.

IRBK-0101332

IRBK-0101332

मुं. म. सं. (ठाणे) वाचनालय शाखा.
प्र. क्र. 234 नों. दि ........
वि. कथा ........